◆ फेब्रुवारी २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक दुसरा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **आंतरभारती संवाद संमेलन** | ३० |
| **पुस्तक परिचय-** | |
| **जागतिक अर्थव्यवस्था-**मधुसूदन साठे | ४० |
| **इंडिया इन स्लो मोशन-**अनु.अजित ठाकूर | ५० |
| **गव्हर्नन्स-**अनु.भारती पांडे | ५८ |
| **बोचकं-**रवींद्र बागडे | ६६ |
| **ससोबाच्या गोष्टी** | ७६ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ८६ |
| **पुरस्कार** | ९० |
| **श्रद्धांजली** | ९६ |
| **बालनगरी** | ९८ |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### जगातील सर्वात मोठे ग्रंथालय

आजच्या जगातील सर्वात मोठे ग्रंथालय कोणते असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर देणे अगदी सोपे आहे. वॉशिंग्टन डी.सी. येथील कॅपिटॉल हिलवरील लायब्ररी ऑफ काँग्रेस. अमेरिकन संसदेला सर्व प्रकारच्या अद्ययावत माहितीचा पुरवठा व्हावा म्हणून इ. स. १८०० मध्ये सुरू करण्यात आलेल्या ग्रंथालयात आज १३ कोटी २० लाख नग (पुस्तके व दस्तऐवज) आहेत; त्यासाठी ८५० मैल लांबीच्या बुकशेल्फची व्यवस्था करावी लागली आहे. या ग्रंथालयाला गेल्या वर्षी १५ लाख वाचकांनी भेट दिली. या ग्रंथालयात दररोज सुमारे दहा हजार नवीन साहित्याची भर पडते. येथे साहित्य म्हणजे केवळ पुस्तके असा मर्यादित अर्थ घ्यायचा नाही. छायाचित्रे, नकाशे, सीडीज्, अहवाल, हस्तलिखिते, शासकीय परिपत्रके, सभासंमेलनांतील भाषणांच्या पुस्तिका, वेगवेगळ्या संशोधन प्रकल्पांचे पेपर्स, वृत्तपत्रे, मासिके व नियतकालिके, चित्रफिती असे विविध प्रकारचे साहित्य... पाच हजार कर्मचारी या ग्रंथालयात काम करतात. या ग्रंथालयाचा लाभ कोणाही सोळा वर्षावरील व्यक्तीला मुक्तपणे घेता येतो. त्यासाठी शुल्क द्यावे लागत नाही. वर्गणी भरावी लागत नाही.

खरे तर संसद सदस्यांच्या उपयोगासाठी या ग्रंथालयाचा आरंभ झाला; संसद सदस्यांना कुठल्याही विषयावरची अद्ययावत आणि अचूक माहिती मिळायला हवी, तरच ते योग्य प्रकारचे निर्णय घेऊ शकतील, धोरणे आखू शकतील हा विचार या ग्रंथालयाच्या स्थापनेच्या मुळाशी होता. या ग्रंथालयात वाचनासाठी २२ दालने (अभ्यासिका) आहेत. विशिष्ट विषयाच्या अनुषंगाने संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना अनुदाने व अन्य सुविधाही येथे मिळू शकतात. येथील कायदेविषयक पुस्तकांचे संकलनही अप्रतिम आहे. बालसाहित्य आणि लोकसाहित्य विभागही समृद्ध आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांची, इंटरनेट-संगणक यांचीही प्रत्येक टेबलावर सोय आहे.

मानवाला उपलब्ध असणारे सर्व ज्ञान संकलित करावे आणि अमेरिकन इतिहासाचे सर्वसमावेशक संदर्भ एकत्र उपलब्ध व्हावे या दृष्टीने साहित्य जमा करणे, त्याचे वर्गीकरण करणे, ते जपून ठेवणे, सुरक्षित ठेवणे हा या ग्रंथालयाचा हेतू आहे.



जगातल्या सगळ्या भागांतून, सगळ्या देशांतून उपयुक्त साहित्याचा सतत पुरवठा होत राहावा यासाठी या ग्रंथालयाने व्यापक यंत्रणा तयार केली आहे. त्यासाठी जकार्ता (इंडोनेशिया), नवी दिल्ली (भारत), इस्लामाबाद (पाकिस्तान), कैरो (इजिप्त), नैरोबी (द. आफ्रिका) आणि रिओ द जानिरो (ब्राझील) येथे संकलन केंद्रे स्थापन केली आहेत. आपल्या अवतीभवतीच्या देशांतून पुस्तके व अन्य संदर्भसाहित्य संकलित करण्याचे काम या केंद्रामार्फत होते. ही केंद्रे आशिया, आफ्रिका, मध्यपूर्व आणि दक्षिण अमेरिका यामधील ५८ देशांतील साहित्य जमा करण्यासाठी विविध मार्ग चोखाळतात.

नवी दिल्ली येथील केंद्रामार्फत भारत, बांगलादेश, भूतान, मालदीव, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार, मंगोलिया, तिबेट यांमधील साहित्य मिळवण्यात येते. दक्षिण आशियातील पुस्तके मिळवून ती ४४ ग्रंथालयांना उपलब्ध करून देण्याचे कामही या केंद्राकडे आहे. या कामासाठी ग्रंथपाल, वर्गीकरणकार व सूचिकार, पुस्तके व दस्तऐवज संरक्षण-तज्ज्ञ, भाषातज्ज्ञ यांचे सहाय्य घेण्यात येते. नवी दिल्ली केंद्र ६५ भाषांमधील आणि २५ लिप्यांतील कागदपत्रे व ग्रंथ हाताळते. त्यासाठी त्या त्या देशांतही उपकेंद्रे उघडलेली आहेत.

या सर्व देशांतील प्रकाशनसंस्थांशी व शिक्षण संचालनालयांशी सतत संपर्क ठेवून नवीन पुस्तकांची माहिती संकलित केली जाते. राष्ट्रीय ग्रंथजत्रांमध्ये सहभागी होऊन तसेच वेगवेगळ्या मार्गांनी नवीन पुस्तकांची माहिती मिळवण्यासाठी तज्ज्ञांचेही सहकार्य घेतले जाते. लेखक-प्रकाशक-अभ्यासक व ग्रंथपाल यांच्या सतत चालू असणाऱ्या संपर्कातून उपयुक्त ग्रंथ व कागदपत्रे, हस्तलिखिते, ध्वनिफिती, चित्रफिती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो.

जमा होणाऱ्या साहित्याची सूची बनवणे, त्याच्या आवश्यक तेवढ्या प्रती मिळवणे आणि त्या त्या विभागीय ग्रंथालयाला पाठवणे यासाठीही स्वतंत्र यंत्रणा कार्य करत असते. अधिकृत गॅझेट्स, वृत्तपत्रे, नियतकालिके, न्यायालयांचे निवाडे, कलाकृती, शास्त्रीय संशोधन प्रकल्पांचे अहवाल, स्वामित्व हक्काचे तपशील, नकाशे, अनुबोधपट, जातीनिहाय व धर्मनिहाय संस्थांच्या कामकाजाचे अहवाल, स्वयंसेवी संघटनांनी केलेल्या प्रकल्पांचे अहवाल, ललित तसेच माहितीपूर्ण ग्रंथ, अनुवादित ग्रंथ, पुस्तक परीक्षणे असे वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य गोळा करण्यात येते. त्यावरून हा व्याप किती प्रचंड आहे याचा थोडाफार अंदाज येऊ शकेल.

उपयुक्त तेवढेच साहित्य संकलित व्हावे, यासाठी अनेक पथ्ये पाळण्यात येतात. येणारे सर्वच साहित्य संदर्भाला उपयुक्त असते असे नाही. त्यामुळे निवड करणे क्रमप्राप्त असते.

जमा होणाऱ्या वा मिळवण्यात येणाऱ्या साहित्याची तपशीलवार नोंद करून,

त्याचे वर्गीकरण करणे व त्याची अधिकृत सूची तयार करणे हे काम फार महत्त्वाचे आणि जबाबदारीचे असते. लायब्ररी ऑफ काँग्रेसने या सूची-निर्मितीच्या तंत्राचे एक स्वतंत्र मॅन्युअलच निर्माण केले आहे. खास प्रशिक्षित सूचिकारांकडे सूचिनिर्मितीचे काम सोपण्यात आलेले असते. भारतातील केंद्रातर्फे येथे जमविण्यात येणाऱ्या साहित्याची सूची येथेच तयार करण्यात येते. ग्रंथालयाच्या वेबसाइटवर ही सर्व सूची उपलब्ध होऊ शकते. लेखक, विषय, शीर्षक वगैरेच्या अनुषंगाने वेगवेगळ्या सूची तयार केल्या जातात. त्यामुळे हव्या त्या विषयाचा शोध चटकन् लावणे सोपे जाते.

नवी दिल्ली येथील केंद्राला वर म्हटल्याप्रमाणे २५ वेगवेगळ्या लिपीतील आणि ६५ भाषांतील साहित्याचे संकलन आणि वर्गीकरण करावे लागते. वर्षाला सुमारे १५ हजार नोंदी आणि ९ हजार सूची तयार कराव्या लागतात. १९९० पासून दिल्ली केंद्राने पावणेदोन लाख नोंदींची सूची केलेली आहे. या सूचीचा उपयोग ४४ ग्रंथालयांना होतो. एवढेच नव्हे तर इतर ग्रंथालयांनाही होतो. ब्रिटिश लायब्ररी या उपक्रमात अधिकृतपणे सहभागी झालेली नाही; परंतु या सूचीचा उपयोग आम्हीही करून घेतो असे ब्रिटिश लायब्ररीच्या ओरिएंटल अँड इंडिया ऑफिस कलेक्शन्स विभागाचे प्रमुख ग्रॅहॅम शॉ यांनी स्पष्ट केले आहे.

काही संदर्भसाहित्य मायक्रोफिल्मच्या रूपात साठवून ठेवण्याचा मार्ग सध्या ग्रंथालयांना सोयीचा वाटतो. वृत्तपत्रांचे वर्षभरातील अंक, जीर्णशीर्ण झालेली मासिके व हस्तलिखिते ही वरचेवर हाताळली तर फाटून जातात; कुचकामी ठरतात. ती मायक्रोफिल्मद्वारे वर्षानुवर्षे व्यवस्थित ठेवता येतात. त्यासाठी जागाही कमी लागते. नवी दिल्ली केंद्राने आजवर ३५ लाख फूट लांबीची मायक्रोफिल्म (३५ रील्स) तयार केलेली आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील ४७१ दैनिकांचे व नियतकालिकांचे अंक सध्या नित्यनेमाने मायक्रोफिल्म स्वरूपात जपून ठेवण्यात येत आहेत. दरवर्षी सुमारे एकहजार पुस्तके व शासकीय कागदपत्रे मायक्रोफिल्मवर घेण्यात येतात. कॉपीराइट कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या पुस्तकांच्या मायक्रोफिल्म करताना रीतसर परवानगी घेण्यात येते आणि मायक्रोफिल्मच्या प्रतीही गरजेनुसार इतर ग्रंथालयांना पुरवण्यात येतात. जुने ग्रंथ दुर्मिळ असतात; त्यांचे पुनर्मुद्रण होणेही अवघड ठरते. मायक्रोफिल्मच्या स्वरूपात त्यांचे जतन करणे सुलभ ठरते. मायक्रोफिल्मवर पुस्तके घेणे व त्याचा वापर जास्तीत जास्त सुकर होणे यासाठी नवी दिल्ली केंद्र निरनिराळ्या देशांतील तरुणांसाठी प्रशिक्षणवर्ग घेते.


वेगवेगळ्या ग्रंथालयांतील दुर्मिळ पुस्तके व हस्तलिखिते मायक्रोफिल्मच्या स्वरूपात जतन करण्यासाठी भारत सरकारच्या सहकार्याने एक प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी १५ भाषांतील २२ हजारावर ग्रंथांचे मायक्रोफिल्मिंग पूर्ण करण्यात आले आहे.



१९६२ ते १९९६ या काळात नवी दिल्ली केंद्रातर्फे दरवर्षी नवीन ग्रंथांच्या याद्या प्रकाशित केल्या जात. १९९८ नंतर 'दि साऊथ एशियन बिब्लिओग्राफर' हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत होते. आता इंटरनेटवर ही सर्व माहिती सहजी उपलब्ध होते आहे, त्यामुळे हे प्रकाशन बंद करण्यात आले आहे.


जगातील या सर्वात मोठ्या ग्रंथालयात निवडक मराठी पुस्तकांचीही दरवर्षी भर पडत असते. मेहता पब्लिशिंग हाऊसकडे मराठी पुस्तकांची प्राथमिक सूची करण्याचे कार्य सोपवण्यात आले आहे. जास्तीत जास्त मराठी पुस्तके अमेरिकेत व जगभर जावी असा प्रयत्न निश्चितच केला जाईल. अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेसला जागेच्या मर्यादेमुळे प्रत्येक नवे पुस्तक संग्रही ठेवता येत नाही. पाठ्यपुस्तके, बेस्ट सेलर पुस्तके, सुलभ विज्ञान, इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवाद, जशीच्या तशी पुनर्मुद्रणे असणाऱ्या आवृत्त्या यांना या ग्रंथालयात जागा दिली जात नाही. नवीन माहिती, नवीन तपशील, नवीन ज्ञान वा विश्लेषण असणारी पुस्तके निवडण्यास प्राधान्य असते. त्यामुळे सर्वच मराठी पुस्तके या सूचीत जाऊ शकणार नाहीत. परंतु स्वत:चे काही वैशिष्ट्य असणारी, मौलिक व अभ्यासपूर्ण पुस्तके निश्चितच या सूचीत स्थान मिळवू शकतील.

मराठी प्रकाशक-लेखक व ग्रंथव्यवहाराशी संबंधित व्यक्ती यांनी याबाबत जागरुकपणे सहकार्य करावे असे आवाहन करावेसे वाटते.



ज्येष्ठ पत्रकार खुशवंतसिंग यांच्या खुसखुशीत शैलीतील, मृत्यूविषयक ललितलेख संग्रह

मृत्यू... माझ्या उंबरठ्याशी



**खुशवंत सिंग** **अनु. सुप्रिया वकील**

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

# साहित्यवार्ता

## * सातारा ग्रंथमहोत्सव

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात या वर्षीचा सातारा ग्रंथमहोत्सव जिल्हा परिषदेच्या मैदानावर पार पडला. 'सातारा पॅटर्न, मिनी साहित्य संमेलन' अशी बिरुदावली घेऊन लोकप्रिय झालेला हा महोत्सव या वर्षीही 'अक्षरप्रेमीं'च्या उदंड प्रतिसादाने रंगला.

ग्रंथ महोत्सवाचा 'सातारा' पॅटर्न' सात वर्षांपूर्वी सुरू झाला. कोणताही भपकेबाजपणा, डांगोरा न पिटता या महोत्सवाने दर्जेदार कार्यक्रमांच्या माध्यमातून 'अक्षरप्रेमीं'च्या मनात अढळ स्थान निर्माण केले. सातारा महोत्सव होणार, याची खात्री असल्याने अनेकजण पुस्तके घेण्यासाठी या महोत्सवाची वाट पाहत असतात. त्याला संयोजन समितीच्या वतीनेही तेवढाच प्रतिसाद दिला जातो. वाचकांची वाढती अपेक्षा लक्षात घेऊन संयोजन समितीच्या वतीने बदल केले जातात. गतवर्षीपर्यंत साठ स्टॉलची असलेली मर्यादा बाजूला ठेवत या वर्षी ऐंशी स्टॉल उभारण्यात आले, यावरून ग्रंथमहोत्सवाला मिळणारा प्रतिसाद लक्षात येतो.

या वर्षी पुस्तकांच्या खरेदी-विक्रीत सुमारे एक कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

दरवर्षीप्रमाणे ग्रंथदिंडीने महोत्सवाची सुरुवात झाली. सातारा शहरातील शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दिंडीत सहभाग घेतला. ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक प्रा. डॉ. आनंद पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. शिक्षणसंचालक दिलीप गोगटे हे मुख्य पाहुणे होते. मराठीच्या दांभिकतेवर आक्रमक हल्ला चढवत डॉ. पाटील यांनी 'इंग्रजी बचाओ' अशा आरोळ्या देत इंग्रज कुठे फिरतात का? राज्यात ठराविक हंगामात 'मराठी बचाओ'ची घोषणा केली जाते. आपणच मराठीचे मारेकरी आहोत, त्यामुळे 'मराठी बचाओ'ची भूमिका उबळ आणणारी व ढोंगी वाटते, अशा शब्दांत दांभिकतेचा समाचार घेतला. त्यानंतर पहिल्या दिवशी 'हसवणूक', 'एक मनमोकळा संवाद' कार्यक्रमांनी महोत्सव रंगण्यास सुरुवात झाली. सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांची अभिराम भडकमकर यांनी घेतलेली मुलाखत महोत्सवाचे आकर्षण ठरली. शनिवारची सकाळ उगवली ती बहिणाबाईंच्या कवितांनी. 'खानदेशचा मळा आणि मराठवाड्याचा गळा' कार्यक्रमाने बहिणाबाईंच्या कवितांना पुन्हा उजाळा मिळाला. कार्यक्रमांची जंत्री मोठ्या संख्येने



होती. समारोपात भारुडाचार्य डॉ. रामचंद्र देखणे यांनी संमेलनाच्या नेटकेपणाविषयी मांडणी केली. श्याम भुर्के यांनी शरद तळवलकरांच्या विनोदाचे मर्म उलगडून दाखवले.

वाचनसंस्कृतीवरील परिसंवादात रवींद्र पिंगे, शंकर सारडा, काका विधाते, प्रा. विलास पाटील वगैरेंचा सहभाग होता.

## * सोलापूर येथील बालकुमार साहित्य संमेलन

प्रथितयश लेखकांनी केवळ प्रौढ साहित्यात गुंतून न राहता कर्तव्य भावनेने बालसाहित्यही लिहिले पाहिजे. प्रत्येक लेखकाने उत्तमोत्तम साहित्य मुलांसाठी दिले पाहिजे. बालसाहित्याविषयी आज पोटतिडीक दिसत नाही, हे चित्र बदलायला हवे. बालसाहित्याचा अभ्यास विद्यापीठातही व्हावा, अशी अपेक्षा सोलापूर येथील विसाव्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनात अध्यक्षा कवयित्री विजया जहागीरदार यांनी व्यक्त केली.

संमेलनाच्या मावळत्या अध्यक्षा लीला दीक्षित यांनी नूतन संमेलनाध्यक्षा सौ. जहागीरदार यांच्या गळ्यात सुवर्णपदक घालून त्यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रे सोपविली. यावेळी माजी संमेलनाध्यक्ष शंकर सारडा, अ.भा. बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यकारी विश्वस्त दत्ता टोळ, रामकृष्ण बेटावदकर यांच्यासह सुमारे दोन हजार शालेय विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

विजया जहागीरदार यांनी अध्यक्षीय भाषणात विविध मुद्द्यांना स्पर्श केला. मुलांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न होण्याची गरज प्रतिपादित केली. यात वाचनाची आवड, संस्कार, पालकांची जबाबदारी, बालकविता, कथेचे स्वरूप, निरक्षर मुलांसाठी करावयाचे कार्य आदी मुद्द्यांचा समावेश होता.

आजही आठ लाख ३० हजार मुले निरक्षर आहेत. त्यांच्यासाठी सहा सूचना संमेलनाध्यक्षांनी मांडल्या. टीव्हीवरील एका चॅनेलवर जाहिराती व ब्रेकशिवाय दिवसभर फक्त शिकवणीचा कार्यक्रम चालू रहावा, रात्रशाळा सुरू व्हाव्यात, निरक्षर मुलांच्या गटांसाठी अक्षरओळख करून देणाऱ्या व्हीडिओ कॅसेट काढाव्यात, निरक्षर मुलांच्या प्रगतीसाठी धनवंतांनी पुढे यावे, असे त्यांनी सुचविले. संस्कारवर्ग ही चांगली संकल्पना आहे. परंतु एकीकडे मुलांवर संस्कार करीत असताना पालकवर्गाची स्वत:ची वागणूक मुलांच्या मनावर विपरीत परिणाम करणारी ठरते. संस्कारवर्गात जे पेरले ते निदान तसेच राहू द्या. ते उद्ध्वस्त होऊ देऊ नका, असा सल्लाही त्यांनी पालकांना दिला.

मुलांमध्ये साहित्य वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी कोकणात ज्याप्रमाणे प्रयत्न झाले तसे प्रयत्न अन्यत्रही व्हावेत. नूतन संमेलनाध्यक्षा विजया जहागीरदार या समर्थ कवयित्री आहेत. त्यांचे कार्य भावी काळातही उत्तम तऱ्हेने चालू राहील, असा विश्वास मावळत्या संमेलनाध्यक्षा लीला दीक्षित यांनी व्यक्त केला.

## * याना गुप्ता आता लेखिका

प्रसिद्ध मॉडेल याना गुप्ता आता चक्क लेखिका बनणार आहे. याना आपल्या आहाराबाबत अतिशय दक्ष असल्याने ती आता याच टिप्स शब्दबद्ध करणार आहे. पुढील वर्षी हे पुस्तक वाचकांना मिळेल. 'पेंग्विन पब्लिकेशन्स' हे पुस्तक प्रकाशित करणार आहे.

''मी १६ वर्षांची असल्यापासूनच आपल्या आहाराबाबत अतिशय काळजी घेते आहे. मी फिटनेस मार्गदर्शक आहे आणि ॲक्युपंक्चर उपचारप्रणालीही मला माहीत आहे. माझ्या पुस्तकात मी पोषक आहाराबाबत वाचकांना काही कानमंत्र देईन. मी 'डाएटिंग'ची शिफारस करणार नाही. उलट योग्य मार्गदर्शन घेऊन रोज पाच ते सहा वेळा थोडे-थोडे अन्न खाल्ले पाहिजे, असे माझे मत आहे,'' असे यानाने सांगितले.

## * वैदर्भी साहित्यिक दि. वि. जोशी यांचा स्मृतिदिन

विदर्भातील साहित्यिक दि. वि. जोशी यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त जळगाव (जामोद) बुलढाणा येथे विविध कार्यक्रम संपन्न झाले.

दि.विं.च्या तीन पुस्तकांचे प्रकाशनही या प्रसंगी करण्यात आले. 'स्वप्नांना पंख नसतात', 'चंद्रमे जे अलांछन' ही दोन नाटके व 'डांगरवाडी' हा कथासंग्रह प्रकाशित झाले.

याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ पत्रकार भास्कर भट म्हणाले, ''दि.विं.नी ७ कादंबऱ्या, २० एकांकिका, ४० नभोनाट्ये आणि इतरही बरीच ग्रंथसंपदा निर्माण केली. त्यांच्या साहित्यावर एम.फिल. व पीएच.डी. सारखे प्रबंध सादर केले गेले. 'बालभारती'नेही आपल्या अभ्यासक्रमात त्यांच्या कथासंग्रहांची दखल घेतली. या साहित्यिकाचा स्मृतिदिन अशाच उपक्रमांनी साजरा होणे आवश्यक आहे.

## * 'टॉम ॲण्ड जेरी'चे निर्माते जोसेफ बार्बरा यांचे निधन

जगभरातील आबालवृद्धांना आनंद देणाऱ्या 'टॉम ॲण्ड जेरी' या कार्टून मालिकेचे निर्माते आणि हॉलिवूडचे प्रसिद्ध ॲनिमेटर जोसेफ बार्बरा (वय ९५) यांचे १९ डिसेंबरला निधन झाले.

बार्बरा यांनी पत्नी बिल हॅना यांच्यासह स्थापन केलेल्या हॅना-बार्बरा स्टुडिओचे कार्टूनपट आणि त्यांनी चितारलेली पात्रे हा अमेरिकी संस्कृतीचा मौल्यवान ठेवा मानला जातो. दिवसभरात त्यांचे कार्टून न पाहणारा अमेरिकन विरळाच. गेल्या अर्धशतकात माध्यमे बदलत गेली; पण 'टॉम ॲण्ड जेरी'ची जादू कायम राहिली, नव्हे ती जगभर विस्तारली. ॲनिमेशन या तंत्राचे तर ते संस्थापकच मानले जातात. हॅना-बार्बरा जोडी ॲनिमेशन क्षेत्रात 'जोडी नंबर वन' होती. त्यांनी अनेक अविस्मरणीय पात्रे निर्माण केली. या पात्रांच्या रूपाने ते कायम आठवणीत



राहतील. या पात्रांनी काही पिढ्यांना झपाटले आहे. जगभरातील प्रेक्षकांना वर्षानुवर्षे आनंद देणाऱ्या मोजक्या कलाकारांपैकी ते होते. हॅना यांचे २००१ मध्ये निधन झाले. बार्बरा-हॅना यांची जीवनातील आणि कलाक्षेत्रातील भागीदारी साठ वर्षांची होती. ही प्रतिभासंपन्न भागीदारी उत्तरोत्तर बहरत गेली. तिने टॉम ॲण्ड जेरीसह अनेक पात्रांना जिवंत केले. बार्बरा शेवटपर्यंत सक्रिय होते.

## * ऐतिहासिक शब्दकोशाचे प्रकाशन

'वैभवशाली इतिहासाकडे दुर्लक्ष झाले असून, त्याचे भान आपल्याला राहिलेले नाही. ही समाजासाठी शोकांतिका आहे. चुकीची शिक्षणपद्धतीही त्याला कारणीभूत आहे,'' असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

'डायमंड पब्लिकेशन्स'च्या 'ऐतिहासिक शब्दकोशा'चे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष डॉ. ज. वि. नाईक, इतिहासतज्ज्ञ अ. रा. कुलकर्णी व प्रा. राजा दीक्षित, 'डायमंड पब्लिकेशन्स'चे दत्तात्रेय पाष्टे आणि शब्दकोशकार य. न. केळकर यांचे चिरंजीव विनायक केळकर आदी यावेळी उपस्थित होते.

इतिहासाचा विसर पडला, तर येणारा भविष्यकाळ माफ करत नाही असे सांगून डॉ. जाधव म्हणाले, ''अनेक ऐतिहासिक स्थळांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले असून, इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यात इतिहासकार आणि इतिहासाचे शिक्षक कमी पडले आहेत. हा आपला पराभव आहे. इतिहास जागृत ठेवण्यासाठी 'ऐतिहासिक शब्दकोशा'सारख्या उपक्रमातून पुस्तकातून समाजाचे प्रबोधन होऊ शकेल.''

कोशलेखन ही इतिहासलेखनासारखी अखंड चालणारी प्रक्रिया आहे. सातत्याने त्यामध्ये नवनव्या शब्दांची भर पडत असते. इतिहासासारख्या ज्ञानशाखेसमोरील आव्हानांना तोंड देण्याची क्षमता शब्दकोशांमुळे प्राप्त होईल, असा विश्वास श्री. दीक्षित यांनी व्यक्त केली.

## * जोहान्सबर्गमध्ये संस्कृतचे धडे

'संस्कृत शिकायचे असेल, तर तुमच्या मुलांना जोहान्सबर्गमधील सेंट जेम्स प्राथमिक शाळेत पाठवा आणि ती घरी आल्यानंतर त्यांच्याकडून ही भाषा शिका!'

दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखाची ही सुरुवात आहे. मुख्याध्यापक पीटर स्टेन यांनी आपल्या शाळेच्या उपक्रमाची माहिती सांगतानाच, संस्कृतची महतीही वर्णन केली आहे. 'संस्कृतमधील प्रार्थना छान आणि विश्वात्मक भाव व्यक्त करणाऱ्या आहेत. धार्मिक भेदांच्या पलीकडची शिकवण त्यातून मिळते. आम्ही मुलांना त्या प्रार्थना शिकवतो,'' असे त्यांनी सांगितले. या शाळेत पहिलीपासून संस्कृत शिकवले जाते आणि विद्यार्थ्यांना आवड असल्यास चौथीच्या पुढे विशेष शिक्षण दिले जाते, असेही त्यांनी सांगितले.

संस्कृत ही अनेक पौर्वात्य व पाश्चात्त्य भाषांची मूळ भाषा असल्याचे सांगताना त्यांनी 'दा' या धातूचे उदाहरण दिले आहे. लॅटिनमध्ये 'डोनम' असा शब्द असून, इंग्रजीत 'डोनेट' असा शब्द असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेतील काही विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अनुभवही लेखात दिले आहेत. लिऑन मॅक्लेरन यांनी १९७५ साली ब्रिटनमध्ये एक शिक्षणसंस्था सुरू केली. या संस्थेच्या सेंट जेम्ससारख्या शाळांमध्ये संस्कृतबरोबर इतर प्राचीन भाषाही शिकवल्या जातात.

### * अभिनेता देव आनंदचे आत्मचरित्र

''सर्वसामान्यांप्रमाणे माझ्या आयुष्यातही अनेक चढउतार आले. आयुष्याचा भरपूर आनंद घेतला, तसे दु:खाचे तितकेच चटकेही सोसले. तरीदेखील 'रोमान्सिंग विथ लाइफ' या पुस्तकाच्या शीर्षकाप्रमाणे मी माझे आयुष्य जगलो. 'जो चोट और खुशी मुझे रुलाके गई, वही ये किताब है,'' अशा भावना चिरतरुण अभिनेते देव आनंद यांनी व्यक्त केल्या.

'रोमान्सिंग विथ लाइफ' हे देव आनंद यांचे आत्मचरित्र इंग्रजीबरोबरच हिंदी, मराठी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्येही एकाच वेळी प्रकाशित होणार आहे. 'पेंग्विन' या प्रकाशन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित होईल. वांद्रे येथील आनंद रेकॉर्डिंग स्टुडिओत झालेल्या एका विशेष सोहळ्यात देव आनंद यांनी या पुस्तकाचे हस्तलिखित प्रकाशकांकडे सोपविले.

अवास्तव आत्मस्तुती आणि खरेपणाचा अभाव, हा दोष बऱ्याच आत्मचरित्रांमध्ये आढळतो. परंतु आपले आत्मचरित्र त्यास अपवाद ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काही दशकांपूर्वी देव आनंद आणि सुरैया यांच्यातील प्रेमकहाणी खूप गाजली होती. याबाबत आपण या पुस्तकात भाष्य केले असले, तरी पुस्तकातील इतर मजकुरामुळे कोणी दुखावले जाणार नाही, अशीही त्यांनी पुस्ती जोडली.

### * तरुण बुद्धिवंतांमधून 'रामानुजन' शोधा!

भारताला 'ज्ञानाधिष्ठित शक्ती' बनवायचे असेल, तर देशातील तरुण बुद्धिवंतांमधील लपलेले 'रामानुजन' शोधून काढणे आणि त्यांच्यासाठी रोजगारनिर्मिती करणे, यासाठी 'आयआयटीयन्स'नी पुढाकार घ्यावा, असे आवाहन राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आयआयटी) या शिक्षणसंस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात केले.

'इनस्पायर, इन्वॉल्व्ह आणि ट्रान्सफॉर्म' म्हणजेच आयआयटी अशी 'थीम' असलेल्या 'पॅन आयआयटी' मेळाव्याचे उद्‌घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते भारताबरोबर जगभरातील वीस देशांमध्ये विखुरलेल्या जवळपास चार हजार आयआयटीन्सनी कार्यक्रमाला हजेरी लावली.

पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे आढावा घेत राष्ट्रपतींनी भविष्यातील आव्हानांचीही जाणीव उपस्थितांना करून दिली. 'या देशाला कमी उत्पादनखर्चात घरे, ऊर्जा, रस्ते कसे देता येतील, यासाठी प्रयत्न करावेत,' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ब्रिटिशकालीन गणितज्ज्ञ डॉ. रामानुजन यांचा दाखला देत ते म्हणाले की, या देशातील आतापर्यंत कधीही प्रकाशात न आलेल्या तरुणांमधील बुद्धिवंतांना पुढे आणण्यासाठी आयआयटीन्सनी पुढाकार घ्यावा. भारत ज्ञानाधिष्ठित शक्ती बनण्याच्या मार्गावर आहे. त्यासाठी, रोजगार शोधणाऱ्या नव्हे, तर रोजगारनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या लघुउद्योजकांची गरज आहे. शेती, ऊर्जा, तंत्रज्ञान, उत्पादन, सेवा या सर्वच क्षेत्रात भारताचा आर्थिक विकासाचा आलेख उंचावणारा आहे. तो जर तसाच उंचावत न्यायचा असेल, तर देशाला उत्तम दर्जाची स्वस्त घरे कशी देता येतील, याचा विचार आयआयटीन्सनी करावा. घरांबरोबर वीज, पाणी, रस्ते आदींची स्वस्त उपलब्धता देशाला हवी आहे,' अशी जाणीवही राष्ट्रपतींनी करून दिली. देशातील विद्यापीठ व्यवस्थेशीही आयआयटीन्सनी एकरूप व्हायला हवे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### * 'कालनिर्णय' : जगातील सर्वाधिक खपाचे प्रकाशन

जगातील सर्व भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या प्रकाशनांमध्ये 'कालनिर्णय' हे सर्वाधिक खपाचे प्रकाशन बनले असून 'ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन्स' या संस्थेने या दिनदर्शिकेवर तसे शिक्कामोर्तब केले आहे. सुमंगल प्रकाशनाच्या वतीने काढण्यात येणारी 'कालनिर्णय' दिनदर्शिका १ कोटीहून अधिक घरांच्या भिंतीवर विराजमान असते. मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तामिळ आणि तेलगू या भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या 'कालनिर्णय'मध्ये नामवंत लेखक आणि तज्ज्ञांनी लिहिलेले लेख, निवडक पाकक्रिया, भविष्य आणि पंचांग आदी माहिती समाविष्ट असते. याखेरीज ठराविक ग्राहकवर्ग डोळ्यासमोर ठेवून 'कालनिर्णय'च्या स्वादिष्ट, आरोग्य, ऑफिस, सौंदर्य, ब्यूटी, कार, डेस्क, ब्रेल, पॉकेट डायरी अशा विविध प्रकारातील आवृत्त्या प्रकाशित केल्या जातात. 'कालनिर्णय २००७' दिनदर्शिकेत नेहमीच्या बहुविध विषयांबरोबरच धर्माचरणातील शिस्त (ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर), परिपूर्ण साहचर्य (अशोक नायगावकर), गृहिणीपद अमेरिकन स्टाइल (डॉ. मीना नेरुरकर), मुलांचा अभ्यास- काही खोल जाणिवा (डॉ. मनोज भाटवडेकर), विवेकानंद, संत आणि अंधश्रद्धा निर्मूलन (डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर), आभासाचं वास्तव (अच्युत गोडबोले), फॅशन : कालसुसंगती (अनघा खारकर), सुखी संसाराची चतु:सूत्री (डॉ. आशा भेंडे), कृतज्ञता (प्रा. राम शेवाळकर) या नामवंत लेखकांच्या लेखांचा सहभाग आहे.

### * कवी अनिलांवर जीवनपट

'अजून यौवनात मी', 'गगनी उगवला सायंतारा', 'आज अचानक गाठ पडे'

यांच्यासारख्या चिरतरुण रचना लिहिणाऱ्या आत्माराम रावजी देशपांडे उर्फ कवी अनिल यांच्या पत्नी आणि बंडखोर लेखिका कुसुमावती देशपांडे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. याचे औचित्य साधून सुधीर मोघे 'कुसुमानिल' या नावाचा जीवनपट काढणार आहेत.

या जीवनपटाची निर्मिती अनिलांचे ज्येष्ठ चिरंजीव शिरीष आणि त्यांच्या पत्नी आशा आहेत. 'चित्रकथी' बॅनरखाली निर्माण होत असणाऱ्या या माहितीपटाचे कॅमेरावर्क देबू देवधर करणार आहेत. याशिवाय आनंद मोडक यांचे संगीत लाभणार आहे. 'कुसुमानिल'मध्ये अनिलांच्या काही गीतांना नव्या चाली लावून रंगमंचीय रूप देण्याचीही कल्पना आहे.

### * नव्या ग्रंथालयांसाठी निधी

गेल्या ऑक्टोबरमध्ये राज्य सरकारने नवीन ग्रंथालयांसाठी लागू केलेल्या निकषांनंतर पुणे जिल्ह्यातून २४२ प्रस्ताव दाखल झाले आहेत. सरकारने दिलेल्या मुदतीत या सर्व प्रस्तावांची छाननी होणे अशक्य असून, नव्या ग्रंथालयांसाठीचा निधी कुठून येणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अशासकीय ग्रंथालयांना शासनमान्यता देण्यासाठीचे निकष राज्य सरकारने ७ ऑक्टोबर रोजी जाहीर केले. त्यानंतर पुणे जिल्ह्यातून तब्बल २४२ अर्ज दाखल झाले. जिल्हा समित्यांनी या प्रस्तावांची छाननी ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र, बऱ्याच प्रस्तावांची छाननी बाकी आहे, अशी माहिती पुणे जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह सोपान पवार यांनी दिली.

ते म्हणाले, ''जिल्हा समित्यांमार्फत ग्रंथालयाच्या प्रस्तावांचे निरीक्षण आणि गुणांकन नोव्हेंबर महिनाअखेरपर्यंत होणे आवश्यक होते. त्यानंतर विभागीय समित्यांनीही आवश्यक ते निरीक्षण करून गुणांकनाचा अहवाल राज्य समितीकडे २५ डिसेंबरपर्यंत सुपूर्त करायचा होता. मात्र, अद्याप जिल्हा समित्यांकडून अनेक प्रस्तावांचे निरीक्षण अपुरे राहिले आहे. त्यामुळे ही प्रक्रिया यंदा रखडणार अशीच चिन्हे आहेत.''

जिल्हा नियोजन मंडळाकडून अनुदान उपलब्ध झाले, तरच नवीन ग्रंथालयांना मान्यता देणे शक्य होते. या सर्व प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी चाळीस लाख रुपयांचे अनुदान लागेल. मात्र, सध्या सरकारकडे उपलब्ध असलेले अनुदान केवळ सात लाख रुपयांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे अनेक प्रस्ताव फेटाळले जाण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी सांगितले.

### * जब्बार पटेल डॉ. आंबेडकरांविषयी पुस्तक लिहिणार..

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महामानवावर चित्रपट काढताना त्यादरम्यान आलेले विविध अनुभव चित्रपटाचे दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी कथन केले. या अनुभवांवर आधारित 'मेकिंग ऑफ आंबेडकर' पुस्तक लिहिण्याचा



मानसही त्यांनी व्यक्त केला.

नुकत्याच नऊ भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' चित्रपटाच्या निमित्ताने 'पॉप्युलर साहित्य साधना' उपक्रमांतर्गत डॉ. पटेल यांची उर्मिला पवार यांनी मुलाखत घेतली.

''डॉ. आंबेडकर यांचे दैवीकरण झाले, असे म्हणणे चुकीचे असून, त्यांचा विचार मोठा आहे. तो सर्वदूर रुजतो आहे. त्यामुळेच आरक्षणाला विरोध करण्यापेक्षा त्याकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने बघणे गरजेचे आहे. स्पर्श आणि बोलण्यातून जात नाहीशी झाली असली, तरी अद्याप नजरेतून ती नष्ट झालेली नाही,'' असे डॉ. पटेल म्हणाले.

धनंजर कीर लिखित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांच्यावरील चरित्रग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशनही डॉ. पटेल यांच्या हस्ते झाले. 'पॉप्युलर प्रकाशना'चे रामदास भटकळ या प्रसंगी उपस्थित होते.

### * 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'चे आगामी एक ते दीड वर्षात खंड सात आणि आठ प्रकाशित होतील. आधुनिक काळातील इंग्रजीचे महत्त्व जाणून परिषदेने आरंभापासून ते १९५० पर्यंतचा वाङ्मय इतिहास खंड इंग्रजीतूनही दोन भागांत प्रकाशित केला आहे. ज्येष्ठ लेखक प्रा. रा. ग. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील तरुण अभ्यासक या उपक्रमात सामील होत आहेत. या खंडांसाठी प्रा. विजय तापस, पुष्पा राजपुरे, अक्षयकुमार काळे, डॉ. रेखा इनामदार-साने, डॉ. विलास खोले, प्रा. यशवंत सुमंत, चंद्रकांत बांदिवडेकर, डॉ. वीणा देव, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अश्विनी धोंगडे, मंगला गोडबोले लेखन करीत आहेत.

### * मराठीत नव्या विचार प्रवाहाची गरज

मराठी साहित्य ही कोणा एका वर्गाची मक्तेदारी राहिलेली नाही. गावकुसाबाहेर राहणारे लोकही आता उत्तम प्रकारे लिहू लागले आहेत; परंतु बदलत्या परिस्थितीबरोबरच साहित्यात नवे विचार, नवे प्रवाहही येणे गरजेचे आहे, असे विचार डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी व्यक्त केले.

सांबरा (ता. बेळगाव) येथील माय मराठी संघातर्फे आयोजित केलेल्या मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

श्री. लवटे म्हणाले, ''वेश्या, हिजडे व उपेक्षित समाजातील लोकही आपल्या व्यथा आता साहित्यात मांडू लागले आहेत. मराठी साहित्य हे सर्व विचारप्रवाहांना बरोबर घेऊन जाणारे साहित्य आहे. आज खऱ्या अर्थाने सांस्कृतिक समृद्धीची गरज आहे. भाषा आणि संस्कृती जागवितो, तोच देश जिवंत राहतो.''

साहित्य संमेलनांना आज साहित्यिक जत्रेचे रूप आल्याचे सांगून ते म्हणाले, ''मराठी माती आणि मराठी भाषेवर मराठी माणूस जिवापाड प्रेम करतो. त्यावर घाला घातल्यास कुणी सहन करणार नाही. मराठीचा झेंडा सर्वत्र फडकावला पाहिजे. एकेकाळी मराठी भाषा केवळ हुबळी-धारवाडपर्यंतच नाही तर श्रवणबेळगोळपर्यंत प्रचलित होती. श्रवणबेळगोळ येथील पहिला शिलालेख मराठी भाषेत लिहिलेला आहे. यासाठी कारवारपर्यंतचाच नाही, तर श्रवणबेळगोळपर्यंतचा भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची मागणी केली पाहिजे. अशी मागणी केल्याशिवाय सीमाप्रश्नावर चर्चा होणार नाही. येथे ग्रामीण साहित्य संमेलनाची चळवळ २२ वर्षांची झाली. प्रत्येक गावात अशी संमेलने भरली पाहिजेत. महाराष्ट्रातील साहित्यंमेलने सरकारी पैशातून होतात, तर सीमाभागातील साहित्यसंमेलने लोकवर्गणीतून, लोकांच्या उत्साहातून होतात ही महत्त्वाची गोष्ट आहे. अशा साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी मनं जागविण्याचे काम होत आहे.

किरण ठाकूर यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. उद्योगपती टोपण्णा पाटील यांनी सरस्वतीपूजन तर गोमटेशचे अधिष्ठाता संजय पाटील यांनी गणेशपूजन केले.

### * 'संस्कृती ग्रंथ दालन'चे उद्घाटन

सौ. सुनीताराजे पवार यांच्या संस्कृती प्रकाशनने अप्पा बळवंत चौकात 'संस्कृती ग्रंथ दालन' सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन अ.भा. नाट्य परिषदेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी आ. उल्हासदादा पवार, प्रा. रा. ग. जाधव, शंकर सारडा, प्रा. व. बा. बोधे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. प्राचार्य वसंत वाघ, प्रा. यशवंत पाटणे, कि. स. पवार आणि प्रकाशक, ग्रंथविक्रेते, चित्रकार-ग्राहक हेही या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित होते. (संस्कृत ग्रंथ दालन, ६८८, नारायण पेठ, पुणे ३०. फोन-९८२३०६८२९२)

### * वसाहतवादी शिक्षण पद्धती सोडणे आवश्यक

''स्वातंत्र्यानंतरही कारकून तयार करणाऱ्या वसाहतवादी शिक्षण पद्धतीला आपण अजूनही चिकटून बसलो आहोत. आदर्श नागरिक निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षण पद्धतीवर आहे. त्यामुळे आता तरी वसाहतवादी शिक्षण पद्धती सोडली पाहिजे,'' असे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक वि. वि. चिपळूणकर यांनी पुणे येथे केले.

चिपळूणकर यांच्या विविध व्याख्यानांतून श्रीमती मालती देशपांडे यांनी संपादित केलेल्या 'उत्कृष्टाचा ध्यास' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते झाले. 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर, पुणे



विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष हणमंत भोसले, संस्थेचे संचालक रामचंद्र शेटे व गजानन संत या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. पुणे विद्यार्थी गृहाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या प्रसंगी शिक्षण संचालक दिलीप गोगटे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पु. ग. वैद्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. वसंत काळपांडे आदींचा सत्कार करण्यात आला.

चिपळूणकर म्हणाले, ''राज्याच्या विविध भागांतून फिरताना समाजजीवनाचे दर्शन घडले. स्वातंत्र्यानंतरही वसाहतवादी शिक्षण सुरू ठेवल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीत बदलण्यासाठी नियंत्रणात्मक प्रशासनापेक्षा विकसनशील प्रशासनाची गरज आहे.

प्रा. जाधव म्हणाले, ''सांस्कृतिक विसंवाद दूर करण्यासाठी उत्कृष्टतेची उपासना करणाऱ्यांनी पुढे आले पाहिजे. शिक्षक हा एकच वर्ग आहे. त्यात प्राथमिक किंवा महाविद्यालयीन अशी वर्गवारी करता येत नाही. विद्यार्थ्यांचे पालक, पाठ्यपुस्तक निर्मिते व खासगी शिकवणी घेणारे यांचाही या वर्गात समावेश होतो.''

### * ब्रेल लिपीत कवितासंग्रह

अवांतर वाचनाची आवड जन्मजात अंधपणावरही कशी मात करते, याचे उदाहरण योगिता भाऊसाहेब काळे या अंध विद्यार्थिनीने घालून दिले. तिने स्वत:च स्वत:साठी व स्वत:सारख्याच अंध व्यक्तींसाठी म्हणून एक कवितासंग्रह थेट ब्रेल लिपीत तयार केला. यासाठी तिला असोसिएशन फॉर ब्लाईंडनेस ॲण्ड लो व्हिजन या संस्थेने प्रेरणा दिली.

योगिता नगर येथील माणिकताई करंदीकर विद्यालयात इयत्ता नववीच्या वर्गात आहे. त्यांची अभ्यासक्रमाची पुस्तके 'नॅब' या संस्थेने तयार केली आहेत. पण त्याशिवाय योगिताला अवांतर वाचनाचीही आवड आहे. ही आवड तिला ती पुस्तके डोळस व्यक्तींकडून वाचून घेऊन भागवावी लागत होती. त्याने वाचायचे व आपण ऐकायचे हे काही योगिताला आवडत नव्हते.

असोसिएशन फॉर ब्लाईंडनेसने मध्यंतरी डोळस व्यक्तींनी ब्रेललिपी शिकावी यासाठी प्रशिक्षणवर्ग घेतला. अंध असूनही योगिता या वर्गाला जायची. ब्रेललिपी शिकायची आणि शिकवायचीही. असे करतानाच संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र सातपुते यांनी तिची अवांतर वाचनाची गोडी हेरली. त्याचबरोबर इतरांकडून वाचून घेताना होत असणारी तिची अडचणही त्यांच्या लक्षात आली. त्यातूनच मग त्यांनी तिला 'चार ओळी तुझ्यासाठी' हा श्रीकृष्ण राऊत यांचा कवितासंग्रह दिला आणि सांगितले, 'हा तू ब्रेललिपीत तयार कर.' डोळ्यासमोर ब्रेललिपीतील हा कवितासंग्रह अन्य अंध व्यक्तींनाही उपयोगी पडावा, असा उद्देश होता.

याच विचाराने, योगितानेही हा चारोळी संग्रह झपाट्याने ब्रेललिपीत तयार

केला. प्रशिक्षक प्रसाद पोळ यांची तिला या कामी मदत झाली. टाचणीने जाड कागदाला भोक पाडल्यानंतर जसा उठाव तयार होतो. त्याप्रामाणे प्रत्येक अक्षरासाठी वेगवेगळा आकार ब्रेललिपीत असतो. यावरून या ४५ पृष्ठांच्या क्राऊन आकाराच्या कवितासंग्रहासाठी योगिताने किती मेहनत घेतली असेल, हे लक्षात येते. 'एक स्वप्न पूर्ण झाले,' असे मनोगतही तिने संग्रहाच्या अखेरीला जोडले आहे.

### * केसरीचा वर्धापनदिन

पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा खांब समजण्यात येते. बदलेल्या परिस्थितीत तो किती मजबूत आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षा प्रभा राव यांनी ४ जानेवारी रोजी व्यक्त केले.

दै. केसरीच्या १२६ व्या वर्धापनदिन व कै. जयंतराव टिळक स्मृती पुरस्कार कार्यक्रमात अध्यक्षपदावरून त्या बोलत होत्या.

केसरीच्या मुशीत तयार झालेल्या ज्येष्ठ पत्रकारांचा यावेळी डॉ. दीपक टिळक, प्रभा राव व सुरेश कलमाडी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये डॉ. शरच्चंद्र गोखले, अरविंद व्यं. गोखले, रामभाऊ जोशी, ल. ना. गोखले, एस. के. कुलकर्णी, एकनाथ बागूल, वि. ना. देवधर, विजय कुवळेकर, वासुदेव कुलकर्णी, सुरेशचंद्र पाध्ये आणि विद्याविलास पाठक यांचा समावेश होता. विविध समाजसेवी संस्थांना याप्रसंगी कै. जयंतराव टिळक व कै. गौरी टिळक स्मृती पुरस्कार देण्यात आले.

माणुसकीने कसे वागायचे, दुसऱ्याचे विचार जाणून घ्यायची वृत्ती कशी जोपासायची, याची शिकवण आम्हाला 'केसरी विद्यापीठा'त मिळाली. अन्यत्र कुठेही हे आम्हाला शिकता आले नसते. त्यामुळेच आम्ही 'केसरी कुळातले' आहोत, हे सांगताना अभिमान वाटतो, अशी भावना 'लोकसत्ता'चे सहायक संपादक अरविंद व्यं. गोखले यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली.

उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या केसरीतील कर्मचाऱ्यांनाही यावेळी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. केसरीचे संपादक डॉ. दीपक टिळक यांनी प्रास्ताविक केले. सुहास घटवाई यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य वार्ताहर स्वप्निल पोरे यांनी आभार मानले.

### * एकांताचे गाणे- प्रकाशन

कविता हा वाङ्मयाचा आद्य प्रकार असून तो उत्क्रांत स्वरूपात येताना काळानुरूप कवितेची व्याख्या बदलत गेली आहे. मानवी मनाची गुंतागुंत कवितेद्वारा प्रभावीपणे पकडता येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. चंद्रकांत पाटील यांनी केले.



परभणी येथील गणेश वाचनालय व साक्षात प्रकाशनच्या वतीने 'एकांताचे गाणे' या रेणू पाचपोर लिखित पुस्तकाचे प्रकाशन झाले.

श्री. पाटील म्हणाले, 'रेणू पाचपोर यांच्या कवितेचे तरलता हे वैशिष्ट्य असून, एकांताची गाणी ही सामान्य वाचकांच्या देखील मनाला भिडणारी आहेत. प्रत्येक कवीने आपल्या परंपरेतील जुन्या वाटा चोखाळताना भाषिक संघर्षाचा मागोवा घेतला पाहिजे. स्त्री-पुरुषांच्या प्रेमाचे चित्रण करताना वेगळे चिंतन कवीने केले पाहिजे. कविता केवळ भावनिक राहिली तर गुळगुळीत होते. विवेक आणि बौद्धिकता त्यात हवी. आपण आपल्या कवितेवर शंका घेऊन त्याची उत्तरे शोधावी, कविता अधिक दर्जेदार होईल. कवितेतील स्वप्नभावना अधिकाधिक गुंतागुंतीच्या हव्यात. इतरांपेक्षा वेगळे शब्द, लवचिक छंद वापरायला शिकले पाहिजे. कविता ही सहज उद्गाराशी जुळणारी असावी, असेही ते म्हणाले.

### * तेरावे ग्रामीण साहित्य संमेलन

''ग्रामीण युवकांची गरज इथल्या काळ्या मातीलाच आहे; मात्र आजचे युवक नोकरीच्या आमिषाने शहराकडे धाव घेत आहे. शहराकडील हे लोंढे थांबविण्याच्या मानसिकतेत बदल होण्यासाठी अशा साहित्य संमेलनाची गरज आहे,'' असे प्रतिपादन कादंबरीकार प्रमोद कर्नाड यांनी केले. बेलेवाडी हुबळगी (ता. आजरा) येथे तेराव्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केले. अध्यक्षस्थानी भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आनंदराव पाटील होते.

श्री. कर्नाड म्हणाले, ''शेतीमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आत्मसात करून दर्जेदार शेतीमालाची निर्मिती करून उत्पन्न वाढविले पाहिजे. सहा टक्के दराने बँकांमार्फत कर्ज उपलब्ध होत असल्याने तुषार सिंचन, ठिबक सिंचन संकल्पनेबरोबरच टिश्यूकल्चर, ग्रीनहाऊस या संकल्पना राबवून ग्रामीण भारत सुजलाम् सुफलाम् करण्याची धमक युवकांत आहे.''

''धर्मांध वृत्तीने आपल्या देशाला दहशतवादाचा बेसूर चेहरा दाखविला असून तो ठेचायला हवा. केवळ सरकार आणि पोलिस यंत्रणेनेच दहशतवादाचा मुकाबला करण्याचा ठेका घेतलेला नसून जागरूक नागरिक म्हणून सतर्क राहून दहशतवादाला मूठमाती देणे आवश्यक आहे.'' असे मतही त्यांनी व्यक्त केले.

### * 'आचार्य जांभेकरांचे लिखाण आजच्या पत्रकारांना प्रेरणादायी'

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी भाषेत वृत्तपत्र सुरू करून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी समाज प्रबोधनाचे काम केले. त्यांचे लिखाण आजच्या तरुण पत्रकारांना प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन नागपूर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अरुण साधू यांनी केले.

दर्पण पुरस्कारांचे वितरण आणि पत्रकारदिन असा संयुक्त कार्यक्रम आचार्य

बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मगावी पोंभुर्ले (ता. देवगड जि. सिंधुदुर्ग) येथे झाला. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष यशवंत पाध्ये होते. साधू यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर ग्रंथालयाच्या निधी संकलनासाठी पाच हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

स्मारकासाठी संपादक, मराठी विभागाचे प्राध्यापक आणि पत्रकारांकडून पैसे जमा होत नसतील तर मराठी भाषा करंटी होण्यास वेळ लागणार नाही, असे सांगून मात्र पैसे जमा कोण करतो, त्याचा पाठपुरावा कसा केला जातो या गोष्टी तपासून पाहण्याची आवश्यकताही यावेळी अरुण साधू यांनी नमूद केली.

साहित्यिकांनाही दर्पण साहित्य पुरस्कार देऊन या वर्षीपासून गौरविण्यात येणार असल्याचे यशवंत पाध्ये यांनी सांगितले. साधू यांच्या हस्ते व्यंकटेश हंबीरे (संपादक दै. संघर्ष उस्मानाबाद) यांना ज्येष्ठ संपादक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर ऐक्यचे प्रतिनिधी अरविंद मेहता यांना पुणे विभागातून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### * विजय गायकवाड यांना डॉ. आंबेडकर फेलाशिप

आंबेडकरवादी साहित्यिक विजय गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप भारतीय दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सोहनपाल सुमनाक्षर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

नवी दिल्ली येथे झालेल्या २२ व्या दलित साहित्यकार राष्ट्रीय संमेलनात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

गायकवाड यांचे आतापर्यंत चार मराठी, तीन इंग्रजी संशोधनपर ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर्स फॉरेन पॉलिसी अँड इटस् रिलेव्हन्स' या ग्रंथास २००१ मध्ये अस्मितादर्श पुरस्कार मिळाला आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारप्रसार संस्थेनेही या ग्रंथास पुरस्काराने गौरविले.

### * ज्ञानभारती २००७ ग्रंथप्रदर्शन

वाचन हाच माझ्या दुःखावरचा सर्वात प्रभावी इलाज आहे. जीवनातल्या प्रत्येक वळणावरचा टॅक्स मी चुकवत गेल्याने तसेच समजून घेणारी माणसे भेटल्यानेच मी यशस्वी ठरलो असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते सदाशिव अमरापूरकर यांनी सांगली येथे भारतीय विद्यापीठ आयोजित 'ज्ञानभारती २००७' या ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी केले. स्वागत व प्रास्ताविक भारतीय विद्यापीठाचे संचालक डॉ. नितीन नायक यांनी केले. ज्येष्ठ साहित्यिक कवी गिरीश यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या ग्रंथदिंडीत शेकडो विद्यार्थी विविध वेशभूषांत सहभागी झाले होते.

कोल्हापूर येथील पवन खेबुडकर यांनी अमरापूरकर यांची मुलाखत घेतली.



अमरापूरकर यांनीही विनोदी ढंगाने उत्तरे देऊन श्रोत्यांमध्ये हास्याचे धबधबे फुलवले. अमरापूरकर म्हणाले, माझे बालपण दारिद्र्यात नव्हे तर गरिबीत गेले. नाटकात काम करण्यास वडिलांचा पूर्णपणे विरोध होता. ते अत्यंत धार्मिक व रुढी-परंपराप्रिय होते. त्यांनी मला नाटकात काम करण्यासाठी केवळ हौस म्हणून परवानगी दिली. मी जेव्हा यशस्वी झालो तेव्हा त्यांनी उच्चारलेले शब्द अजूनही माझ्या हृदयात घर करून आहेत. ते शब्द म्हणजे 'पूर्वी तुला अमरापूरकरांचा मुलगा म्हणून ओळखत होते. आणि आता मला सदाशिव अमरापूरकरांचा बाप म्हणून ओळखतील आणि या गोष्टीचा मला अभिमान आहे.'

प्रेयसीच्या घरच्यांच्या नकारामुळेच खऱ्या अर्थाने माझ्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. आता तर वाचनाची इतकी सवय झाली आहे की, दररोज दोन तास वाचन केल्याशिवाय झोप लागत नाही. ही आवड एखाद्या वाळवीसारखी मला लागली आहे. ज्यांनी जग अनुभवले आणि अनुभव लिहिले ते वाचणे आपले कर्तव्य समजले पाहिजे. वाचन हा माझ्या दुःखावरचा सर्वात प्रभावी इलाज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### * शोषित समाज संशोधनातून विकासाला दिशा मिळेल

उपेक्षित समाजाच्या सद्यस्थितीवर केलेल्या संशोधनाच्या निष्कर्षामधूनच शासनाला व कार्यकर्त्यांना या समाजासाठी करावयाच्या विकासाला दिशा मिळते. प्रा. देवानंद शिंदे यांनी उपेक्षित समाजावरील संशोधन पुस्तकरूपाने प्रकाशित केल्याने या समाजाच्या परिवर्तनास याचा नक्कीच उपयोग होईल, असा विश्वास लातूरचे प्रा. डॉ. माधव गादेकर यांनी व्यक्त केला.

विठ्ठलगजरी प्रकाशनाच्या 'शोषित समाज संशोधन' या पुस्तकाचे प्राकाशन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले.

प्रा. गादेकर म्हणाले की, समाजामध्ये मातंग, होलार, वैदू, पारधी, कैकाडी, वडार या जाती अजूनही मागासलेल्या आहेत. या समाजाची उन्नती झाली तरच लोकशाही खऱ्या अर्थाने तळागाळापर्यंत पोहोचली, असे म्हणणे योग्य ठरेल.

संशोधन केवळ प्रबोधनामध्येच अडकून राहते, अभ्यासक अथवा ज्या समाजासाठी संशोधन केले आहे, त्याच्यापर्यंत ते पोहोचत नाही, परंतु प्रा. शिंदे यांनी समाजातील उपेक्षित जातींचा केलेला तपशीलवार ऊहापोह पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे, ही जमेची बाजू आहे, असे डॉ. नरेंद्र जाधव यांनी मत व्यक्त केले.

### * दादा कोंडके यांच्यावर उषा चव्हाण यांचे पुस्तक

वगसम्राट आणि दिवंगत विनोदी अभिनेते दादा कोंडके यांच्या 'एकटा जीव' या गाजलेल्या आत्मचरित्रापाठोपाठ सिनेमातील त्यांची नायिका उषा चव्हाण याही आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहीत आहेत. 'दादा कोंडके व उषा चव्हाण हिट

जोडी' या नावाने उषाबाईंनी या पुस्तकाचे लिखाण सुरू केले असून तेही 'सत्यकथन' असल्याचा त्यांचा दावा आहे.

दादा आणि उषा चव्हाण यांच्यातील वाद, त्या दोघांनी १३ सुपरहिट मराठी सिनेमांत केलेले काम आणि दादांच्या निधनानंतर काय घडले, अशा अनेक गोष्टींचा ऊहापोह केला आहे असे त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या की, एक अभिनेत्री या नात्याने या पुस्तकाचे लिखाण चालू आहे. दादांचा सहवास लाभलेल्या इतर व्यक्तींचे विशेष अनुभवही या पुस्तकातून मांडणार आहे. या पुस्तकाबद्दल राज्यातच नव्हे; तर देशा-परदेशातील मराठी जनांमध्ये कुतूहल आहे.

### * स्टीफन हॉकिंग : वय वर्षे ६५

विख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनी नुकतीच वयाची ६५ वर्षे पूर्ण केली. 'मोटार न्यूरॉन'सारख्या असाध्य स्नायूविकाराने जखडल्यावरही विलक्षण समृद्ध आयुष्य जगणारे हॉकिंग आजही लाखो लोकांना प्रेरणा देत आहेत. सध्या ते विश्वाची उत्पत्ती कशी आणि का झाली, याची माहिती देणारे 'द ग्रँड डिझाइन' हे नवे पुस्तक लिहीत आहेत.

हॉकिंग यांनी यापूर्वी लिहिलेले 'अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टाइम' हे १९८८ मध्ये प्रकाशित झालेले पुस्तक विलक्षण गाजले. ते आजही 'बेस्ट सेलर' पुस्तक मानले जाते. ८ जानेवारी १९४२ रोजी ऑक्सफर्ड येथे जन्मलेले हॉकिंग वयाच्या २२ व्या वर्षापासून स्नायूविकाराने ग्रस्त आहेत. मात्र, त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेने त्यांना कधीच स्वस्थ बसू दिले नाही. वेगवेगळे सिद्धांत, प्रयोग, लेखन यांत त्यांनी स्वत:ला कायम बुडवून घेतले. कृष्णविवरासंबंधी त्यांनी मांडलेल्या सिद्धांताने खळबळ उडवून दिली. मात्र, तीन वषापर्वी डब्लिन येथे बोलताना त्यांनी 'कृष्णविवरातून काहीही बाहेर पडत नाही,' हे आपले म्हणणे मागे घेतले. पाच वर्षांपूर्वी त्यांच्या साठाव्या वाढदिवसानंतर ते मुंबईत आले होते. तेथील त्यांच्या व्याख्यानाला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. 'द ग्रँड डिझाइन' हे पुस्तक २००८ मध्ये प्रकाशित होण्याची शक्यता आहे.

### * 'साहित्य वैभव' कॅलेंडर

साहित्यिकांचे उत्तम मूडस् टिपणारे छायाचित्रकार आणि प्रकाशक ल. म. कडू यांनी यंदाच्या 'साहित्य वैभव २००७' या नूतन वर्षाच्या कॅलेंडरमधून दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक आचार्य अत्रे यांच्यापासून ते वासंती मुजुमदार या कवयित्रीपर्यंत सहा जणांची कृष्णधवल कलात्मक छायाचित्रे माहितीसह छापली आहेत.

गुळगुळीत आर्ट पेपरवरील या कॅलेंडरमधे ज्येष्ठ समाजवादी नेते आणि



लेखक ना. ग. गोरे, ज्येष्ठ साहित्यिक त्र्यं. वि. सरदेशमुख, बालसाहित्यिक राजा मंगळवेढेकर तसेच 'सांजवात' या आत्मचरित्रामुळे गाजलेल्या आनंदीबाई शिर्के यांचाही समावेश आहे. डॉ. मेधा सिधये यांनी या कॅलेंडरमध्ये संपादन केले आहे.

उत्तम छायाचित्रांबरोबरच या लेखक-लेखिकांबद्दल कॅलेंडरमध्ये लिहिलेली माहितीही वाचकांचे लक्ष आकर्षून घेणारी आहे. आनंदीबाई शिर्के यांच्यावर भाष्य करताना डॉ. स्नेहल तावरे म्हणतात की, समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा ही तळमळ त्यांच्या लेखनामागे होती. स्त्रियांच्या व्यथावेदना पाहून जन्माला आलेली ही बंडखोरी निश्चितच स्त्रियांना नवे बळ देणारी ठरली.

### * 'हृदयस्पंदने' पुस्तकाचे प्रकाशन

''वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांचे संशोधन व औषध उद्योगाशी परस्परांना पूरक साथ लाभल्यास सामान्य माणसांच्या यातना आणि खर्च कमी होईल,'' असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.

प्रख्यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अविनाश इनामदार यांनी लिहिलेल्या आणि 'कृष्णाजी हार्ट फाउंडेशन'ने प्रकाशित केलेल्या 'हृदयस्पंदने' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. पवार यांच्या हस्ते झाले, त्या वेळी तो बोलत होते. 'सकाळ'मधील लेखमालेवर हे पुस्तक आधारित आहे.

या वेळी पवार म्हणाले, ''आजमितीला देशात सुमारे दोन कोटी हृदयरोगाचे रुग्ण असून, त्यापैकी दहा लाख रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. परंतु, ५० ते ६० हजार रुग्णांना पुरेल, इतक्याच सुविधा देशात उपलब्ध आहेत. वेगाने होणाऱ्या नागरिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांना तोंड देणे आवश्यक आहे. वाढणारे ताण-तणाव, व्यायामाचा अभाव, अनिर्बंध आहार यामुळे हृदयरोगाबाबत आपण जगात अग्रगण्य ठरलो आहोत.''

''हृदयरोग झाल्याचे आढळल्यास रुग्णाबरोबरच संपूर्ण कुटुंबाच्या मनात चिंता निर्माण होते. जगात या संदर्भातील तंत्र झपाट्याने बदलत आहे आणि देशातील वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारही हे ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करीत असून, ते ज्ञान इतरांना देण्याची भावनाही त्यांच्यामध्ये आहे. त्यामुळे येत्या काही वर्षांत याबाबत चिंतेचे कारण राहणार नाही,'' असेही पवार यांनी नमूद केले.

### * प्रकाशकांच्या संस्थेला करुणानिधींचे एक कोटी!

सरकारी कार्यक्रमांत शाल, फुले न देता पुस्तकांची भेट द्यावी, अशी सूचना करूनच न थांबता तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांनी लेखकांना पुरस्कार देण्यासाठी स्वत:च्या खिशातून एक कोटींची देणगी दक्षिण भारतीय

पुस्तक विक्रेते आणि प्रकाशकांच्या संस्थेला देऊन आदर्श घालून दिला आहे.

३० व्या राज्यस्तरीय पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर करुणानिधी यांनी एक कोटीचा चेक संस्थेचे अध्यक्ष गांधी कन्नादासन यांच्याकडे सुपूर्द केला.

संस्थेने या निधीतून पाच लेखकांना दरवर्षी प्रत्येकी एक लाखाचा पुरस्कार द्यायचा आहे. याशिवाय पुस्तक प्रदर्शनासाठी कायमस्वरूपी वास्तू असावी, म्हणून इमारत बांधण्यासाठी सरकार पुढाकार घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

## * ग्रंथालयांसाठी हवे १००० कोटी!

ग्रंथालयांतून ज्ञान-संस्कृतीचा विकास होण्यासाठी एक हजार कोटी रुपयांच्या खर्चाची तयारी ठेवा आणि 'राष्ट्रीय ग्रंथालय आयोगा'ची स्थापना करा, अशी सूचना सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखालील 'राष्ट्रीय ज्ञान आयोगा'ने (नॅशनल नॉलेज कमिशन) पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पत्र पाठवून केली.

येत्या तीन ते पाच वर्षांत देशभरातील सर्व ग्रंथालयांचाच नव्हे, तर खासगी ग्रंथ-संग्रहांचाही उपयोग ज्ञानवृद्धीसाठी होऊ शकतो; 'डिजिटायझेशन'मुळे ग्रंथालयांच्या कार्यक्षेत्राची व्याप्तीही वाढू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे!

सरकारने १००० कोटी रुपयांचा निधी स्थापन केल्यास, नव्या 'राष्ट्रीय ग्रंथालय आयोगा'मार्फत खासगी क्षेत्रातून, कंपन्यांकडूनही तेवढा पैसा मिळू शकतो, असाही विश्वास पित्रोदांना वाटतो. अर्थात, आयोगाचे काम केवळ निधी-व्यवस्थापनाचे नसेल तर ग्रंथालयांसाठी कोणत्या प्रकारचे कायदे हवे, विविध क्षेत्रांतल्या ग्रंथालयांसाठी सरकारचे धोरण कसे हवे, हे ठरवण्याचे पुरेसे अधिकार आयोगाकडे असणे पित्रोदांना अपेक्षित आहे.

'राष्ट्रीय ग्रंथालय आयोगा'च्या स्थापनेआधी एक 'राष्ट्रीय ग्रंथालय मिशन' स्थापन करा. त्याहीआधी केंद्रीय सांस्कृतिक खात्याचा कृतिगट स्थापून प्राधान्यक्रम ठरवण्याचे कामही सहमतीने होऊ द्या, अशा सूचनाही पत्रात आहेत.

## * बहिणाबाईंच्या काव्याला उत्स्फूर्त दाद

मराठवाड्यातील कलाकारांनी सादर केलेल्या बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यावर आधारित रचनांना रसिकांनी प्रचंड दाद दिली. सौ. आशा जोंधळे यांचे गायन व प्रा. इंद्रजीत भालेराव यांचे सूत्रसंचालन यामुळे कार्यक्रमाने वेगळी उंची गाठली.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवात 'खानदेशचा मळा आणि मराठवाड्याचा गळा' हा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यावर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला. प्रा. डॉ. अशोक जोंधळे व सौ. आशा जोंधळे यांनी हा कार्यक्रम सादर केला. प्रत्येक रचनेनंतर बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातले कंगोरे, शब्दार्थ सांगितले जात होते. त्यामुळे शेवटपर्यंत रसिकांनी कलाकारांना दाद दिली. आपल्या प्रभावी वक्तव्य व शब्दफेकीतून प्रा. भालेराव यांनी बहिणाबाईंचे साहित्य सूत्रसंचालनातून



उलगडून दाखवले.

***देवा घरोट घरोट... तुझ्या मनातली गोट***
***दुनियेचं पोट... घरी कर्माचा भरोटं***

पुरुषी समाजरचनेत कविता (स्त्री) ही कशी जात्याभोवती फिरत होती. जातं म्हणजे सुख-दु:खाचं पाळं असतं. त्यात भरडून निघाल्यानंतर जीवन कळतं हे या कवितेतून बहिणाबाईंनी सांगितले आहे.

***अरे संसार संसार... जवा तवा चुल्हावर***
***आधी हाताला चटके... तवा मिळते भाकर***

या कवितेतून बहिणाबाईंनी जीवनाचे वास्तव मांडले आहे. संसारात कितीही संकटे आली, तरी डगमगू नये. या संकटातून जीवनात सुख मिळते, असा संदेश त्यांनी या कवितेतून दिला आहे.

***अरे खोप्यामध्ये खोपा... सुगरणीचा चांगला***
***एका पिलासाठी तिनं... झोका झाडाला बांधला***

चिमणी घरटे बांधते, याचा उलगडा डिस्कव्हरी चॅनेलने करण्यापूर्वीच बहिणाबाईंनी आपल्या कवितेत याचा उलगडा केलेला दिसतो.

***आता लागे मार्गेसर... आली कापणी कापणी***
***आज करे खाले वरे... डाव्या डोयाची पापणी***

हंगामात शेतामध्ये होणाऱ्या कामाचा उल्लेख येथे दिसतो.

सातारा नगरपालिकेचे उपाध्यक्ष अॅड. दत्तात्रय बनकर यांनी ग्रंथ महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. इंद्रजीत भालेराव यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. कार्यक्रमाला शंकर सारडा, प्राचार्य यशवंत पाटणे, शिक्षणाधिकारी उदयसिंह पाटील, शिरीष चिटणीस, वि. ना. लांडगे उपस्थित होते.

## * 'ई-बुक' संकल्पनेचे स्वागत व्हावे

जागतिकीकरणाच्या काळात विविध क्षेत्रांत वेगाने बदल होत आहेत. इंटरनेटसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे विशाल ज्ञान आपल्यापुढे आहे. या बदलातून पुस्तकांच्या व्यवहारात 'ई-बुक' ही संकल्पना आली आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे. त्याचबरोबर वाचन संस्कृती टिकविण्यासाठी ग्रंथमहोत्सवही भरविणे आवश्यक आहे, असे मत दै. 'सकाळ'चे संपादक (साहित्य, संस्कृती व कला) सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सवाच्या समारोप समारंभात अध्यक्षपदावरून श्री. पाध्ये बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे उपस्थित होते. व्यासपीठावर समितीचे अध्यक्ष शंकर सारडा, शिक्षणाधिकारी उदयसिंह भोसले, प्राचार्य यशवंत पाटणे आदी उपस्थित होते.

मातीशी नाते जोडते ती संस्कृती. संयोजकांनी ग्रंथ महोत्सवाच्या माध्यमातून

मातीशी नाते जोडले आहे, असे नमूद करून श्री. पाध्ये म्हणाले, ''जगात वेगाने बदल होत आहेत. इंटरनेटसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे विशाल ज्ञान आपल्यापुढे उभे आहे. त्यामुळे आता पुस्तकांचा व्यवहार 'ई बुक' स्वरूपात होईल. हा बदल स्वागतार्ह असून, आपण या बदलाचे स्वागत केले पाहिजे. यापुढे होणाऱ्या ग्रंथ महोत्सवात 'ई बुक'चे वेगळे दालन असावे.''

''बालपणात केलेले वाचन हे आपल्या अस्तित्वाला चिकटलेले असते. गोंदल्यासारखे मनाला चिकटलेले हे साहित्य कधीही बाजूला होत नाही. हे गोंदणे म्हणजेच वाचन संस्कृती. ही संस्कृती टिकवण्यासाठी वाचले पाहिजे. त्यासाठी ग्रंथ महोत्सव उपयुक्त ठरतील,'' असे मत श्री. पाध्ये यांनी व्यक्त केले.

### * दप्तराच्या ओझ्याबाबत राष्ट्रपतींची नाराजी

शाळेत परीक्षा असाव्यात का?, चंद्रावर जीवसृष्टी असेल का?, भारतीय पदवीधर परदेशात का जातात?, भविष्यात कोणतं तंत्रज्ञान प्रभावी असेल?... खुद्द राष्ट्रपतीच उत्तरे देणार असल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला होता आणि ते एकापाठोपाठ एक प्रश्न विचारत होते; विशेष म्हणजे राष्ट्रपतीही तेवढ्याच उत्साहाने त्यांचे निरसन करीत होते!

पुण्यातील 'मुक्तांगण विज्ञान शोधिके'त राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सुमारे दोनशे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी मुलांमध्ये मिसळून त्यांचा उत्साह तर वाढवलाच. त्याचबरोबर जगातील पाच श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या जीवनाची कथा सांगून त्यांची प्रेरणा घेण्याचे आवाहनही केले... त्यांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर असलेल्या दप्तराच्या ओझ्याबाबत नाराजी व्यक्त केली. भारतीय शास्त्रज्ञांमध्ये कोणत्याही प्रकारचे अवकाशयान पाठविण्याची क्षमता असल्याचे सांगितले आणि मंगळावर येत्या ५० ते ७० वर्षांत माणसाची प्रगत वस्ती उभी राहील असं भाकीतही केलं!

शहरातील विविध शाळांचे सुमारे दोनशे विद्यार्थी या संवादात सहभागी झाले होते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील पाच श्रेष्ठ शास्त्रज्ञ– रशियन रॉकेट शास्त्रज्ञ कॉस्टंन्टिन सिओल्कोवस्की, भारतीय शास्त्रज्ञ सी. चंद्रशेखर, सर सी. व्ही. रमण, अल्बर्ट आइन्स्टाइन आणि स्टीफन हॉकिंग्ज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विविध अडथळ्यांवर मात करून ते शास्त्रज्ञ कसे बनले याबाबत त्यांनी माहिती दिली.

त्यानंतर मुलांच्या प्रश्नांची उत्तरे देताना ते अधिक खुलले.

भविष्यात जगात कोणत्या तंत्रज्ञानाचा प्रभाव असेल, या प्रश्नाने सुरुवात झाली. 'आज जरी माहिती-तंत्रज्ञानाचा प्रभाव असला तरी भविष्यात माहिती-तंत्रज्ञान, जीव-तंत्रज्ञान व नॅनो-तंत्रज्ञान यांचा एकत्रित प्रभाव वाढेल,' हे राष्ट्रपतींनी स्पष्ट केले. 'शाळेत परीक्षा असाव्यात का,' या प्रश्नावर त्यांनी विस्तृत उत्तर



दिले. 'शाळेत परीक्षा आवश्यक आहेत, पण त्या केवळ मुलांचा कल जाणून घेण्यासाठी! प्राथमिक शाळांसाठी परीक्षा नसाव्यात. या अभ्यासक्रमात मोठे बदल करण्याची आवश्यकता आहे. त्यात सर्जनशीलता हवी आणि पाठीवरच्या दप्तराचे ओझे तर नकोच,' असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर अभ्यासक्रम कसा असावा याबाबत आपण काम करत आहोत, अशी माहितीही दिली.

### * 'आंदोलन'द्वारे दलित साहित्याची चाकोरी तोडण्याचा प्रयत्न

आतापर्यंत दलित साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोनातून लिहिले गेले होते. परंतु धर्मराज निमसरकार यांनी दलित साहित्याची ही चाकोरी तोडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या पुस्तकाद्वारे दलितांच्या प्रश्नाकडे एका कामगाराच्या दृष्टिकोनातून बघितले आहे, असे मत ज्येष्ठ लेखक ह. मो. मराठे यांनी व्यक्त केले.

धर्मराज निमसरकार यांच्या 'आंदोलन' या पुस्तकाचे प्रकाशन मराठे यांनी केले. या वेळी ज्येष्ठ लेखक गंगाधर पानतावणे, सिग्नेट पब्लिकेशन्सचे अॅड. प्रमोद अडकर, मनोहर जाधव आदी उपस्थित होते.

पानतावणे म्हणाले की, कवी, लेखक, पत्रकार असं निमसरकार यांचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कथा सजीव वाटतात. कामगारांचे जीवनमान, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मनातील सल व कामगार विश्वातील अनेक बारीकसारीक तपशील त्यांच्या कथांमध्ये दिसून येतो. निमसरकार म्हणाले की, माझ्या भावना पूर्णपणे व्यक्त व्हाव्यात म्हणून मी कविता लेखनाकडून कथालेखनाकडे वळलो.

निमसरकार यांच्या आयुष्यातील संघर्षामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला खोली प्राप्त झाली आहे. त्यामुळे उमद्या दृष्टिकोनातून जीवनाकडे बघणे त्यांना जमते व हा दृष्टिकोन त्यांच्या कथांमधूनही दिसून येतो, असे मत जाधव यांनी व्यक्त केले.

### * मी जो काही आहे तो पुण्यामुळेच!

मी जो काही आहे त्याचे सर्व श्रेय पुण्याला असल्याची कृतज्ञतेची भावना व्यक्त करून बदललेल्या काळात बोलण्याशिवाय लोक शहाणे होणार असतील तर आपण अकारण का बोलावे, असा सवाल प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी केला.

प्राचार्य शिवाजीराव भोसले गौरव समितीतर्फे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा ८० व्या वाढदिवसानिमित्त शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते आणि रामकृष्ण मठाचे स्वामी भीमानंदजी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. गौरव समितीचे समन्वयक प्रा. मिलिंद जोशी उपस्थित होते.

केवळ चांगले ऐकता यावे म्हणून मी फलटणवरून पुण्याला आलो. त्याकाळात तात्यासाहेब केळकर, वि. दा. सावरकर यांच्यासह अनेकांची भाषणे ऐकली. विवेकानंदांचे शिकागो येथील पहिले भाषण ४८५ शब्दांचे आणि साडेचार मिनिटांचे

होते. पण त्यामुळे त्यांची जागतिक पातळीवर ओळख झाली. या सर्व कार्यातून प्रेरणा घेऊन मी विवेकानंदांच्या चरित्राचा अभ्यास केला आणि बोलू लागलो. माझी विवेकानंदांवरची पहिली भाषणे पुण्याच्या रामकृष्ण मठाच्या आवारात झाली, अशी आठवण सांगून मी पुण्याचा होतो म्हणून हे घडले अशी भावना प्राचार्य भोसले यांनी व्यक्त केली.

जगायला भाग पाडणारे वक्तृत्व शिवाजीरावांना लाभले आहे. वक्तृत्व ही अचाट ताकद असून त्याचा आविष्कार म्हणजे प्राचार्यांची वाणी आहे, असे गौरवोद्गार बाबासाहेब पुरंदरे यांनी काढले.

### * अभारतीयांसाठी मुंबई विद्यापीठात 'स्टडी इंडिया'

परदेशी आणि अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांच्या गरजा आणि आवड ध्यानात घेऊन त्यांच्यासाठी भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, नाटक, चित्रपट इतकेच नव्हे तर राजकारण, इतिहास, भौगोलिक परिस्थिती, भाषा आदी विषयांचे शॉर्ट टर्म कोर्स सुरू करण्याची मुंबई विद्यापीठाची योजना आहे.

या प्रकारच्या अभ्यासक्रमांची गरज कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तींकडूनही व्यक्त करण्यात आली होती. २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणाऱ्या या कोर्सेसचा विद्यार्थ्यांनाच नव्हे तर कॉर्पोरेट क्षेत्रालाही लाभ घेता येईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. विजय खोले यांनी दिली.

'स्टडी इंडिया' या नावाने ओळखली जाणारी ही योजना मुंबई विद्यापीठाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षातील अनेक महत्त्वाकांक्षी योजनांपैकी एक. सरकारी अनुदानाऐवजी, विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फीमधून हे अभ्यासक्रम राबवले जातील.

पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा या कोर्सेसचे स्वरूपही वेगळे असून सर्व कोर्स परीक्षेऐवजी 'क्रेडिट' पद्धतीचे असतील. उदाहरणार्थ, राज्यशास्त्रातील 'महाराष्ट्राचे राजकारण या विषयाला कोर्स पूर्ण केल्यास त्याला या मार्कांचे ठराविक 'क्रेडिट' मिळेल. युरोप, अमेरिकेतील विद्यापीठांत विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या अभ्यासक्रमांमध्ये वर्षभरात ठराविक 'क्रेडिट' जमा करावे लागतात, अशी पद्धती आहे.

### * 'मराठीच्या अस्तित्वाबाबत भीती बाळगण्याचे कारण नाही'

''मराठीच्या अस्तित्वाबाबत भीती बाळगण्याचे कारण नाही. मराठीसाठी आक्रोश न करता नागरीकरणामध्ये भाषेचे शुद्धत्व टिकवण्याची गरज आहे. मराठीच्या प्रचार-प्रसारापेक्षाही तिच्या विकासाकडे अधिक लक्ष द्यावे,'' अशी सूचना राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी केली.

मराठी अभ्यास परिषदेतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाच्या २५ व्या वर्षातील पदार्पणानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. परिषदेलाही नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली, त्याचे औचित्य साधून



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष प्रा. प्र. ना. परांजपे, कार्यवाह डॉ. नीलिमा गुंडी, जर्मन विदुषी डॉ. मॅक्सिन बर्नसन, डॉ. सरोजा भाटे, त्रैमासिकाचे माजी संपादक डॉ. कल्याण काळे, डॉ. मृणालिनी शहा आदी होते.

'मराठी इतकी सुदृढ आणि संपन्न भाषा आहे, की तिला इंग्रजी-हिंदीचे भय नाही, असे नमूद करून कर्णिक म्हणाले, ''कोकणी आणि आदिवासी बोलीतील शब्द मराठीत आले पाहिजेत. जुने शब्द जतन करून नवीन शब्द तयार करण्याचे काम व्हायला हवे.''

डॉ. भाटे म्हणाल्या, '' 'भाषा आणि जीवन'सारखे त्रैमासिक फक्त विशिष्ट वाचकवर्गापुरतेच मर्यादित राहावे, याची खंत वाटते. तरुणांना वळवण्यासाठी एखादा प्रकल्प त्रैमासिकाने हाती घ्यावा.''

❒

**अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार २००६**




अकाली वैधव्य आल्यामुळे प्रपंचात येणाऱ्या अनेक अडीअडचणींना, कोर्ट-खटल्यांना धीरोदात्तपणे सामोऱ्या जाणाऱ्या जिद्दी स्त्रीव्यक्तीमत्वाचे दर्शन.

**केतकरवहिनी**

**उमा कुलकर्णी**

**१५०रु. पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# आंतरभारती साहित्य संवाद

***सा**नेगुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टतर्फे ७ जानेवारी रोजी प्रभादेवीच्या रवींद्र नाट्य मंदिरमध्ये तिसरे आंतरभारती साहित्य संवाद संमेलन घेण्यात आले. भारतीय भाषांमधले अनुवाद हा यावेळी मुख्य विषय होता. विविध भारतीय भाषांमधील लेखक, कवी, नाटककार, विचारवंत यांनी एकत्र येऊन विचारांचं आदानप्रदान केले. सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टतर्फे अनुवाद सुविधा केंद्र सुरू झाले. प्रारंभी मराठी, गुजराती, कोकणी, कानडी आणि सिंधी या पाच भाषांमध्ये तिचे काम चालणार आहे.*

***या निमित्ताने या केंद्राचे संकल्पक आणि पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ तसेच मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांच्याशी केलेली बातचीत.***

***प्रश्न :*** *तुम्ही प्रकाशनक्षेत्रात दांडगं काम केलं आहे. महात्मा गांधींवरच्या अभ्यासासाठी तुम्हाला डॉक्टरेट मिळाली आहे. संगीताचा तुमचा व्यासंग आहे. इतक्या विविध क्षेत्रात अजूनही तुमचं काम चालू असताना अनुवाद सुविधा केंद्राच्या रूपाने अनुवादासंबंधी काही मौलिक काम करण्याकडे गेल्या एक-दोन वर्षांत तुम्ही वळला आहात. यामागचं कारण काय?*

मला फार पूर्वीपासून वाटत आलंय की, अनुवाद ही साहित्यात अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. जगातलं उत्तम साहित्य केवळ अनुवादामुळेच वाढलंय. मी जर टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की वाचले नसते तर काय झालं असतं, असा मी नुसता विचार केला तरी मला त्याचं महत्त्व जाणवतं. आपल्याकडेही दहाएक लोक सोडले तर फारसे लेखक अन्य भाषेत कुणाला माहीत नाहीत. कारण ते अनुवादरूपाने पोहोचलेले नाहीत. तसं पाहिलं तर प्रत्येक लेखकाला आपली साहित्यकृती दुसऱ्या किमान एका भाषेत तरी जावी असं वाटत असतंच. अनुवादाने भाषेची समृद्धी वाढते. काही शब्द असे असतात की त्यांना पर्यायी शब्द सापडत नाहीत. ते मूळ भाषेत जसे असतात, तसेच वापरावे लागतात. ते शब्द आपल्या भाषेत आल्याने भाषा वाढते. वाचक वाढतो आणि परफेक्ट अनुवाद कधीच





**श्री. रामदास भटकळ**

शक्य नसतो. त्यामुळेच ग्रीक नाटकं, बायबल, शेक्सपिअर यांचे अनेक अनुवाद होत राहतात. प्रत्येकाचा पॉइंट ऑफ व्ह्यू वेगळा असतो. त्यामुळे अनेक अनुवाद निर्माण होण्यास वाव मिळतो.

***प्रश्न :*** *पण अनुवाद सुविधा केंद्र निर्माण करावं असं केव्हा वाटलं?*

मागे कुसुमाग्रजांच्या कवितांचा हिंदीत अनुवाद करताना वसंत देव, चंद्रकांत बांदिवडेकर आणि शंकर वैद्य यांच्यात झालेली चर्चा आठवतेय. प्रत्येक शब्दावर खल झाला. अनुवादातल्या अडचणींवर चर्चा झाली. ही प्रोसेस महत्त्वाची. तिचं डॉक्युमेंटेशन व्हायला हवं होतं. अनुवाद कोणीही करावा, पण अशी एखादी यंत्रणा हवी की जी त्यासाठी सुविधा पुरवू शकेल. पंचवीसएक वर्षांपूर्वी अमेरिकेत गेलो असता तिथलं अमेरिकन ट्रान्सलेशन सेंटर बघितलं. त्यानंतर जर्मन ट्रान्सलेशनविषयीही ऐकलं. या ठिकाणी युरोपियन भाषांमधल्या पुस्तकांच्या अनुवादाचं मोठं काम चालतं. त्यावेळी मला अशी कल्पना सुचली की अशाच प्रकारचं एक केंद्र आपल्या भारतीय भाषांसाठीही असावं.

त्यानंतर गेल्या काही वर्षांत साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या संपर्कात आलो. त्यांची माणगावला ३६ एकरांची मोठी जमीन आहे. तिथे अनेक उपक्रम सुरू असतात. कॅम्पस् होतात. मला ही जागा सुंदर वाटली. शिवाय या संस्थेत निष्ठावान कार्यकर्ते आहेत आणि महत्त्वाचं म्हणजे साने गुरुजींचं आंतरभारतीचं स्वप्न होतं. हे सर्व जुळून येत होतं. मी अनुवाद सुविधा केंद्राची कल्पना मांडली. ग. रा. भटकळ फौंडेशनने एक लाख रुपयांची देणगी दिली. ही रक्कम तशी फार मोठी नाही. पण त्यामुळे कामाला चालना मिळाली. पहिल्या मीटिंगमध्ये अनेक शंका उपस्थित झाल्या. कोणी म्हणालं, अनेक अनुवाद पडून आहेत, त्यांना प्रकाशक मिळत नाहीत. कोणी म्हणालं, अनुवादित साहित्य खपत नाही. प्रश्न अनेक आहेत. मला असं म्हणायचं नाही की सगळ्यांची उत्तरं आपल्यापाशी आहेत, पण जसजसं हे काम वाढत जाईल, लोक यात येतील तसतशी उत्तरंही मिळत जातील

***प्रश्न :*** *या अनुवाद सुविधा केंद्राचं स्वरूप कसं असेल?*

हे रिसोर्स सेंटर असावं, अशी कल्पना आहे. एक बहुभाषिक मोठं संदर्भ

ग्रंथालय असणं ही तर मूलभूत गरज आहे. हे काम मोठं आहे आणि एकट्या संस्थेच्या आवाक्याबाहेरचं आहे. पण ज्यांच्या घरी पुस्तकं ठेवायला जागा नाही, ज्यांना जुनी पुस्तकं काढायची असतात अशांनी ग्रंथालयाला पुस्तकं दिली, सर्व प्रकाशकांनी आणि लेखकांनी आपल्या प्रत्येक पुस्तकाची एक प्रत द्यायची जरी ठरवली तरी पुस्तकांचा बॅकलॉग बराच भरून येईल. अनेक शिक्षण संस्थांमध्ये अनुवादासंबंधी वाचले जाणारे पेपर्स, अप्रकाशित संहिता याबरोबरच 'ओरल अर्काइव्ह'ही हवं. उदाहरणार्थ, विंदांनी बरेच अनुवाद केले आहेत, पण त्यांना किंवा पाडगावकर यांसारख्या ज्येष्ठ लेखकांना अनुवादासंबंधी काही बोलायचं असेल तर ते ध्वनिमुद्रित करून करून ठेवलेलं असायला हवं. मला वाटतं, याप्रकारे पाच वर्षांत उत्तम संदर्भ ग्रंथालय उभारता येईल.

पण केवळ ग्रंथालय करणं एवढंच उद्दिष्ट नाही. अनेक संस्था अनुवादाच्या क्षेत्रात काम करताहेत. त्यांचा आम्ही प्रसार करू. त्यांना हवी ती मदत करू. सगळं आपणच करावं, अशी आमची भूमिका नाही. ते शक्यही नसतं. पण इतर काम करणाऱ्यांना बळ दिलं आणि काम करायला उद्युक्त केलं तर स्काय इज द लिमिट. आता आम्ही व्याप आटोक्यात ठेवावा म्हणून मराठी, गुजराती, कोकणी, कानडी आणि सिंधी या पाच भाषांमध्येच काम करणार आहोत. तरुणांनी इकडे आकर्षित व्हावं हा मुख्य हेते आहे. त्यासाठी त्यांना एकेका प्रोजेक्टसाठी उत्तम फेलोशिप्स देण्याचा विचार आहे. अनुवादाच्या कार्यशाळा घ्याव्यात, असाही विचार आहे. कॉम्प्युटरचा व इंटरनेटचा वापर करून देशात कुठे काय काम चालू आहे, काय काम झालं आहे, याचा डेटाबेस तयार करायचा आहे.

***प्रश्न :*** *मराठी अनुवादित पुस्तकांचा खप होत नाही, तो का?*

अजून आपल्याकडे हे कल्चर तयार झालेलं नाही. उत्तम साहित्याच्या आदानप्रदानाला सुरुवात झाली आणि वाचकांना त्याची गोडी कळली की या अडचणीतून मार्ग निघेल. आम्ही पॉप्युलर प्रकाशनतर्फे क्लासिक्सचे अनुवाद केले. ते फारसे खपले नाहीत. अनेक प्रकाशकांनी या प्रकारचं काम केलं आहे. पण आज मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अनेक अनुवाद येतात आणि खपतातही. मेहतांनी ही किमया करून दाखवली म्हणून मी त्यांचं विशेष कौतुक करतो.

***प्रश्न :*** *अनुवादाच्या क्षेत्राकडे तरुण कसे आकर्षित होतील, असं तुम्हाला वाटतं?*

यात तरुणांना खूप मोठ्या संधी आहेत. साहित्यक्षेत्रात नव्हे तर व्यावसायिक क्षेत्रात खूप करण्यासारखं आहे. जाहिरात क्षेत्रात करावं लागणारं कॉपीरायटिंग, टीव्हीवरच्या कार्यक्रमांची, टीव्हीवरच्या कार्यक्रमांची भाषांतरं, तंत्रज्ञानात पोहोचवण्यासाठी भाषांतराची गरज हे तरुणांनी लक्षात घेतलं तर त्यांना अनुवाद सुविधा केंद्राचं महत्त्व कळेल. आज चिनी, जपानी, जर्मन भाषा शिकण्याकडे तरुणांचा कल आहे. त्यांच्यासाठी ट्रेनिंग प्रोग्राम्स राबवता येतील. आज दुसरी भाषा अवगत असणं गरजेचं झालं आहे.

***प्रश्न :*** *आंतरभारती साहित्य संवाद संमेलनातून या कामासाठी पुढील दिशा मिळू शकेल, असं वाटतं का?*

ही सुरुवात आहे. संमेलनाच्या निमित्ताने गिरीश कर्नाड, विष्णू खरे, कविता पंजाबी, उदय नारायण सिंग हे आणि अनेक भारतीय लेखक एकत्र येणार आहेत. जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीचे प्रमोद तलगेरी संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. यानंतर फेब्रुवारीत यूजीसीतर्फे एक सेमिनार माणगावला घेतला जाणार आहे. यातून दिशा मिळेल असं नक्कीच वाटतं. स्थानिक पातळीवरही मुंबई मराठी साहित्य संघ, कर्नाटक संघ, म्हैसूर असोसिएशनसारख्या संस्थांनी वर्षभर दुसऱ्या भाषेतले कार्यक्रम आयोजित करावेत, असा आमचा प्रयत्न राहील. त्यांना अन्य भाषांत पोहोचवण्याचं काम आम्ही करू. चंद्रावर माणसाने पहिलं पाऊल ठेवलं तेव्हा विज्ञानच पुढे गेलं नाही तर अखिल मानवजातीचं कल्याण झालं. आमचं कामही तसंच आहे.

**(सौजन्य - महाराष्ट्र टाइम्स)**

**मुं**बईत 'आंतरभारती साहित्य संवाद' संमेलन झाले. अनुवादित साहित्य हे मराठी साहित्य क्षेत्रातलं एक महत्त्वाचं दालन. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने गेली काही वर्षं अनुवादित साहित्याची मराठीत मोठी भर घातली आहे. त्या संदर्भात **श्री.अनिल मेहता** यांच्याशी केलेली बातचीत.

***प्रश्न :*** *गेली काही वर्षं 'मेहता प्रकाशना'चा अनुवादित साहित्य प्रकाशित करण्याकडे मोठा कल दिसतो आहे. तो जाणीवपूर्वक आहे की...?*



**श्री. अनिल मेहता**

अनुवादित साहित्य प्रकाशित करण्याचा आमचा निर्णय जाणीवपूर्वक घेतलेला आहे. त्यामागचं कारण असं आहे की, मराठीमध्ये अलीकडच्या काळात चांगल्या दर्जाचं साहित्य फारसं निर्माण होत नाही. इतर भाषांमधले लेखक जे मांडतात, ते अनुभव मराठी साहित्यिकांना येत नाहीत. इतर भाषांमधले साहित्यिक जे विषय टिपतात तसे मराठी साहित्यिकांना टिपता येत नाहीत. दर्जेदार साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचावं, पाश्चात्य लेखकांचे अनुभव मराठी वाचकाला कळावेत यासाठी आम्ही अनुवादावर भर दिला आहे. फक्त इंग्रजीच नाही, इतर भारतीय भाषांमधलं साहित्य मराठीत यावं यावरही आमचा भर आहे.

***प्रश्न :*** *इतर भाषा आणि मराठीतल्या लिखाणात काय फरक जाणवतो?*

इंग्रजीसह इतर भाषांमध्ये खूप कसदार लिखाण होत असतं. आता सुधा मूर्ती या बाई बंगलोरमध्ये राहून जे काम करतात, अनुभव घेतात, लिखाण करतात तसं मराठीत का होऊ नये? मराठीत निदान पूर्वी तर कसदार साहित्य निर्माण व्हायचं. आता तसं उरलं नाही. सध्याच्या मराठी लेखकांमध्ये अभ्यास करण्याची प्रवृत्ती कमी आहे. त्यामुळे त्यांच्या लिखाणात कस नाही. आमच्याकडे पुस्तकाचं स्क्रिप्ट येतं, त्यामध्ये एवढ्या चुका असतात! आमच्या संपादकांनी केलेल्या सूचनादेखील पुढच्या वेळी अमलात आणल्या जात नाहीत. हा बनचुकेपणा आहे. खरं तर पूर्वीच्या तुलनेत आजच्या काळात जगण्यातली गुंतागुंत वाढली आहे, पण ती पचवण्याची ताकद आजच्या मराठी लेखकांमध्ये नाही. पूर्वीचे लेखक असे नव्हते.

***प्रश्न :*** *तुम्ही रहस्यमय कादंबऱ्या अनुवादित करण्यावरही भर दिला आहे.*



*मग सुहास शिरवळकरांसारख्या लेखकांची कमतरता जाणवते का?*

होय. मराठीत आज सुहास शिरवळकरांसारखं लिखाण करणारे लेखक नाहीत. मुळात मराठीत लिहिणारेच कमी आहेत. जे आहेत ते एखादं पुस्तक लिहिलं की आपण मोठे झालो, असं समजायला लागतात. मराठीत लिहिणाऱ्यांमध्ये अनुभव घेण्याची, ते पेलण्याची कुवतच नाही. याचं कारण असं की, मराठीत लिहिणारे पार्टटाईम रायटर्स आहेत. फुल टायमर्स नाहीत.

***प्रश्न :*** *पण पूर्णवेळ लेखन हा व्यवसाय शक्य आहे का?*

का नाही? बाबा कदम, सुहास शिरवळकर ते करत होतेच की. अनुवादही पूर्णवेळ व्यवसाय म्हणून करणारे असतील तर हवे आहेत. तेवढा वाव या व्यवसायात आहे. मी तर म्हणेन की अनुवाद या क्षेत्रातले, व्यवसायातले आम्ही पायोनियर आहोत. आमचं बघून इतरजणही या क्षेत्रात उतरत आहेत.

***प्रश्न :*** *अनुवादासाठी पुस्तकं निवडण्यामागचे तुमचे निकष काय असतात?*

मी स्वत: इंग्रजी पुस्तकं वाचतो. काही पुस्तके अनुवादक सुचवतात. 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'चा मी सदस्य आहे. त्यामुळे इतर भाषांमधले प्रकाशक भेटतात. ते त्यांच्या भाषांमधली चांगली पुस्तकं सुचवतात. आता एका मल्याळम 'सेक्स वर्कर'ची आत्मकथा आम्ही अनुवादित करून प्रकाशित करीत आहोत. हे एरवी मराठी वाचकाला कुठे वाचायला मिळणार? 'डायरी ऑफ ॲन फ्रँक', 'नॉट विदाऊट माय डॉटर'सारखी वेगवेगळे अनुभव मांडणारी पुस्तकं असतात. इंग्रजी कमी वाचणाऱ्या मराठी वाचकांना ती वाचायला, समजायला जड जातात. ती मराठीत आली की, त्यांना सहज वाचता, समजून घेता येतात.

गेली काही वर्षे 'टी बुक क्लब' ही अनुवादित पुस्तकांची योजना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे सुरु आहे.वर्षभरात सहा इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद या योजनेद्वारे केला जातो.ही पुस्तके 'बेस्टसेलर' म्हणून नावाजलेली तर असतातच पण मराठी वाचकाला अभिनव वाटतील असे विषयही त्यात अंतर्भूत असतात आजतागायत असे १४ टी बुक क्लब उत्तम प्रतिसादासह पूर्ण झाले आहेत.

मारिओ पुझो,रॉबिन कुक,ॲलिस्टर मॅक्लीन,इयान फ्लेमिंग अशा पाश्चात्य जगतात गाजलेल्या कादंबरीकारांच्या साहित्यकृतींचे दर्जेदार अनुवाद आम्ही वाचकांना उपलब्ध करुन दिले आहेत.तसेच काही बुकर,पुलित्झर पारितोषिक विजेत्या साहित्यकृतींचेही अनुवादही करण्यात आले आहेत.मराठी वाचकांनी याला उत्तम प्रतिसाद दिला ही आमची सर्वात जमेची बाजू.

***प्रश्न :*** *अनुवाद ही कला आहे का ते तांत्रिक काम आहे?*

अनुवाद ही कलाच आहे. एका भाषेतून येणारी काही वाक्यं, शब्द दुसऱ्या भाषेत चपखल बसवण्यासाठी अनुवाद करणाऱ्याला मेहनत घ्यावी लागतेच. त्या त्या भाषेतला गोडवा मराठीत आणणं ही कला आहे. 'थॉट लीडर्स' हे श्रीनिवास

पंडित यांचं पुस्तकं अनुवादित करताना मॅनेजमेंटच्या विशिष्ट शब्दांचा अनुवाद केला गेला आहे. आता आम्हाला सूचना आली आहे की, त्या शब्दांची ग्लॉसरी द्या. भाषेमध्ये शब्द अशाच रीतीने रूढ होत असतात. अनुवादक हा त्याचं माध्यम ठरतो. त्यामुळे प्रतिशब्द तयार करणं ही कलाच आहे.

सर्वश्री वि.स.खांडेकर,वि.वा.शिरवाडकर आणि विं.दा.करंदीकर या ज्ञानपीठ विजेत्या साहित्यिकांनीही दर्जेदार अनुवाद केले आहेत. पु.लं.नीही या क्षेत्रात आपले योगदान दिले आहे हे लक्षात घ्यायला हवे.

***प्रश्न :*** *पेंग्विनसारखे प्रकाशक मराठीत उतरत आहेत. हे आव्हान आहे की स्पर्धा?*

दोन्हीही नाही. 'जस्ट वन मोअर पब्लिशर इज ॲडेड.' मराठीत अनुवादित पुस्तकांना मार्केट आहे हे आमचं काम बघूनच त्यांच्या लक्षात आलं आहे. कारण आम्हीही त्यांच्या पुस्तकांचा अनुवाद करत होतो. आता ते मराठीत आले तरी ते फक्त त्यांच्याच पुस्तकांचा अनुवाद प्रकाशित करतील, आम्ही सर्व आंतरराष्ट्रीय प्रकाशनांची पुस्तकं काढतो, हा फरक आहे. शिवाय त्यांचा एकूण पसारा, कामाची पद्धत पाहता त्यांच्या अनुवादित पुस्तकांच्या किमती तुलनेत महाग असण्याची शक्यता आहे.

***प्रश्न :*** *मराठीतली पुस्तकं इंग्रजीत नेण्यासाठी तुमचे काही प्रयत्न सुरू आहेत का?*

त्यातली सगळ्यात महत्त्वाची अडचण अशी आहे की, मराठीतली पुस्तकं इंग्रजीत अनुवादित करू शकणारे खूप कमी आहेत. 'स्वामी', 'श्रीमान योगी'सारख्या पुस्तकांना इंग्रजीत वाव आहेच.

***प्रश्न :*** *पण ही पुस्तकं त्या भाषेतल्या वाचकाला आजच्या काळात कालबाह्य वाटणार नाहीत का?*

का? मनोहर माळगावकरांचं 'प्रिन्सेस' हे पुस्तक आधी इंग्रजीत आलं. तिथे वाचलं गेलं, चर्चा झाली. मग नंतर मराठीत आलं. 'व्हाईट मुगल' हे पुस्तक आज बेस्ट सेलर आहेच. ते कुठल्या काळातलं आहे? इतर ठिकाणच्या लोकांना आपल्या संस्कृतीबद्दल जिज्ञासा आहे. त्यासाठी मराठीतली पुस्तकं इतर भाषांमध्ये जायलाही हवीत. पण ती अनुवादित करणारे खूपच कमी जण आहेत, ही अडचण आहे.

**(सौजन्य : लोकसत्ता)**

## आजच्या बदलत्या साहित्यक्षेत्रात आपला सक्रीय सहभाग हवाच

# रवींद्र गुर्जर वाचक परिवार

व्यक्तिगत ग्रंथसंग्रह, छोटी वाचनालये, ग्रंथविक्री केंद्र, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रवास, गाठीभेटी इ. इ.

**विनामूल्य सभासदत्व**

आपले नाव, पत्ता, फोन इ. तपशीलवार कळवा


**संपर्क :** गायत्री साहित्य, २६/१२ प्रतिक नगर, येरवडा, पुणे ४११ ००६.

**फोन :** (०२०) २६६९५१६८ (26695168)

**जिल्हावार प्रतिनिधी / वितरक नेमणे आहे.**



## नुकतेच.....




# मैत्र जिवाचे


**डॉ. भवान महाजन**

**१००रु.**
**पोस्टेज २०रु.**

*शरीर आजारग्रस्त असलं तरी मनाचं बहुरंगी दर्शन डॉक्टरला अगदी सहजासहजी घडतं. असहाय्य, दुर्बल शरीरात, तग धरून असलेलं मनं, अस्थिपंजर स्थितीतही जपलेल्या अदम्य इच्छा, अशा विविध प्रत्यय देणाऱ्या घटनांचे चलत्‌चित्र डॉक्टरांसमोर सदैव सुरू असते.*

*एका नामवंत शल्यचिकित्सकाच्या या अशाच काही आठवणी .... संवेदनशीलतेनं रोग्यांची ही स्मरणचित्रं वास्तवाला धक्का न लावता चितारली आहेत.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने भारताची वाटचाल - अडचणी आणि आव्हाने**

# जागतिक अर्थव्यवस्था

**मधुसूदन दत्तात्रय साठे**

जागतिकीकरणामुळे खुल्या अर्थव्यस्थेकडे आपला देश वेगाने घोडदौड करीत आहे. आर्थिक सुधारणा किंवा पुनर्रचना करून जागतिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न चालू आहे. भारताकडे एक मोठी बाजारपेठ म्हणून सर्वच बहुराष्ट्रीय कंपन्या अत्यंत अधाशीपणे बघत असून प्रचंड कमाईची संधी आपल्यालाही मिळावी यासाठी व्यूहरचना करीत आहेत. वॉलमार्ट ही जगातील एक अग्रगण्य रिटेल-किरकोळ विक्रीकेंद्राची साखळी-संस्था. अठरा लाख कर्मचारी तिच्यात काम करतात. भारतीय कायद्याप्रमाणे कंझ्युमर रिटेल क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांना येथे विक्रीकेंद्रे काढण्यास मनाई आहे. मित्तल यांच्या भारती या कंपनीत ४९ टक्के भांडवल गुंतवणूक करून वॉलमार्ट भारतात रिटेल स्टोअर्सचे जाळे उभे करणार आहे. कायद्यातील पळवाटा शोधून भारतीय बाजारपेठेत शिरकाव करून घेण्यासाठी परदेशी कंपन्या वेगवेगळे मार्ग चोखाळत आहेत– याचे हे एक उदाहरण.

या जागतिकीकरणामुळे एकूणच अर्थव्यवहाराबद्दल अनेक मुद्दे पुढे येतात आणि सर्वसामान्य नागरिकालाही त्याबद्दल निरनिराळे प्रश्न पडतात. सरकार कायदे करील, सरकार आर्थिक धोरण ठरवील, आपला त्याच्याशी काही संबंध नाही अशी भूमिका यापुढे जागरुक नागरिकाला घेताच येणार नाही. समाजवादी समाजरचनेच्या नेहरू सरकारच्या धोरणाला जनतेने भक्तिभावाने, भाबडेपणाने भरघोस मतदानाद्वारे आपला पाठिंबा दिला; त्यातून लायसेन्स-परमिट राज तयार झाले. नोकरशाहीने प्रत्येक गोष्टीवर आपला अंकुश प्रस्थापित केला. उत्पादनवाढ आणि नवीन उत्पादनांचे संशोधन-वितरण यात अडथळ्यांचे डोंगर उभे केले. भ्रष्टाचाराने सगळे व्यापार-उद्योगक्षेत्र पोखरून टाकले. साध्या स्कूटरसाठी, फियाट



कारसाठी पाचदहा वर्षांची प्रतीक्षा यादी, घरगुती गॅससाठी, फोनसाठी प्रतीक्षा यादी... सामान्य माणसाच्या साध्या दैनंदिन गरजांसाठीही दैवावर हवाला ठेवण्याची किंवा ऑन मनी देण्याची पाळी येऊ लागली... आणीबाणीच्या काळात नोकरशाहीचा हा बेबंदपणा आणखीनच मस्तवाल रूप धारण करून पुढे आला... राजीव गांधींनी या नोकरशाहीच्या कैचीतून सामान्य माणसाला, उद्योगजगाला सोडवण्याच्या दिशेने, उदारीकरणाच्या व खुलेपणाच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली आणि काही वर्षांतच भारतीय जनतेला स्वातंत्र्योत्तर काळानंतर प्रथमच टू व्हीलर, फोर व्हीलर, फोन, गॅस वगैरे गोष्टी बाजारात हव्या तेव्हा मिळू लागल्या... परदेशी गुंतवणुकीचे मार्ग मोकळे झाले. अर्थव्यवस्थेला वेग मिळाला.

> **राजीव गांधींनी या नोकरशाहीच्या कैचीतून सामान्य माणसाला, उद्योगजगाला सोडवण्याच्या दिशेने, उदारीकरणाच्या व खुलेपणाच्या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली .**

नारायण मूर्ती यांच्या 'इन्फोसिस'ने माहिती तंत्रज्ञाबाबत वेगळीच व्यूहरचना करून जगातील नामवंत कंपन्यांना उपयुक्त सॉफ्टवेअर बनवून देण्याचा आणि ते वापरून प्रचंड बचत करण्याचा मार्ग दाखवून दिला. फारशी गुंतवणूक न करता कोट्यवधी डॉलर्सचे उत्पन्न मिळवण्याचा हा मार्ग भारतीय अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा देणारा ठरला. 'इन्फोसिस'ने भारतीय तरुणांना युरोप-अमेरिकेत एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीयांच्या बुद्धिमत्तेची, प्रज्ञेची चमक दाखवून दिली... इतर क्षेत्रातही मग आपल्या उद्योगपतींनी आत्मविश्वासाने या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा फायदा करून घेण्यासाठी वेगवेगळ्या कल्पना राबवल्या... परदेशातील कंपन्या विकत घेऊन वा त्यांच्याशी करार करून 'बहुराष्ट्रीय' बनण्याचा चंग बांधला.

ही प्रक्रिया यापुढच्या काळातही अशीच चालू राहणार आहे.

आजच्या तरुणांपुढे वेगवेगळी ज्ञानक्षेत्रे आणि अभ्यासशाखा खुल्या झालेल्या आहेत. त्यामुळे तो देशातच नव्हे तर परदेशातही आपल्याला योग्य वाटणाऱ्या क्षेत्रात काम करू शकतो.

जागतिक अर्थव्यवस्थेचा एक नगण्य भाग असणारी भारतीय अर्थव्यवस्था आज आपले स्थान उंचावण्यासाठी पुढे सरसावली आहे.

या प्रक्रियेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मधुसूदन दत्तात्रय साठे यांनी 'जागतिक

**अर्थशास्त्राचा अभ्यास नसणाऱ्यांनाही हे पुस्तक वाचून जागतिक अर्थव्यवहारातील मुख्य प्रवाहांचा बराचसा उलगडा होऊ शकेल, त्यातील गुंते समजू शकतील आणि जागतिकीकरणाची भावी दिशा कशी राहील याची थोडीफार कल्पना येऊ शकेल.**

अर्थव्यवस्था' या पुस्तकात केला आहे. गेल्या पंधरावीस वर्षांत वेळोवेळी लिहिलेल्या ७९ लेखांचे हे संकलन आहे.

जागतिकीकरण, ऐतिहासिक संदर्भ, दारिद्र्य आणि रोजगार, शेअर मार्केट, खनिज तेलाचे राजकारण व अर्थकारण, आर्थिक सुधारणा, मंदी, तूट, चलन बाजार, चलनवाढ व चलन संकोच अशा दहा ढोबळ शीर्षकांखाली वर्गीकरण करून पेश केलेल्या लेखांतून गेल्या पंधरा वर्षांतील आर्थिक घडामोडींचा एक समग्र- सम्यक आलेख डोळ्यापुढे उभा राहतो.

अर्थशास्त्राचा अभ्यास नसणाऱ्यांनाही हे पुस्तक वाचून जागतिक अर्थव्यवहारातील मुख्य प्रवाहांचा बराचसा उलगडा होऊ शकेल, त्यातील गुंते समजू शकतील आणि जागतिकीकरणाची भावी दिशा कशी राहील याची थोडीफार कल्पना येऊ शकेल.

मधुसूदन साठे हे १९८९ पासून अठरा वर्षे महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे सदस्य होते. आठवी, नववी व दहावी पंचवार्षिक योजना तयार करण्यात त्यांनी भाग घेतला. रोजगार, मनुष्यबळ नियोजन, दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम, दुर्बल घटकांचे आर्थिक व्यवस्थापन, पेयजल व्यवस्था, रोजगार नियोजन, वनीकरण, सिंचन, गृहनिर्माण, शिक्षण वगैरे अभ्यासगटात त्यांनी काम केले. शेळी-मेंढी आयोग, बालिका विकास कार्यक्रम, अवर्षणप्रवणक्षेत्र, रोजगार हमी योजना वगैरे उपक्रमांशी संबंधित समित्यांवरही त्यांनी काम केले. त्यामुळे अधिकृत शासकीय आकडेवाऱ्या आणि तपशील त्यांना सहजपणे उपलब्ध झाले. त्यावरून काही निष्कर्ष काढणे त्यांना सोपे गेले असेल. त्याबद्दल वेळोवेळी वृत्तपत्रांमध्ये लेख लिहून आपले विचार मांडण्याची निकडही त्यांना जाणवली असावी. त्यामुळे हे लेखन घडले. एखादे पुस्तक लिहावे असा विचार आधी नव्हता. त्यामुळे या लेखांमध्ये अभ्यासपूर्ण (ॲकॅडमिक) पुस्तकाला लागणारी मांडणी दिसणार नाही; परंतु जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील अनेकविध कळीचे विषय या लेखांमध्ये चर्चेला घेतले गेले आहेत; त्यामुळे हे पुस्तक वाचून सामान्य जागरूक वाचकालाही या व्यवहाराची व्याप्ती कळू शकेल.

मधुसूदन साठे यांची १९७८ पासून डेव्हलपमेंट ग्रुप ही स्वयंसेवी संस्था



सुरू केली. आणि २५ वर्षे सचिव म्हणून तिचे काम पाहिले. अनेक स्वयंसेवी संघटनांना प्रकल्प तयार करून परदेशी देणगीदार संस्थांद्वारे मदत मिळवून दिली. रोजगार हमी योजनेवर लक्ष ठेवून तिचे मूल्यमापन करून दोष दूर करण्याबाबत आग्रह धरला. शासनाच्या विकास कामाचे मूल्यमापन करणारे अहवाल तयार केले. फळ, बागायत, शेती, दुग्धविकास, पेयजल समस्या, मेळघाटातील बालमृत्यू, धरणग्रस्तांचे पुनर्वसन वगैरे अनेक विषयांवर अभ्यासगटातर्फे अहवाल तयार करून घेतले. त्यामुळे कागदावरील योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते याचे वास्तवही त्यांना नेमके ठाऊक आहे. या सर्व पार्श्वभूमीमुळे त्यांच्या लेखांमध्ये स्वानुभवाधिष्ठित वस्तुस्थितीचेही पडसाद उमटणे अपेक्षित असणारच.

**लोकशाही आणि स्वातंत्र्य यापलीकडे जे प्रश्न आहेत ते यापुढे महत्त्वाचे ठरणार आहेत. अरब देशांतील तेलसाठ्यांवर प्रगत जगाचे लक्ष आहे. ख्रिश्चन आणि इस्लाम या दोन संस्कृतींमध्ये त्यामुळे संघर्ष होणे अटळ आहे असे जाणकारांना वाटते.**

एकविसावे शतक हे जगात लोकशाही युग प्रस्थापित करील असा अनेकांचा आशावाद आहे. लोकशाही व्यवस्थेची व्याप्ती वाढावी, लोकशाही मूल्ये प्रस्थापित व्हावी याबद्दल अमेरिका-युरोपीय देश यांचा आग्रह आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाची एकाधिकारशाही आहे. पारंपरिक लोकशाही व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी तेथील जनता उदासीन आहे... इराकवर हल्ला करून, सद्दामला यमसदनी पाठवून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश इराकमध्ये आणि पर्यायाने अरब देशांमध्ये लोकशाही व्यवस्था सुरू करू पाहत आहेत– पण ते किती अवघड आहे हे यापुढे स्पष्ट होत जाईल.

लोकशाही आणि स्वातंत्र्य यापलीकडे जे प्रश्न आहेत ते यापुढे महत्त्वाचे ठरणार आहेत. अरब देशातील तेलसाठ्यांवर प्रगत जगाचे लक्ष आहे. ख्रिश्चन आणि इस्लाम या दोन संस्कृतींमध्ये त्यामुळे संघर्ष होणे अटळ आहे असे जाणकारांना वाटते. मुस्लीम देशांना निधर्मी राज्याची, लोकशाहीची संकल्पना दूरस्थ वाटते.

मुस्लीम जीवनशैलीला पाश्चात्त्य मोकळेपणाचे, स्त्री-पुरुष समानतेचे मूल्यही पचनी न पडणारे वाटते. तेव्हा लोकशाहीचे बीज मुस्लिम राष्ट्रात रुजणे एकूण कठीणच!

११ सप्टेंबर २००१ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील अभूतपूर्व हल्ल्यामुळे अमेरिका विरुद्ध मुस्लिम जग अशी सरळ विभागणी होऊ शकते. सुदैवाने

**अमेरिकेला जागतिकीकरणाद्वारे आपले वर्चस्व जगावर प्रस्थापित करायचे आहे. जगभर भांडवलशाही अर्थव्यवस्था हवी आहे. खुली स्पर्धा, मुक्त अर्थव्यवस्था हवी आहे. मात्र आपल्या बौद्धिक संपदेचा खास वाटाही हवा आहे.**

मुस्लिम जगात धर्माबाबत आग्रह असला तरी त्यातील पंथभेदांमुळे वेगवेगळे गट आहेत. त्यामुळे हा संघर्ष काही प्रमाणात क्षीण ठरलेला आहे. आंतरराष्ट्रीय संबंधातील ताणतणावांमुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतही अनेक अडचणी उभ्या राहणार आहेत. हार्वर्ड युनिव्हर्सिटीतील प्रा. सॅम्युएल हटिंगटन यांनी असा विचार मांडला आहे, असे श्री. साठे नमूद करतात. (पृष्ठ २४)

अमेरिकेला जागतिकीकरणाद्वारे आपले वर्चस्व जगावर प्रस्थापित करायचे आहे. जगभर भांडवलशाही अर्थव्यवस्था हवी आहे. खुली स्पर्धा, मुक्त अर्थव्यवस्था हवी आहे. मात्र आपल्या बौद्धिक संपदेचा खास वाटाही हवा आहे. इतर देशांतील पारंपरिक ज्ञानावरील पेटंट्स अमेरिका आपल्या नावावर घेऊन जगाची कोंडी करू शकते.

इतर देश त्याबाबत वेळीच जागरूक न झाले तर जागतिकीकरण म्हणजे अमेरिकी वर्चस्व एवढेच समीकरण उरेल.

हळद, बासमती तांदूळ वगैरे बाबतीत अमेरिकेने पेटंट्स मिळवण्याचा केलेला बनाव भारताने उधळून लावला; परंतु इतर देशही आपल्या पारंपरिक ज्ञानाबाबत इतके जागृत राहिले तरच असे प्रयत्न रोखता येतील. अमेरिका एकीकडे खुली अर्थव्यवस्था हवी असे म्हणते, परंतु परदेशातून होणाऱ्या आयातीवर भरमसाट कर लादते; आयातीचा कोटा ठरवून आपल्या उद्योगधंद्यांना संरक्षण देते– हीही वस्तुस्थिती आहे. अमेरिका आपल्या तंत्रज्ञानापोटी भरपूर रॉयल्टी तिसऱ्या जगाकडून वसूल करते. बॅरिस्टा कॉफीसाठी तीस-पस्तीस रुपये कपाला आपण देतो, तेव्हा त्यापैकी काही टक्के रॉयल्टीपोटी परदेशात जात असतात. येथे इतर हॉटेलात कॉफीचा कप जेवढ्याला विकला जातो, त्यापेक्षाही ही रॉयल्टीची रक्कम जास्त ठरते. परंतु ब्रँडनेमच्या आकर्षणामुळे वस्तूच्या अवास्तव किमती द्यायची आपली मानसिकता तयार होते. त्या मानसिकतेचा अंगीकार करणे मध्यम व उच्च वर्गाला अवघड वाटत नाही; मात्र एकूण अर्थव्यवस्थेत आपल्या सामान्य माणसाची त्यायोगे लुबाडणूकच होत जाते... असा एक विचारप्रवाह आहे. तो गंभीरपणे लक्षात घेण्याची गरज या नव्या अर्थव्यवस्थेच्या भव्यतेने दिपून गेलेल्यांना भासत नाही असे दिसते.



आशियातील वेगवेगळे सांस्कृतिक समुदाय आपल्या समाजाला अनुकूल अशी भांडवलशाही विकास पद्धती निवडतील असा दृष्टिकोन जोसेफ स्टिगलिझ यांनी 'कॅपिटलिझिम अँड इट्स डिकन्टेन्ड्स्' या पुस्तकात मांडला आहे.

**अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची भूमिका, चीनच्या मुद्राविषयक धोरणाचे भवितव्य आणि खनिज तेलाची किंमत या तीन बाबी जागतिक अर्थव्यवहारात गुंतागुंत निर्माण करीत आहेत; याकडे साठे लक्ष वेधतात.**

गेल्या काही वर्षांत अमेरिकनेच अर्थसहाय्य करून जागतिक अर्थव्यवस्था चालू ठेवली आहे; परंतु दीर्घकालीन विचार करता अमेरिकेने विदेशी व्यापाराच्या चालू खात्यात सतत तूटच दाखवणे योग्य ठरणार नाही; त्यातून असमतोल वाढेल, अस्थिरता निर्माण होईल, वित्तीय पेचप्रसंग उद्भवेल; असा धोका अर्थतज्ज्ञ जॉर्ज सोरोस यांनी दाखवला आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था अशीच रखडलेली राहिली तर इतरांचीही फरफट होईल असे त्यांना वाटते. त्यासाठी श्रीमंत देशांनी दरवर्षी स्पेशल ड्रॉइंग राइटस निर्माण करावेत व गरीब राष्ट्रांना अधिक मदत देऊन विकास प्रक्रियेच्या फायद्याची अधिक समानतेने वाटणी करावी असा सल्ला ते देतात. (३७) बुश प्रशासनाने कृषिक्षेत्राला, पोलाद उद्योगाला, विमान कंपन्यांना भरपूर अनुदाने देऊन संरक्षण दिले. जागतिक व्यापार संघटनेने त्याबद्दल अमेरिकेला दंडही ठोठावला. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर होण्याचा धोका आहे.

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हची भूमिका, चीनच्या मुद्राविषयक धोरणाचे भवितव्य आणि खनिज तेलाची किंमत या तीन बाबी जागतिक अर्थव्यवहारात गुंतागुंत निर्माण करीत आहेत; याकडे साठे लक्ष वेधतात. (४१) या तिघांमुळे बाजारातील तरलता हरवली आहे. ही व्यवस्था दीर्घकाळ चालू राहणे अनर्थकारक ठरणार आहे.

चीनचा आर्थिक वाढीचा वेग बारा टक्के आहे. असा चीनचा दावा आहे; परंतु तो त्याहून जास्त आहे आणि चीनला आपल्या या वाढीवर काबू ठेवता येत नाही; 'सॉफ्ट लँडिंग' न जमले तर चीनची अर्थव्यवस्थाही धोक्यात येईल; बाजारपेठेतील दरांना हात न घालता प्रशासकीय हस्तक्षेपाद्वारे चीन व्याजदर व परदेशी विनिमय दर स्थिर ठेवत आहे; परंतु हे दीर्घकाळ शक्य होणार नाही असा धोका आहे.

जागतिक विकास प्रक्रियेत भारताचा क्रम हा इ. स. १९९६ ते २००० या

**भारत व चीन यामध्ये १०० कोटी श्रमिकांची उपलब्धता आहे... एवढा मोठा कामगारवर्ग उपलब्ध असल्याने विकसित देशातील कामगारांच्या रोजगारावर परिणाम होणार आहे. कमी पगारात काम करणाऱ्यांना जास्त संधी मिळणार आहे.**

काळात घसरला. त्या आधीच्या वीस वर्षांत तो अकरावा होता; या पाच वर्षांत तो सत्ताविसावा झाला. या पाच वर्षांत दरडोई उत्पन्नातील वाढ झाली; तरीही क्रमांक खाली का गेला याची मीमांसा साठे करतात. (४९)

भारत व चीन यामध्ये १०० कोटी श्रमिकांची उपलब्धता आहे... एवढा मोठा कामगारवर्ग उपलब्ध असल्याने विकसित देशातील कामगारांच्या रोजगारावर परिणाम होणार आहे. कमी पगारात काम करणाऱ्यांना जास्त संधी मिळणार आहे. अमेरिकेत उत्पादित होणारा माल हा महाग ठरणार आहे. तोच माल चीन वा भारत या देशांत उत्पादित केला तर स्वस्त पडणार आहे. त्यामुळे अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होणार आहे. अमेरिकन लोकांना वाढती बेकारी भेडसावत आहे. त्यामुळे तेथे असंतोष व अस्वस्थता आहे. भारतीय तज्ज्ञांच्या विरोधातही काही वेळा तेथे जनमत प्रकट होत आहे. प्रगत देशातील रोजगारात होणारी घट ही एक नवीनच समस्या यापुढे भेडसावणार आहे.

प्रगत औद्योगिक देशात भांडवलशाही व्यवस्था विकासाच्या एका टप्प्यावर येऊन थांबली आहे. या देशातील उत्पादनाची व्यवस्था कार्यक्षम होणे, श्रमाची कामे बाहेरच्या देशात जाणे आणि ग्राहकांच्या नवीन मागण्या निर्माण होणे– या बाबतीत अर्थक्षेत्रात नवी मांडणी होण्याची गरज आहे. (५६)

भारत आणि चीन यांच्यातील तुलनाही नेहमी होत असते. ऐंशीच्या दशकात चीनने १०.१ टक्के वार्षिक वाढीचा दर टिकवला. नव्वदीच्या दशकात तो १०.७ वर नेला. भारतात हा दर अनुक्रमे ५.८ आणि ६.१ टक्के होता. रोजगारवाढीचा दर या काळात चीनमध्ये २.४ आणि १.७ टक्के होता, तर भारतात १.९ आणि १.६ टक्के होता.

भरपूर नैसर्गिक साधनसंपत्ती असणाऱ्या देशांबाबतही अर्थशास्त्रज्ञ सध्या विशेष चिंता आणि चिंतन करीत आहेत.

खनिज तेलाचे साठे अरब देशांत भरपूर आहेत. त्यामुळे तेथे तुफान श्रीमंती आहे. मात्र नवे रोजगार निर्माण होत नाहीत. या देशांत उद्योगधंदे नाहीत. कृषिमालाचे उत्पादन होत नाही. येथील जनता गरीबच राहते. विषमता वाढते आहे. त्याबरोबर असंतोषही वाढत आहे.



आर्थिक सुधारणा करण्यासाठी व्यापक लोकमताची संमती लागते. ही राजकीय प्रक्रिया आहे. (७७) भारतासारख्या देशात कम्युनिस्ट व डावे पक्ष या प्रक्रियेत खीळ घालतात... भ्रष्टाचाराचाही अनेक देशांत मोठाच अडसर जाणवतो. भ्रष्ट व्यवस्थेतही भारत आर्थिक वाढीचा सहा टक्के दर गाठू शकतो, याचे साठे यांना कौतुक वाटते. (८५)

**खनिज तेलाचे साठे अरब देशांत भरपूर आहेत. त्यामुळे तेथे तुफान श्रीमंती आहे. मात्र रोजगार निर्माण होत नाहीत. या देशांत उद्योगधंदे नाहीत. कृषिमालाचे उत्पादन होत नाही. येथील जनता गरीबच राहते.**

भारतातील सरकारी नोकरशाहीचा व्याप आणि पसारा हा कोणताही निर्णय घेण्यात अडसर ठरतो. भ्रष्टाचार दूर झाला तरी हा अडसर विकासाच्या मार्गात खीळ घालतो असे साठे यांना वाटते. (८४)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विषमता वाढली आहे; गरिबी वाढली आहे असा आरोप करण्यात येतो. साठे यांना हा आरोप मान्य नाही. जागतिकीकरणामुळे गरिबी दूर होऊ शकेल, अधिक औद्योगिकीकरण होईल; अधिक अन्नधान्य उत्पादन होईल असे त्यांचे मत आहे. (९५)

श्रीमंत देशांचा जी-८ हा गट आहे. त्यांच्या बैठका वरचेवर होतात. या गटातील देशांची लोकसंख्या १०० कोटी आहे; वार्षिक दरडोई उत्पन्न २५ हजार डॉलर्स आहे. चीन, भारत व पूर्व आशियातील देश मिळून ३०० कोटी लोकसंख्या आहे. येथील आर्थिक विकासाचा दर सुधारत आहे. उर्वरित २०० कोटी लोकसंख्या दरिद्री आहे; औषध, पेयजल, अन्न, शिक्षण, स्वच्छता या सुविधांपासून ही लोकसंख्या वंचित आहे. हे दारिद्र्य कसे संपवायचे हा प्रश्न आहे. त्याबाबत वेगवेगळे विचारप्रवाह आहेत. या पुस्तकात त्यासंबंधी १९ लेख आहेत. याबाबत केन्सचे अर्थशास्त्र कुचकामी ठरले आहे. स्पर्धायुक्त बाजारव्यवस्था, भांडवलशाही आणि शासन यंत्रणेची धोरणे– यावर अर्थव्यवस्था अवलंबून असते. प्रत्येक देशाने याबाबत स्वत:चा मार्ग शोधायला हवा, उदारीकरण आणि खाजगीकरण यांच्या माध्यमातून सामाजिक हित व स्वास्थ्य सांभाळायला हवे. (१५४)

जागतिक स्पर्धेत ब्रँडचे महत्त्व, घरोघर इंटरनेटचा वापर, जागतिक अर्थव्यवस्थेतील इ. स. २००१-२००३ या काळातील मंदीची लाट, आजच्या जगातील आर्थिक अनिश्चितता, आर्थिक तूट, आंतरराष्ट्रीय कर्जाचे वाढते प्रमाण, चलनबाजार, चलन संकोचाचा धोका अशा अनेक विषयांचेही विवेचन मधुसूदन साठे यांनी केले आहे.

**...असे अनेक महत्त्वाचे विषय हाताळणारे हे लेख, हे पुस्तक आर्थिक व्यवहारात रस असणाऱ्यांना आवडेल. एक व्यापक मागोवा यात घेतला गेला आहे. ज्यांना आर्थिक व्यवहारात फारसे गम्य नाही त्यांना एकूणच या विषयाची व्याप्ती किती प्रचंड आहे, याची कल्पना या पुस्तकावरून येईल.**

अमेरिकन डॉलरचा वापर आजवर रिझर्व्ह करन्सी म्हणून होत होता. आता डॉलरचे हे स्थान डळमळीत होऊ लागले आहे. आजही आशियाई देशांतील सेंट्रल बँका आपल्या विदेशी चलनाचा ७० टक्के भाग डॉलरमध्ये गुंतवतात. आता युरोने डॉलरला दणका देण्यास आरंभ केला आहे. अमेरिकेतील फेडरल बँकेने व्याजदरात सतत कपातीचे धोरण ठेवले आहे. तुटीचे अंदाजपत्रक करण्याचा मोह टाळला आहे. प्राप्तिकरात सूट दिली आहे. इराकमधील युद्धाने अमेरिकेवर बराच आर्थिक बोजा पडला. खनिज तेलाच्या किंमती सतत वाढत गेल्या. (त्या आता गेल्या काही महिन्यांत कमी होऊ लागल्या आहेत.) तरीही अमेरिकेने डॉलरचे अवमूल्यन होऊ दिलेले नाही.

...असे अनेक महत्त्वाचे विषय हाताळणारे हे लेख, हे पुस्तक आर्थिक व्यवहारात रस असणाऱ्यांना आवडेल. एक व्यापक मागोवा यात घेतला गेला आहे. ज्यांना आर्थिक व्यवहारात फारसे गम्य नाही त्यांना एकूणच या विषयाची व्याप्ती किती प्रचंड आहे, याची थोडीफार कल्पना या पुस्तकावरून येईल. अनेक नामवंत अर्थतज्ज्ञांच्या मतांचाही बोध होईल. या विषयांचे अधिक सखोल विवेचन करणारी पुस्तके वाचण्याची प्रेरणा मिळेल.

**पृष्ठे: ३०५ ● किंमत: २२०रु. ● सभासदांना: १६५रु. ● पोस्टेज: २५रु.**


**चित्रपट क्षेत्रातील नामवंतांच्या वैशिष्ट्यावर नेमके बोट ठेवून किंचितसा उपहास, उपरोध प्रकट करून, त्यांतील कलावंताचे, माणसाचे दर्शन घडवणारे 'कलरफुल' पुस्तक**



**ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट**


**संजय चुरमुरे**

**किंमत ९०रु.**
**पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**








# ए कॉल टू ऑनर

**उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी साद**

**जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये**

**४००रु. | पोस्टेज ३०रु.**

भारतीय परराष्ट्र धोरणाला आपल्या तौलनिक कार्यशैलीने यशस्वी आकार देणारे श्री. जसवंतसिंग यांचे हे गाजणारे अनुभवकथन.

अणुचाचण्यांमुळे भारताविरुद्ध गेलेली जागतिक परिस्थिती, आयसी ८१४ या इंडियन एअरलाईन्स च्या विमानाचे अपहरण आणि त्यानंतर तत्कालिन सरकारचे धोरण, कारगिलयुद्ध, अणुबॉंब आणि पाकिस्तानी अस्मिता, संसदेवरील अतिरेक्यांचा हल्ला, अशा अनेक घटनाप्रसंगातील तत्कालिन सरकारची भूमिका स्पष्ट करणारे खळबळजनक पुस्तक.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**वाईट प्रशासन हीच भारताच्या प्रगतीला खीळ घालणारी सर्वात गंभीर गोष्ट आहे.**

# इंडिया इन स्लो मोशन

**मार्क टुली**

**अनु. अजित ठाकूर**

मार्क टुली हे बीबीसीचे प्रतिनिधी म्हणून भारतात गेली तीन दशके काम करीत आहेत आणि भारतीय मानसिकतेचा, भारतीय संस्कृतीचा आणि भारतातील राजकारणाचा चौफेर मागोवा घेण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न अजूनही चालू आहे.

राजधानीतील वरिष्ठ वर्तुळात 'बीबीसी' म्हटल्यावर सहज प्रवेश मिळतो; परंतु मार्क टुली यांनी आपल्या सौहार्दतेने, समंजस वृत्तनिवेदनाने उच्चपदस्थांचा विश्वासही संपादन करून पत्रकारितेत आपले विशेष स्थान निर्माण केले आहे. भारतात दीर्घकाळ राहूनही येथील समाजातील, राजकारणातील, जातीजमातीतील जे वाद-विसंवाद आणि सूक्ष्म ताणतणाव आहेत; त्यांची व्याप्ती आपल्या लक्षात पूर्णतया येऊ शकत नाही अशी त्यांची भावना आहे आणि त्यामुळे येथील लोकांच्या कृतीतील आणि उक्तीतील संगती कशी लावायची असा त्यांना प्रश्न पडतो.

बी.बी.सी. ही तटस्थ, नि:पक्षपाती बातम्या देण्याबाबत कटाक्ष बाळगते; त्या परंपरेची पालखी वाहत असताना भारतीय घडामोडींचे, राजकारणातील गुंतागुंतीचे समग्र वा सम्यक दर्शन घडवणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु मार्क टुली यांनी भारताबद्दलची सहानुभूती न सोडता, भारतीय मानसिकतेची बूज राखत येथील घटनांचे सादरीकरण आणि विश्लेषण करून भारतीयांच्या प्रश्नांबद्दल सदैव जागरुकता दाखवलेली आहे.

'इंडिया इन स्लो मोशन' हे त्यांचे पुस्तक इ. स. २००२ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच्या अनेक आवृत्त्या इंग्रजीत निघाल्या. गाजल्या. त्याचेच मराठीत भाषांतर मेहता पब्लिशिंग हाऊसने बाजारात आणले आहे.



या पुस्तकात मार्क टुली यांनी आपल्या कारकीर्दीतील अनेक महत्त्वपूर्ण बातम्यांचा, घटनांचा मागोवा घेतला आहे. वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी प्रवास केला, संबंधित व्यक्तींना भेटून त्यांच्याशी चर्चा करून सत्याचा छडा लावण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला.

**या पुस्तकात मार्क टुली यांनी आपल्या कारकीर्दीतील अनेक महत्त्वपूर्ण बातम्यांचा, घटनांचा मागोवा घेतला आहे. वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी प्रवास केला, संबंधित व्यक्तींना भेटून त्यांच्याशी चर्चा करून सत्याचा छडा लावण्याचा प्रयत्न केला.**

बाबरी मशीद व रामजन्मभूमीवाद, उत्तरप्रदेशातील गालिचे तयार करण्याच्या उद्योगातील बालमजुरांची अवस्था आणि बालमजुरांचा शोध घेण्यासाठी स्थापन केलेल्या शासकीय तसेच अन्य संस्थांच्या कार्यपद्धतीचे स्वरूप, 'तहलका'द्वारे संरक्षणखात्यातील उच्चपदस्थ आणि समता पक्ष, भाजप यांच्या प्रमुखांनी घेतलेली लाच यावर टीव्हीद्वारे टाकण्यात आलेला प्रकाश, गोव्यातील कॅथॅलिक रोमन चर्चचे बदलत चाललेले स्वरूप आणि गोव्यातील चर्चला स्वायत्तता दिल्यास सनातन ख्रिश्चन धर्मात हिंदू धर्मातील प्रथांचा समावेश होईल म्हणून व्हॅटिकनला वाटणारी भीती, गोव्यातून युरोपमध्ये जाणारे प्रशिक्षित धर्मोपदेशक, गोव्यात धर्मावरून चाललेले राजकारण, हैदराबादला सायबर सिटी बनवण्याचा चंद्राबाबू नायडू यांचा प्रयत्न आणि त्याला तेथील नोकरशहा, राजकीय पुढारी आणि बुद्धिमान वर्ग यांजकडून मिळणारा खरा-खोटा पाठिंबा वा होणारा विरोध, दिल्लीत निजामुद्दिन अवलियाच्या दर्ग्याचा उत्सव आणि त्या निमित्ताने भारतातील सुफी पंथाचा प्रभाव व व्याप यांचा घेतलेला आढावा, इ. स. २००१ मधील कर्नाटकातील कर्जबाजारी शेतकरी व त्यांच्या आत्महत्या, खासदार संत बक्ष आणि विश्वप्रताप सिंग या दोघा भावांचे संबंध आणि राजकीय लागेबांधे (व्ही. पी. सिंग यांना इंदिराजींच्या निकट आणून सत्तास्थानी बसवणाऱ्या संत बक्ष यांना भावाने आपल्याला दगा दिला, आपल्याशी द्रोह केला ही भावना अखेरच्या दिवसांत फारच पोखरणारी वाटली.)

नर्मदा आंदोलन आणि मेधा पाटकर यांच्याच जोडीने गुजरात-सौराष्ट्रात जलसंधारण क्षेत्रात काम करणारे दिनेश राजा आणि मनसुखभाई सुवागिया– आणि धरणाच्या बाबतीत सर्रास चालणारा भ्रष्टाचार, काश्मीर प्रश्नाचा तिढा– असे काही विषय मार्क टुली यांच्या या पत्रकारितेच्या कारकीर्दीत हाताळले गेले. त्याबद्दल रिपोर्ताजच्या धर्तीवर मार्क टुली यांनी लेख लिहिलेले आहेत.

**''खास भारतीय पद्धतीचे वाईट प्रशासन ही भारतापुढील मूलभूत समस्यांपैकी एक सर्वात महत्त्वाची समस्या आहे.'' ''सरकारी नोकरशाही म्हणजे सेवा पुरवणारी संस्था नाही तर लोकांची पिळवणूक करणारी संस्था अशीच प्रतिमा लोकमानसात तयारी झालेली आहे.**

त्या त्या प्रश्नांचे त्यांना उलगडत गेलेले पैलू या वृत्तान्तवजा लेखांतून प्रकट होतात. आपण भारतातील भ्रष्टाचार, नोकरशाहीची अडवणुकीची मानसिकता, राज्यकर्त्यांची स्वार्थबुद्धी वगैरे विषयांबद्दल सतत बोलत असतो, परंतु मार्क टुली हे निरनिराळ्या व्यक्तींना भेटून त्यांच्या मुखातून या भ्रष्टाचाराच्या, गैरप्रकारांच्या हकीकतीच आपल्यापुढे पेश करतात आणि त्यांची व्याप्ती किती सर्व थरांना ग्रासून टाकणारी आहे हे स्पष्ट करतात.

प्रास्ताविकात ते म्हणतात, ''खास भारतीय पद्धतीचे वाईट प्रशासन ही भारतापुढील मूलभूत समस्यांपैकी एक सर्वात महत्त्वाची समस्या आहे.''

अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना राष्ट्रीय विकास परिषदेसमोर भाषण करताना म्हटले होते, ''सरकारी नोकरशाही म्हणजे सेवा पुरवणारी संस्था नाही तर लोकांची पिळवणूक करणारी संस्था अशीच प्रतिमा लोकमानसात तयार झालेली आहे. जास्त फलदायी पण धोका कमी अशा प्रकारचा भ्रष्टाचार हा एक व्यवसायच झालेला आहे.''

मार्क टुली त्यापुढे जाऊन म्हणतात, ''सरकारी अधिकाऱ्यांच्या सतत होणाऱ्या बदल्या आणि फारच अपुरा कार्यकालावधी यामुळे प्रामाणिक अधिकाऱ्यांचे नीतिधैर्य आणि कार्यशैली यावर गंभीर परिणाम होतो. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून शिस्त आणि कार्यक्षमता यांची अपेक्षा करणाऱ्या सक्रिय राजकीय नेत्यांनी स्वत:च्या कामगिरीचेही टीकात्मक परीक्षण करण्याची गरज आहे... **वाईट प्रशासन हीच भारताच्या प्रगतीला खीळ घालणारी सर्वात गंभीर गोष्ट आहे...''**

'इंडिया इन स्लो मोशन'मध्ये वाईट प्रशासनाची उदाहरणेच प्रामुख्याने आहेत; त्याविरुद्ध लढा देणाऱ्यांच्या हकीकतीही सांगितल्या आहेत. ''**वाईट प्रशासनामुळे भारतीय जनतेतील प्रचंड सुप्त शक्ती वाया जात आहे.''**

सर्वसामान्य लोकांशी अनौपचारिकपणे बोलायचे, त्यांची मते ऐकायची हा मार्क टुली यांचाही एक वार्ताहर म्हणून खास विशेष! अयोध्येला भाजपच्या एका तरुणाने मार्क टुली यांना चहासाठी बोलावले. ''भाजपने मशिदीला धक्काही लागणार नाही, मंदिराच्या बांधकामाची फक्त प्रतीकात्मक सुरुवात होईल असे



**तहलका प्रकरणाने उच्च स्तरावरील भ्रष्टाचार उघडकीला आणला; त्याच जोडीने राजस्थानातील ग्रामीण योजनांमधील भ्रष्टाचार अरुणा रॉय आणि मजूर किसान संघटन यांनी बाहेर काढला.**

वचन दिले होते. पण ते पाळले नाही या गोष्टीचाही तुला अभिमान वाटतो का?'' असा प्रश्न विचारल्यावर तो तरुण म्हणाला, ''हे काम भाजपने केले नाही. तिथे जमलेल्या भक्तगणांच्या उत्साहामुळे लोक वाहवत गेले... त्यांना थांबवण्याचा प्रयत्न भाजपने केला असता तर त्यांनाही खूप मार पडला असता.'' पंधरा वर्षे झाली. अजून मंदिराची एक वीटही बसवली गेली नाही. याकडे टुली लक्ष वेधतात.

याच अयोध्येत अजय छावछारिया हा तरुण मार्क टुली यांना सांगतो, ''माझा राम हा विश्वहिंदू परिषदेच्या रामापेक्षा वेगळा आहे. श्रीरामचरितमानसमधला राम हा माझा राम.'' रामाच्या खांद्यावर डोके ठेवून आपला शेवट व्हावा ही त्याची इच्छा आहे. रामाच्या देवळातील मूर्तीला किंवा पुजाऱ्याला खाली वाकून अजय नमस्कार करीत नाही. ''मी रामाला देवापेक्षाही माझा भाऊ म्हणून मानतो.''

तहलकाने संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस, जया जेटली, बंगारू लक्ष्मण वगैरेंना लाच देताना दाखवून उच्चपदस्थांचा भ्रष्टाचार उघड केला.

त्यावेळच्या सरकारने तहलकावर न्यायालयीन चौकशीचे हत्यार वापरले.

इन्कम टॅक्सच्या अधिकाऱ्यांनी तहलकाच्या ऑफिसवर धाड घातली. सगळे हिशेब तपासले. तहलका डॉट कॉममध्ये शंकर शर्मा आणि देवीना मेहरा यांचे १४.५ टक्के भांडवल होते. हे दोघ फर्स्ट ग्लोबल शेअर खरेदीविक्री करणाऱ्या संस्थेचे संस्थापक होते. त्या कंपनीचाही परवाना सेबीने रद्द केला. शंकर शर्मा आणि देवीना मेहरा यांच्या मालमत्तेवर जप्ती आणली. त्यांची बँकखाती गोठवली. शंकर शर्मा याला तिहार तुरुंगात अडीच महिने काढावे लागले. कुठलाही आरोप ठेवता न आल्याने त्यांना अखेर मुक्त केले गेले. परंतु सरकारने वेगवेगळे आरोप केले ते बिनबुडाचे ठरले. विरोधी पक्षांनी तहलका किंवा फर्स्ट ग्लोबल यांची भलावण केली नाही किंवा सरकार अडचणीत आल्याने त्याचे राजकीय भांडवलही केले नाही असे मार्क टुली म्हणतात. तहलका प्रकरणाने उच्च स्तरावरील भ्रष्टाचार उघडकीला आणला; त्याच जोडीने राजस्थानातील ग्रामीण योजनांमधील भ्रष्टाचार अरुणा रॉय आणि मजूर किसान संघटन यांनी बाहेर काढला. त्यातून

**पंचवीस कोटी मध्यमवर्गीयांचे मोठे मार्केट उपलब्ध होत आहे म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे भारतीय अर्थव्यवहारात, प्रशासनात काही बदल, काही सुधारणा होणे अपरिहार्य वाटते.**

माहितीच्या अधिकाराची मागणी पुढे आली. त्याचाही परामर्श मार्क टुली यांनी घेतला आहे.

या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण हे अनेक स्फोटक तपशील किंवा संदर्भ उघड करते... **त्या सर्वांचे सूत्र मात्र नोकरशाहीचा नाठाळपणा आणि सर्वंकष भ्रष्टाचार, प्रशासनातील ढिसाळपणा वा बेरकीपणा यावर प्रकाश टाकणे हेच आहे.** प्रत्येक भागाचे प्रश्न गंभीर आहेत. गुंतागुंतीचे आहेत. त्यात प्रशासनाची भूमिका ही प्रश्नांची सोडवणूक करण्याची टाळाटाळ करण्याचीच मुख्यत: दिसून येते.

'निष्कर्ष' हे शेवटचे प्रकरण फार महत्त्वाचे आहे.

१. भारतातील सर्व प्रकारच्या नागरिकांचे जीवित आणि मालमत्ता यांचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीबाबत राज्य सरकारे पूर्णत: उदासीन व बेपर्वा असतात.

२. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग ही एक जागृत शक्ती आहे; पण त्याच्या शिफारशी अमलात येतातच असे नाही.

३. सुप्रीम कोर्ट किंवा निवडणूक आयोग सरकारच्या अपयशाबद्दल ठोस भूमिका घेण्याचे धैर्य क्वचितच दाखवतात.

४. पोलीस खात्यात सुधारणा होत नाहीत. कारण बाहेरच्या शक्तींचा असा प्रभाव राजकीय नेत्यांना हवा असतो. पोलिसांनाही असा प्रभाव हवा असतो. हवी ती किंमत हवी असते.

५. सरकारी अधिकारी आणि पोलीस यांची मानसिकता वसाहतवादी, सरंजामी आहे.

६. चांगल्या प्रामाणिक सरकारी अधिकाऱ्यांना राज्यकर्ते त्रास देतात.

७. सरकारी अधिकारी आणि पोलीस कर्मचारी अधिकाराचा फायदा वाटून घेण्यासाठी एकमेकांना साथ करतात. त्यामुळे भ्रष्टाचार अनिवार्य ठरतो.

८. लायसेन्स-परमिट राज्य ही संकल्पना अजूनही आपल्या मानसिकतेत पक्की आहे.

९. पंचवीस कोटी मध्यमवर्गीयांचे मोठे मार्केट उपलब्ध होत आहे म्हणून



बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे भारतीय अर्थव्यवहारात, प्रशासनात काही बदल, काही सुधारणा होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे भारतीय लोक वाळूत फसणार आहेत असे मार्क टुली यांना वाटते.

**भारतातील किचकट नियम, बंधने, दिरंगाई, नोकरशहांची बेपर्वा वृत्ती यामुळे नेता-बाबू राज्याबरोबर कमालीची अकार्यक्षमता निर्माण झालेली आहे. या भ्रष्टाचारामुळे उद्योजक वैतागतात. पैसा देऊनही काम होईल अशी खात्री नाही.**

हे विधान अर्धवट बरोबर/अर्धवट चूक हे ज्याचे त्याने ठरवावे असे ते म्हणतात.

१०. १९९१ नंतरच्या उदारीकरणामुळे ज्या सुधारणा भारतावर लादल्या गेल्या त्यांचा परिणाम अर्थव्यवस्थेवर निश्चितच पडलेला दिसतो. त्याबाबत २००२ साली टुली म्हणतात– ''हा उत्साह फार टिकला नाही.''

परंतु हे विधान आज २००७ साली, शेअर बाजार १४ हजार निर्देशांकावर जात आहे– तेव्हा करणे अ-वास्तव ठरते. परंतु एकूण परिस्थितीबाबत काहीशी साशंकता उरते हे खरे आहे.

११. नेता-बाबू भ्रष्टाचाराचा स्पर्श झालेला नाही असे एकही अंग भारतीय जीवनात दिसत नाही. सरकारचे हात सर्वदूर पसरलेले आहेत.

१२. सर्व काही सरकारने करावे असे भारतीय नागरिक मानतात. लोकांमध्ये स्वत: होऊन काही करण्याचे आत्मबळ नाही, स्वयंस्फूर्ती नाही.

१३. भारतातील किचकट नियम, बंधने, दिरंगाई, नोकरशहांची बेपर्वा वृत्ती यामुळे नेता-बाबू राज्याबरोबर कमालीची अकार्यक्षमता निर्माण झालेली आहे. या भ्रष्टाचारामुळे उद्योजक वैतागतात. पैसा देऊनही काम होईल अशी खात्री नाही. ''प्रामाणिक भ्रष्टाचाराचे दिवस संपले'' असे भ्रष्टाचार निर्मूलन आयुक्तच म्हणतात, याकडे मार्क टुली लक्ष वेधतात.

१४. सरकारी प्रशासनाचा दर्जा कमी असल्याने भारताला औद्योगिक धोरण असणेच शक्य नव्हते. मूलभूत सुविधा, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रातच थोडेफार यश आपल्याला मिळाले आहे.

१५. अकार्यक्षमता, भ्रष्टाचार या पाठोपाठ जुलूमजबरदस्ती, दहशत, खंडणी, अपहरण वगैरे गोष्टींनीही भारतात असुरक्षितता निर्माण केली आहे.

१६. जुनाट, क्लिष्ट, अकार्यक्षम कारभारामुळे पैशाचा गैरवापर होतो. नियमांचा

**सतत डुलत डुलत पुढे जाणारा, कधी न थांबणारा पण हळूहळू पावले टाकणारा हत्ती म्हणजे भारत... लोकशाही येथे मुंगीच्या पावलांनीच येणार...**

सर्रास भंग होतो. कायद्याला मुरड घातली जाते. **प्रशासनात सुधारणा करण्यात कोणालाच रस नाही.**

१७. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणात जातीयवाद हा महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. नेहरूंचा धर्मनिरपेक्षतावाद हा योग्य होता; पण प्रत्यक्षात भारतीय राजकारणात धर्माचा वरचष्मा राहिलेला आहे. हिंदुत्ववादी आणि धर्मनिरपेक्षतावादी यांच्यात सतत संघर्ष चालू आहे. **मूलतत्त्ववाद हा अधिक कडवा, अतिरेकी आणि अवाजवी वाढतो आहे.**

१८. निवडणुकीत जातीयवादाला महत्त्व आल्याने मतदारांचे लक्ष चांगले प्रशासन वा नागरी हक्कांवर आधारित राजकीय वातावरण याकडे जातच नाही.

१९. **उच्चवर्ग हा जातीय राजकारण हे हीन प्रतीचे मानतो. पण खालच्या जातीचे वर्ग बहुसंख्य असल्याने, लोकशाहीत त्यांचे वर्चस्व झाले आहे.** दलित नेते हे स्वत: श्रीमंत होतात; पण प्रशासकीय सुधारणा वा समाजाचे कल्याण याकडे दुर्लक्ष करतात. सामाजिक विषमता कमी झाली असली तर राजकीय पक्ष जातीपलीकडे जाऊन विचार करीत नाहीत.

२०. नेता-बाबू राजवटीची अनिष्ट पकड सैल झाली तर भारताची प्रगती वेगाने होऊ शकतो.

२१. मध्यम व उच्चवर्ग स्वत:चे वैभव वाढवण्यात मग्न आहे. तो प्रतिकारात्मक उठावही करणार नाही.


२२. सतत डुलत डुलत पुढे जाणारा, कधी न थांबणारा पण हळूहळू पावले टाकणारा हत्ती म्हणजे भारत... लोकशाही येथे मुंगीच्या पावलांनीच येणार...

प्रशासन आणि इतर सार्वजनिक संस्थांची क्षमता वाढविणे, त्यांची व्यवस्थित बांधणी करणे व आर्थिक प्रश्नांना सावधपणे सामोरे जाणे हे आपल्या लोकशाहीत आवश्यक आहे. तरच भारतातील सुप्त शक्तीला खरा वाव मिळेल. प्रगतीचा वेग वाढेल. मार्क टुली यांचे हे पुस्तक विचारी वाचकाला निश्चितच अंतर्मुख करील.

**पृष्ठे :३२४● किंमत: २२०रु. ● सभासदांना:१६५रु. ● पोस्टेज:२५रु.**




## जेम्स बाँड मालिकेतील आगामी......




# द मॅन विथ द गोल्डन गन

**अनु. डॉ. देवदत्त केतकर**

**८०रु. पोस्टेज २०रु.**

केजीबी या रशियन गुप्तहेर संस्थेच्या आणि स्थानिक माफियाच्या मदतीने स्कॅरामांगा हा खतरनाक पिस्तुलबाज, जमैकात ब्रिटीश हेरखात्याला जेरीस आणतो.... याला आव्हान देण्याची जबाबदारी जेम्स बाँडवर पडते...... पण स्कॅरामांगाला जमैकात जाऊन आव्हान देणं म्हणजे सिंहाच्या गुहेत जाऊनं मृत्यूचं आमंत्रण स्विकारणं.....

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**प्रशासकीय सुधारणा करण्यात कोणालाच स्वारस्य नाही त्यामुळे सगळीकडेच गोंधळाचे वातावरण आहे.**

# गव्हर्नन्स

**अरुण शौरी**
**अनु. भारती पांडे**

अरुण शौरी यांनी एनडीए सरकारमध्ये निर्गुंतवणूक खाते, माहिती आणि प्रसारण खाते यांचा मंत्री म्हणून कारभार बघितला. पत्रकार म्हणून दीर्घकाळ शासकीय कामावर, भ्रष्टाचारावर आणि राजकारणावर त्यांनी भरपूर लेखन केले. अनेक प्रकरणे चव्हाट्यावर आणली. अनेक मानसन्मान मिळवले. **मंत्री म्हणून सरकारी खात्याचे काम करण्याचा जो अनुभव त्यांना आला तो आजवरच्या आपल्या सगळ्या शहाणपणाला निष्प्रभ ठरवणारा आहे असा त्यांचा ग्रह झाला. सरकार वा शासनयंत्रणा कुठलेही काम करू शकेल यावरचा त्यांचा विश्वासच उडाला.** नियम तयार करून त्यानुसार काम करायचे ही प्रक्रिया सुलभपणे सुरळीत काम करण्याऐवजी काम करण्यात अडथळे आणण्यासाठी आणि जास्तीत जास्त दिरंगाई करण्यासाठीच वापरायची असते, वापरली जाते असा त्यांना साक्षात्कार झाला आणि शासनयंत्रणेचे दिव्य विश्वदर्शन झाले.

नोंदी करताना कागदपत्रांवर किंवा फायलीत शाई कोणती वापरावी याबद्दलचे एक साधे उदाहरण देऊन त्यांनी ही गोष्ट स्पष्ट केली आहे.

सरकारी फायलीवर नोंदी करताना अधिकाऱ्यांनी लाल आणि हिरवी शाई वापरली होती. ते बघून पोलाद मंत्रालयाने त्या फायलीतील मजकूर न बघताच सुधारणा आणि सार्वजनिक गाऱ्हाणी या विभागाकडे एक पत्र पाठवून ''अधिकाऱ्यांना काळी किंवा निळी शाईव्यतिरिक्त इतर शाई वापरण्याची अनुज्ञा आहे का? याबाबत काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत का?'' अशी विचारणा केली.

या पत्रासंदर्भात मुद्रणविभाग, संचलनालय, गृहखात्यातील आस्थापना आणि प्रशिक्षण विभाग, प्रशासनिक सुधारणा विभाग, राष्ट्रीय पुराभिलेख विभाग, सैन्यदल-



आस्थापना विभाग, संरक्षण मंत्रालय, केंद्रीय सचिवालय पुन्हा प्रशासनिक सुधारणा विभाग वगैरे विभागांनी आपापली मते कळवली आणि शेवटी कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिकेत दोन बाबी समाविष्ट केल्या गेल्या. (एक- नोंदी फायलीतल्या नोंदविभागातील कागदावर करून क्रमांक घालावे. निळ्या व काळ्या शाईचा वापर करावा. दोन- फक्त भारत सरकारचे संयुक्त सचिव आणि त्यावरील हुद्दा असणाऱ्या अधिकाऱ्यांनी विशेष बाबीबाबत हिरवी किंवा लाल शाई वापरावी.)

**अरुण शौरी शासकीय कामकाजाच्या कार्यपद्धतीची चुणूक दाखवतात. कुठल्याही बाबीचा काथ्याकूट करण्यात शासनयंत्रणा तरबेज असते. नियमांच्या पालनापेक्षा नियमांचे बुजगावणे दाखवून कार्यविलंब व कार्यनाश करते.**

पुढे यालाच जोड दिली गेली.

''कच्चा खर्डा काळ्या किंवा निळ्या शाईत असावा. पुढील पातळ्यांवरील दुरुस्त्या हिरव्या वा लाल शाईत करायला हरकत नाही. कारण त्यामुळे नव्याने केलेल्या दुरुस्त्या लगेच लक्षात येऊ शकतील.''

विशिष्ट दर्जाच्या अधिकाऱ्याचा या कलमात उल्लेख नाही. दोन्ही कलमातील विरोध वा विसंगती कशा घ्यायच्या यावर त्याने आपले डोके घासावे.

हे उदाहरण पुस्तकाच्या आरंभीच देऊन अरुण शौरी शासकीय कामकाजाच्या कार्यपद्धतीची चुणूक दाखवतात. कुठल्याही बाबीचा काथ्याकूट करण्यात शासनयंत्रणा तरबेज असते. नियमांच्या पालनापेक्षा नियमांचे बुजगावणे दाखवून कार्यविलंब व कार्यनाश करण्यात ही यंत्रणा इतिकर्तव्यता मानते.

अरुण शौरी आणखी एक उदाहरण देतात.

आंतरराष्ट्रीय प्रकल्पांतील बांधकामविषयक कामांसाठी आदर्श निविदा तयार करण्यासाठी एम. जी. पाध्ये या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी १९८७ मध्ये नेमण्यात येते. वर्षभरात ती समिती अहवाल देते. त्याचवेळी दुसरीही एक वीर अमर प्रकाश समिती नेमून दुसऱ्या विभागातर्फेही आदर्श निविदा करण्याचे काम सुरू होते. पाध्ये समितीची आदर्श निविदा स्थानिक कंत्राटदारांसाठी वापरता येऊ शकेल असे वीर अमर प्रकाश समिती सांगते.

हा अहवाल मंत्र्यांच्या बैठकीत चर्चेला घेण्यात येतो. तो नगर विकास मंत्रालयाकडे पाठवायचा निर्णय होतो. इतर मंत्र्यांकडेही जातो.

या पाध्ये अहवालातील निविदेत आणि आपल्या निविदेत असणारे फरक वर्ल्ड बँक कळवते.

**शासनाच्या प्रत्येक लहानमोठ्या व्यवहारामध्ये बेफिकिरीने संथपणे काम करण्याची प्रवृत्ती दिसते. प्रक्रियेच्या प्रत्येक पायरीवर सर्व पर्यायांचा विचार होतो; पण त्या प्रत्येक पायरीवर एकेक बारीकसा किडा सोडून देण्यात येतो.**

त्याचा विचार करण्यासाठी पुन्हा एक समिती नेमली जाते. (१९९०)

नंतर त्यासाठी पटेल समिती नेमली जाते. (१९९१)

पटेल समितीचा अहवाल आर्थिक व्यवहार विभागाकडे जातो. (जानेवारी १९९४)

सचिव समिती शहर विकास मंत्रालयाला एक स्थायी समिती नेमण्याची सूचना करते. (मे १९९२)

आंतर मंत्रालयीन तांत्रिक बाबींसाठी स्थायी समितीची स्थापना होते. (सप्टेंबर १९९४)

वर्ल्ड बँकेकडे गेलेल्या पटेल अहवालाबद्दलची प्रतिक्रिया येते– आम्ही प्रमाणित केलेला मसुदाच ग्राह्य धरावा. स्थानिक गरजेनुसार मामुली फेरफार फारतर करता येतील. (मे १९९३)

हे मामुली फेरफार ठरवण्यासाठी आर्थिक व्यवहार विभाग खास टास्क फोर्स स्थापन करते.

आंतर-मंत्रालयीन स्थायी समितीची दुसरी बैठक होते. (सप्टेंबर १९९४)

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपसमितीचा अहवाल येतो. (जून १९९५)

वर्ल्ड बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा वापर करायचा की नाही– हा विषय विचाराधीन आहे असे आर्थिक व्यवहार विभाग म्हणतो. (मे १९९६)

प्रकल्प कार्यान्वयनासाठी प्रमाण निविदा पत्र तयार करण्याचे काम प्रकल्प-विभागाकडे सोपवले जाते. (ऑक्टोबर १९९६)

बांधकाम उद्योग विकास परिषदेचे सचिव– प्रमाण दस्तऐवज तयार करतात. (जून १९९९)

मंत्रालयाच्या त्यावरच्या प्रतिक्रिया मागवल्या जातात. (जानेवारी २०००)

बारा वर्षे जाऊनही काही निर्णय होत नाही.

हा सगळा प्रकार काळकाढूपणाचा आहे. चीड आणणारा आहे असे वाटते ना?

अरुण शौरी यांनी असे दप्तर दिरंगाईचे, काळकाढूपणाचे अनेक प्रसंग या पुस्तकात दिले आहेत.

१. शासनाच्या प्रत्येक लहानमोठ्या व्यवहारामध्ये बेफिकीरीने संथपणे काम



करण्याची प्रवृत्ती दिसते.

२. प्रक्रियेच्या प्रत्येक पायरीवर सर्व पर्यायांचा विचार होतो; पण त्या प्रत्येक पायरीवर एकेक बारीकसा किडा सोडून देण्यात येतो. प्रक्रियेमध्ये चकवा जमा होतो.

अनुज्ञतीप्राप्त क्षमता, संकल्पित क्षमता आणि स्थापित क्षमता यात प्रचंड गोंधळ केला जातो.

३. प्रशासकीय सुधारणा करण्याच्या नावावर जास्त पळवाटा निर्माण केल्या जातात.

**ही व्यवस्था सुधारण्याचा मार्ग ही पद्धत बदलणं किंवा ती संस्था बंद करणं हा नसून, ते कामच रद्द करणं हा आहे. शक्य असेल तेथे तो अवयवच छाटून टाकणं हाच मार्ग आहे. यात सुधारणा शक्य नाही. या यंत्रणेचा नाश केला पाहिजे.**

अरुण शौरी हे एका निर्णयापर्यंत येतात : ही व्यवस्था सुधारण्याचा मार्ग ही पद्धत बदलणं किंवा ती संस्था बंद करणं हा नसून, ते कामच रद्द करणं हा आहे. शक्य असेल तेथे तो अवयवच छाटून टाकणं हाच मार्ग आहे. यात सुधारणा शक्य नाही. या यंत्रणेचाच नाश केला पाहिजे. राज्यकारभार सुधारायला हवाच; कारण शासनाची काही कर्तव्ये व कामे अपरिहार्य आहेत. ही कर्तव्ये व कामे वक्तशीर व व्यवस्थित होत नसतील तर देशाचे दिवाळे निघेल. यासाठी काही मार्गही अरुण शौरी सुचवू पाहतात.

राष्ट्रीय पर्यटन विकास मंडळ ३२ हॉटेल्स चालवते. त्यापैकी ३१ हॉटेल्स तोट्यात होती. (२००१-२००२). १९९९ ते २००१ या तीन वर्षांत या हॉटेलांना १०५ कोटी रुपये तोटा झाला.

ही हॉटेल्स विकायची, निर्गुंतवणूक करायची कल्पना अरुण शौरी यांच्या मंत्रालयाकडे येते.

यापैकी बहुसंख्य हॉटेल्सच्या जागांबाबतचे करार अस्तित्वात नाहीत हे त्यांना आढळून येते. जागेच्या मालकीबद्दलचे वाद चालू असतात. कुठे मोकळ्या जागेवर झोपडपट्ट्या उभ्या असतात. कुठे अनधिकृत बांधकामे असतात. एकाही हॉटेलने कंप्लिशन सर्टिफिकेट घेतलेले नसते. काही वेळा दोन सरकारी खात्यांत खटलेबाजी चालू असते. बहुतेक हॉटेलात ऑक्युपन्सी रेट २४ ते ३० टक्के असतो.

परदेशी कोणी हॉटेलमालक या हॉटेल्सच्या खरेदीसाठी सर्वेक्षण करायला आले तर हॉटेल कर्मचारी त्या व्यक्तीला मारहाण करतात. त्रास देतात. पळवून

**ही शासनव्यवस्था उतरंडीची आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मताला जास्त किंमत. फाइल पुढच्या टेबलावर पाठवणे म्हणजे आपले काम आपण पार पाडले ही भावना. ही कार्यपद्धती चुकीची!**

लावतात. अनेक हॉटेल्स कर्मचाऱ्यांना पगारही वेळेवर देत नव्हती. त्या वर्षी पगारापोटी थकबाकी होती ३५७ कोटी रुपये फक्त.

सरकारच्या मालकीचे, सरकारने चालवलेले हे उपक्रम– त्यांची ही अवस्था!

१९९९ साली कॅगने पश्चिम बंगालच्या ७७ सार्वजनिक उद्योगांत १०६३३ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि फायदा फक्त तीन कोटी असा अहवाल दिला आहे.

सरकारी उद्योगांबाबत अरुण शौरी काही वास्तव विधाने करतात आणि नवे कायदे करावेत अशी सूचना करतात.

* उद्योग जेवढा सरकारी असेल तेवढा बेजबाबदार असणार.
* उद्योग जेवढा बेजबाबदार तेवढा तो स्पर्धा टाळणारा असणार.
* उद्योग जेवढा स्पर्धा टाळणारा तेवढा सरकारी खजिन्यातून पैसा घेणार. नाही मिळाला तर मरणार.

अरुण शौरी सरकारी यंत्रणेचे काही विशेष नमूद करतात.

१) सरकारी व्यवस्था म्हणजे प्रवाळ खडक. तो बहुतेक वेळा उत्स्फूर्त आणि बऱ्याच वेळा अपघाताने वाढत जात असतो...

२) प्रत्येक वेळी एखादी दुर्दैवी घटना घडते... एखादी चूक जनतेच्या लक्षात येते– तेव्हा एक समिती स्थापन करण्यात येते. या प्रक्रियेत आणखी एक अडथळा वाढवला जातो.

३) तुकडे केलेल्या मतदारसंघामुळे कायदेही तुकड्यातुकड्याने संमत होतात... प्रत्येक निर्णयासाठी एकापेक्षा जास्त अधिकाऱ्यांशी चर्चा करणे भाग पडते. त्यांचा होकार– नकाराधिकार– कालहरण करण्यास भाग पाडतो.

४) ही शासनव्यवस्था उतरंडीची आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मताला जास्त किंमत.

५) फाइल पुढच्या टेबलावर पाठवणे म्हणजे आपले काम आपण पार पाडले ही भावना. ही कार्यपद्धती चुकीची!

६) कामाला उशीर करा, विलंब करा. कोणी विचारणार नाही. अधिकाऱ्याचे त्यामुळे कोणीही काही वाकडे करू शकत नाही. ही खात्री.

७) सर्वोत्तम पर्याय शोधण्याच्या प्रयत्नात मूळ प्रस्तावालाच फाटा मिळतो.

८) कायदा मंत्रालयाचे मत घेण्याचा आग्रह– सामुदायिक जबाबदारीची टाळाटाळ



९) व्यवस्थेला जाग आली तर त्याची जबाबदारी घेण्यासाठी नवा विभाग स्थापन करण्यात येतो. पर्यावरण हवे? नवे मंत्रालय काढा...

१०) प्रशासनिक सुधारणा हे नवे खाते उघडलेले आहे, पण या खात्याने सुचवलेल्या सूचनांचा कोणीही स्वीकार करताना दिसत नाही.

११) या व्यवस्थेमुळे ज्या लोकांना त्रास सोसावा लागतो, त्यांच्या तक्रारी ऐकून घेणारी यंत्रणाच नसते.

१२) ही व्यवस्था समुद्रासारखी अवाढव्य. अस्ताव्यस्त. तिच्यात सुधारणा करण्याचे प्रयत्न निष्फळ होतात.

**भारतातील प्रशासनयंत्रणा ही भारताच्या प्रगतीच्या मार्गातली सर्वात मोठी धोंड आहे, हे अरुण शौरी मंत्रालयात मंत्री म्हणून काम केल्यावर अगतिकपणे, चिडून सांगत आहेत.**

अतिप्रचंड प्रमाणात, सर्व स्तरांवर, सर्व आघाड्यांवर एकाच वेळी टिकाऊ उपाय व्हायला हवा. पण ते अशक्यप्राय.

अधिकारी या व्यवस्थेत मुरून गेलेले. काही सुधारणा करणे त्यांना नकोच असते. मंत्र्यांना ते सहजी गुंडाळू शकतात.

मंत्रालयांचे काम व्यवस्थित चालवायचे तर कार्यकक्षेचा बाऊ करू नये. काम करणारा छोटा गट असावा. समस्या सोडवण्याचे सर्व अधिकार या गटाकडे असावे, असेही शौरी सुचवतात.


... पण हे सर्व सध्याच्या मानसिकतेत व कार्यपद्धतीत अवघड आहे.

**भारतातील प्रशासनयंत्रणा ही भारताच्या प्रगतीच्या मार्गातली सर्वात मोठी धोंड आहे, हे अरुण शौरी मंत्रालयात मंत्री म्हणून काम केल्यावर अगतिकपणे, चिडून सांगत आहेत.**

आपण ते सारे वाचावे. आपणही हतबल आहोत असे मानावे की आणखी काही मार्ग चोखाळावे? याबद्दल विचारी व्यक्तींना अंतर्मुख करणारे हे सर्व लेखन आहे.

**पृष्ठे: २९३ ● किंमत: २२० रु. ● सभासदांना: १६५ रु. ● पोस्टेज: २५ रु.**

## लवकरच...




# चिकन सूप फॉर द सोल

**अनु. उषा महाजन**

**१६०रु. पोस्टेज २०रु.**

जॅक कॅनफिल्ड आणि मार्क हॅन्सन या अमेरिकेतील सुप्रसिद्ध, सर्वप्रिय अशा दोन वक्त्यांनी मिळून संकलित केलेल्या या कथा जगभरातील जनमानसाच्या मनाला जाऊन भिडल्या आहेत.

या कथांमधील आशावाद, बुद्धीवाद तुम्हाला येणारं नैराश्य झटकून टाकायला मदत करेल.

अतिशय विचारपूर्वक निवडलेल्या या कथा तुम्हाला अंगभूत मनोगुणांचे दर्शन नक्कीच घडवतील.


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## लवकरच...

# चिकन सूप फॉर द वुमन्स सोल

स्त्री मनोगुणांचा शोध घेणाऱ्या कथा




**अनु. उषा महाजन**

**१६०रु. पोस्टेज २०रु.**

***गृहिणी सचिवः सखी मिथः***
***प्रियशिष्या ललिते कलाविधौ.....***

महाकवी कालिदासाच्या या उक्तीतून स्त्रीची विविध रुपं प्रकट होतात.

चिकनसुप फॉर द वुमन्स सोल या पुस्तकात स्त्रीशी निगडित असलेल्या या साऱ्या गुणवैशिष्ट्यांचे मार्मिक चित्रण आढळतं.

स्त्रीच्या आत्म्याची मंगलता व सौंदर्य इथे प्रकट होतं.

व्यावसायिक असो की गृहिणी, बालिकेपासून वृद्ध स्त्रीपर्यंत सर्वस्तरावर हे अनुभव दीर्घकाळपर्यंत सोबत करतील.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**अतिसामान्यापासून सामान्य होऊन, दुसऱ्यासाठी जगण्यातच खरा मोठेपणा.**

# बोचकं

**रवींद्र बागडे**

'गटुळं' या आत्मकथनात्मक लेखनात रवींद्र बागडे यांनी १९५५ ते १९६८ या चौदा वर्षांतील घटनांचे निवेदन केले होते; त्यापुढच्या तीसएक वर्षांतील आपल्या कुटुंबाशी संबंधित घटना 'बोचकं' या शीर्षकाच्या पुस्तकात समाविष्ट केल्या आहेत.

सावित्रीबाई ही फूटपाथवर राहणारी अशिक्षित चर्मकार स्त्री. नवरा दारुडा. तिला सतत मारहाण करणारा, पैसे उधळणारा, व्यसनी. सात मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी ही हिंमतवान बाई आपल्या अंगावर घेते.

त्या मुलांत सर्वात मोठा रवींद्र. त्याला नारायण असे नाव देऊन 'गटुळं'मध्ये नायकाची– निवेदकाची भूमिका दिली आहे.

ह्या नारायणने भावंडांच्या विकासासाठी खस्ता खाल्ल्या; सद्भावनेतून समाजकार्य केले. परंतु त्याबद्दल नेहमीच त्याला आदर-सन्मान मिळाला असे नाही. त्याच्यावर त्याने केलेल्या कामाची पावती देण्याऐवजी वेळोवळी टीका व आगपाखडही करण्यात आली. त्यामुळे फूटपाथवरून झोपडपट्टीत आणि पुढे झोपडपट्टीतून आपापल्या दोनचार खोल्यांच्या फ्लॅटपर्यंत मजल मारण्यातील कर्तृत्वाचाही सार्थ अभिमान नारायणला आहे. तशात लेखनाची आवड असल्याने, लेखन प्रसिद्ध झाल्यामुळे नारायणला लाभलेले वेगळे व्यक्तिमत्त्वही त्याला एका उच्च पातळीवरच्या समाधानाची चटक लावते. आत्मोन्नतीची ओढ त्याच्यात त्यामुळे निर्माण होते. आपल्या दरिद्री-अतिसामान्य पार्श्वभूमीवर मात करून किमान सामान्य वा उच्च अशा जीवनशैलीचा तरी लाभ व्हावा अशी मनोधारणा पक्की होऊन ती त्याला पुढची क्षितिजे दाखवत राहते. 'तळागाळातील लोकांना वर उचलण्यासाठी' हात देण्याचीही बुद्धी त्याला होते. केवळ मानवतेसाठी, केवळ परोपकारासाठी आपल्या



जिंदादिलीचा हवाला देत आपले जीवितकार्य सफलतेकडे जात आहे, असाही एक आत्मभानाचा सूर या आत्मकथनात्मक निवेदनातून जगण्याचं मोठं मन आपल्याला लाभलं हे त्याला आवर्जून पुन: पुन्हा सांगावंसं वाटतं. आईच्या मृत्यूनंतरही हा नारायण आपल्या बायकोला म्हणतो, ''अग, आपण किती अतिसामान्य माणसं! त्या अतिसामान्य स्त्रीनं मला जन्म दिला म्हणून तू माझ्या पदरी पडलीस... अतिसामान्य जे सामान्य होतात व दुसऱ्यासाठी जगायला शिकतात तीच माणसं मनानं मोठी असतात...'' बायको त्यावर ''अहो, आपण कुठले मोठे?'' असा प्रश्न विचारते, तेव्हा तिला मध्येच अडवत नारायण सांगतो, ''दुसऱ्याला वेळप्रसंगी मदतीचा हात देणारी कुटुंबं मनानं मोठीच असतात... त्यावर हे सहाशे कोटींचं जग चाललेलं आहे.'' परोपकारी, सद्भावपूर्ण वागणारी व्यक्ती अशीच आपली आत्मप्रतिमा वाचकांच्या मनावर ठसवावी हा या लेखनामागचा उद्देश निवेदकाच्या मनात प्रभावी असल्याचे त्यावरून जाणवते.

**''अग, आपण किती अतिसामान्य माणसं! त्या अतिसामान्य स्त्रीनं मला जन्म दिला म्हणून तू माझ्या पदरी पडलीस... अतिसामान्य जे सामान्य होतात व दुसऱ्यासाठी जगायला शिकतात तीच माणसं मनानं मोठी असतात...''**

नारायणचे लग्न ते आईचा मृत्यू या घटनांचे १९६८ ते २००२ या कालावधीतील विविध टप्पे या आत्मकथनात येतात.

लग्न झाल्यानंतरच्या काळातले नारायणचे मित्र नानाविध व्यसनांच्या आहारी गेलेले त्याला दिसत होते. पर्शियन हॉटेलात मटका खेळणाऱ्यांची गर्दी असे. राजू पवार हा दिवसभर मटक्याचे आकडे काढण्याचा उद्योग करायचा. सिंगल, डबल, पाना असा तिहेरी खेळण्याचा प्रकार असायचा. नारायणचा बापही पक्का सट्टेबाज. त्यामुळे घरात भांडणे होत. गजन कोठारे हा पाठारे प्रभू तरुण– जेरी नावाने ओळखला जायचा. तो किरकोळ चिटिंगचे धंदे करायचा. हिरोगिरी करणारी विजय, विनय, जेरी, पांड्या, राजन निंबाळकर वगैरे पोरांची गँग... त्यांच्यात व दुसऱ्या गँगमध्ये मारामाऱ्या नेहमी होत. ताडदेवच्या पांड्याच्या अंगी दादागिरीची, मारामारीची खुमखुमी... नारायण त्या मंडळीत राहूनही नामानिराळा असे. तो टाइमपास करायचा. पण त्याला लफडेबाजी आवडायची नाही. ''अरे, तू संसारी माणूस'' म्हणून ही गँग त्याला चिडवायची...

नारायण आयकर खात्यात कारकुनाच्या नोकरीला लागला... उर्मिलेच्या बाळंतपणासाठी तो खाडिलकर मॅडमकडून पन्नास रुपये उसने घेतो... इतरांकडूनही

**एकदा उचाट गावी रात्री उर्मिलाच्या खोलीत आग लागते. मुलाच्या डोळ्यावर पेटलेला बोळा पडतो. उर्मिलाचा पदर पेट घेतो... नारायण तिला गोणपाटात गुंडाळतो... चार माणसं गोळा करून बैलगाडीनं डॉक्टरांकडं नेतो...**

पैसे जमवतो. हॉस्पिटलचे बिल एकशे दहा रुपये होते. तो बिल भागवतो. नर्सेसना देण्यासाठी जवळ पैसे नसतात. त्यांच्या आशाळभूत नजरा टाळत तो घाईघाईने आपल्या नवजात मुलीला व बायकोला घेऊन बाहेर पडतो. ''मी मर्दासारखा मर्द माणूस पण दरिद्री जीवन... ह्या दरिद्री माणसाशी तू गाठ बांधलीस.'' म्हणत घरी येतो.

शेजारणी बाया उर्मिलाच्या पायावर पाणी ओततात. मुलीला ओवाळतात... तो आपल्या विवाहित बहिणीला, मालनला 'बाळंतपण' करायला बोलावतो; बहिणीचा नवरा भगवान तिला परवानगी देतो. मालन त्याच्या झोपडीत येते. आठ दिवस राहते. साडी देऊन तिची रवानगी होते... वर्षाने पुन्हा पाळणा हलतो. नगरपालिकेच्या दवाखान्यात बाळंतपण. मुलगा होतो. दुसरा बेटा– वंशाचा फेटा... पुतळा आजी बाळंतपणासाठी राहते. मुलाचं नाव आकाश ठेवण्यात येतं. नारायणची आई आपल्या नामदेव, दगड्या, लक्ष्या, काळ्या, गंगी आणि बाळू या मुलांच्या संगोपनात मग्न. गिरगावात बनाम हॉल लेनच्या भाजी बाकड्यावर ती नवऱ्याबरोबर रहायची. नामदेवला ती शिक्षणासाठी पुण्याला पाठवते.

उर्मिलाला ठाणे जिल्ह्यातल्या उचाट गावी– शिक्षिकेची नोकरी मिळते. ती मुलांसह तेथे राहू लागते. सोबतीला ताराबाईला नेते. नारायण अंधेरीला झोपडीत एकटाच.

एकदा उचाट गावी रात्री उर्मिलाच्या खोलीत आग लागते. मुलाच्या डोळ्यावर पेटलेला बोळा पडतो. उर्मिलाचा पदर पेट घेतो... नारायण तिला गोणपाटात गुंडाळतो... चार माणसं गोळा करून बैलगाडीनं डॉक्टरांकडं नेतो... त्याच सुमाराला तिचा सांभाळ करणारी बनू आजी मृत्यू पावल्याची बातमी येते. उर्मिलाच्या दुःखात भरच पडते.

नारायणचा भाऊ नामदेव एका बँकेत नोकरीसाठी अर्ज करतो. मुलाखत होते. बँकेतील नोकरी त्याला मिळते. त्याला जीवनाला दिशा मिळते.

एकटे राहून नारायण वैतागतो. उर्मिला मुंबई महापालिकेतील शाळेत नोकरी मिळवण्याचा प्रयत्न करते. माधुरीबेन शहांना घरी भेटते. नंतर ऑफिसमध्ये तिला नोकरी मिळते.



नामांतराच्या वेळी एका सभेत नारायण भाषण करतो. सत्यनारायणाच्या पूजेचे पैसे दुष्काळग्रस्तांना पाठवा म्हणतो. वर्गणी गोळा करणारे त्याला दम भरतात. ''नळावर पाणी कसं भरता ते– बघतो'' अशी धमकी देतात. उर्मिला पोलिस स्टेशनात तक्रार करते... नारायण धारावी भागात एक झोपडी मिळवतो. दलदलीतली ती झोपडी दीड हजार रुपयांत त्याची आई घेते आणि गिरगावातून धारावीच्या झोपडीत राहू लागते. नामदेवच्या नावावर ती झोपडी होते. गलिच्छ वस्ती सुधारण्याकरता एक चाळ समिती सुरू करण्यासाठी नारायण घरोघर हिंडतो. वृत्तपत्रात वाचकांच्या पत्रव्यवहारात पत्रे लिहितो. आणीबाणीच्या दिवसांत त्या पत्रांचा परिणाम होतो. नवे संडास बांधण्यात येतात. सांडपाण्याचे नाले काढण्यात येतात. नारायणला काही गुंड धमकी देतात... नारायण राष्ट्रपतींना पत्र पाठवतो... त्यांचे उत्तर येते. धारावी येथील नाल्यात एक मुलगी पडून मरते. मंत्र्यांकडे तक्रार जाते. गलिच्छ वस्ती सुधार समितीचे अधिकारी नारायणला भेटायला बोलवतात. शिष्टमंडळाला सुधारणेचे आश्वासन देतात.

**'तू अगर मेरे साथ आयेगी तो मेरी बीबी मुझे घरमें रहने नही देगी' असे सांगून नारायण तिच्यापासून सुटका करून घेतो. 'तू तिच्या चक्करमध्ये नाही पडलास ते बरं झालं' असं त्यांच्यासोबत आलेला बाबू सांवत सांगतो.**

नामदेव बँकेकडे घरासाठी कर्ज मिळावे म्हणून अर्ज करतो. बोरिवलीला त्याला फ्लॅट मिळतो. नारायणच्या वाचनात 'एकच फ्लॅट शिल्लक– महापालिका कर्मचाऱ्यासाठी सुवर्णसंधी' अशी जाहिरात येते. तो धावपळ करतो. दहा हजार रुपयांची व्यवस्था करतो. दागिने गहाण टाकतो. बोरिवलीत कस्तुरपार्क भागात चांगला फ्लॅट नारायणला मिळतो... त्याची झोपडपट्टी सुटते.

हिंदी निबंधस्पर्धेत १९७९ साली नारायणने भाग घेतला. पुरस्कारासाठी निवड झाली. त्या निमित्ताने दिल्लीचा पत्नीसह दौरा झाला. प्रवासात आंध्रप्रदेशातील बसंती या टंकलेखिकेशी ओळख झाली. ताजमहाल दौऱ्यात तीही बरोबर आली. नारायणचे तिने पाय दाबले. नारायणबरोबर मुंबईलाही येण्याची तयारी दाखवली. 'बायको उठली तर जोड्यानं हाणल्याशिवाय राहणार नाही' असा विचार नारायणच्या मनात येऊन जातो. 'तू अगर मेरे साथ आयेगी तो मेरी बीबी मुझे घरमें रहने नही देगी' असे सांगून नारायण तिच्यापासून सुटका करून घेतो. 'तू तिच्या चक्करमध्ये नाही पडलास ते बरं झालं' असं त्यांच्यासोबत आलेला बाबू सावंत सांगतो.

**एकदा मार्केटात आपल्या जागेवर बसलेल्या केळी विकणाऱ्या भय्याच्या पोटात तो चाकू खुपसतो. लक्षा पळ काढतो. भय्या नंतर बरा होतो. लक्षाला सगळा भाजीबाजार टरकू लागतो. लक्षा साखरवाडीच्या मुक्ता नावाच्या मुलीशी लग्न करतो.**

नारायणचा धाकटा तीन नंबरचा भाऊ दगडू– त्याचं प्रेमा नावाच्या मराठा मुलीवर प्रेम असते. पण तिचे लग्न होते आणि ती वऱ्हाडात जाते. मग त्याचे लग्न दादरच्या शकू नावाच्या मुलीशी होते. ती ठेंगू, सावळी, गरीब होती. शकूची आई वडाळ्याला भाजीविक्रीचा धंदा करीत असे. गिरगावात दगडू लिंबं विकण्याचा धंदा करायचा. एक गोण विकली की सातआठशे रुपये मिळायचे. दारूचे व्यसनही त्याला होते. दगडू मराठा प्रेयसीच्या– प्रेमाच्या झोपडीत जाऊन राहू लागतो. धारावीत त्याची बायको शकू आणि त्याची दोन मुले राहतात. दगडूची आई प्रेमाकडे जाऊन तिची खरडपट्टी काढते. ''अगं रांडं, तुला काय लाजबीज हाय का न्हाय? तू तुझा नवरा सोडून इथं आलीस अन् तुझी पोरं दगडू सांभाळत बसलाय. अन् सोताची पोरं त्यानं रस्त्यावर टाकलीयात... तुझं वाटुळं होईल.'' आई दगडूला फैलावर घेते. ''असाच तू बांडगूळ मरायचास. मुडद्या, तू ऐकायचा नाहीस.'' असं वैतागानं म्हणून सावित्रीबाई निघते.

नारायणची बहीण गंगी सतरा वर्षाची होते. मॅट्रिक नापास. तिच्यासाठी सातारचे स्थळ मिळते. मुलगा विनायक एल.एल.बी. असतो. लग्न सातारला होते. वर्षभरातच विनायक-गंगी यांच्यात कुरबुर सुरू होते. घटस्फोटाची नोटीस विनायक पाठवतो. ''तुझी बायको आहे. तू तिला सोडून दे, नाहीतर मारून टाका. आम्हाला तिचं काही घेणंदेणं न्हाय... बायकोला घेऊन जा. तोंड काळं कर.'' नारायण विनायकला सांगतो. विनायक भेदरून बायकोला घेऊन सातारला जातो.

धाकटा भाऊ लक्षा आणि दगडू यांचीही रोज भांडणं व्हायची. लक्षानं सुषमा नावाची मुलगी बघून लग्न केलं. पण दारू पिऊन तो तिला मारायचा. तिचे वडील गजाननराव. त्यांचा बोरिवली मार्केटात चप्पलविक्रीचा स्टॉल. ते नारायणकडे तक्रार करतात. सुषमाचा काडीमोड होतो. लक्षा केळी विकतो. एकदा मार्केटात आपल्या जागेवर बसलेल्या केळी विकणाऱ्या भय्याच्या पोटात तो चाकू खुपसतो. लक्षा पळ काढतो. भय्या नंतर बरा होतो. लक्षाला सगळा भाजीबाजार टरकू लागतो. लक्षा साखरवाडीच्या मुक्ता नावाच्या मुलीशी लग्न करतो. तिची धाकटी बहीण नीताही त्याच्याकडे राहू लागते. लक्षा तिच्याशीही म्होतूर लावतो. दोघी



बहिणी एकाच घरात राहू लागतात.

**उर्मिलाची काळजी घेणारी ताराबाई नारायणकडे रहायला येते. ''माझ्या पोरीला कधी वाऱ्यावर टाकून जाऊ नका'' म्हणते... नारायणच्या घरीच तिचे शेवटचे क्षण जातात. उर्मिलाचा सख्खा बाप दारूच्या नशेत आगगाडीखाली पडून मेल्याची बातमी येते.**

काळू हा भाऊ– गर्दच्या आहारी जातो. तरी त्याची आई त्याच्यासाठी मुलगी बघते. सातारची संगीता काळूबरोबर रहायचे टाळते. त्याच्या शरीरावर जांघेत काळे चट्टे असतात. मग सोडचिठ्ठी होते. पुन्हा आई त्याच्यासाठी मुली बघते. पिंपरीच्या भाजीमार्केटात धंदा करणाऱ्या गोदाबाईची मुलगी निम्मी. बोलायला फटकळ. भांडखोर. पिंपरीतच हे जोडपे राहू लागते.

नारायणचे समाजकार्य चालू असते. नीळकंठ खाडिलकर (नवा काळ) यांना तो भेटतो. बाळासाहेब ठाकरे यांना भेटतो.

त्याच सुमाराला नारायणचे वडील हॉस्पिटलात जात असताना टॅक्सीतच मरण पावतात. ''नारायणा, तुझा बाप गेला. मला सोडून गेला. आता तो माझ्याबरोबर भांडायचा नाय... माझ्या लेकरा, मी आता काय करू? कुणाला सांगू?'' हा आईचा शोक त्याला सैरभैर करतो.

१९८४ मध्ये नारायणच्या 'टकुरं' या लेखसंग्रहाला सोविएत लँड नेहरू पुरस्कार मिळतो; नारायणचा धाकटा चुलता सुभाष याचा क्षयानं मृत्यू होतो. त्या पुरस्काराचे पैसे सुभाषच्या मयतीत खर्च होतात... सोविएत पुरस्कार मिळाला म्हणून नारायण एकदा व्होडका घेऊन घरी येतो. गोल्डस्पॉटमध्ये व्होडका मिसळून बायकोलाही आग्रहाने घ्यायला लावतो. बायको 'मला कसंतरी होतंय' म्हणून अंथरूण गाठते. 'व्होडका गोल्डस्पॉटचं गुपित' नारायण बायकोला कधीच सांगत नाही!

इंदिरा गांधीच्या स्मरणार्थ नारायण 'विश्वकाव्य' हा हिंदी काव्यसंग्रह तयार करून राजीव गांधींना पाठवतो. राजीवजींची पोच येते. तो संग्रह विकताना भलेबुरे अनुभव येतात.

उर्मिलाची काळजी घेणारी ताराबाई नारायणकडे रहायला येते. ''माझ्या पोरीला कधी वाऱ्यावर टाकून देऊ नका'' म्हणते... नारायणच्या घरीच तिचे शेवटचे क्षण जातात. उर्मिलाचा सख्खा बाप दारूच्या नशेत आगगाडीखाली पडून मेल्याची बातमी येते.

नारायणचा सर्वात धाकटा भाऊ बाळू... तोही लग्नाचा होतो. पिंपरीच्या ठवाळ कुटुंबातली मुलगी शांता हिच्याशी त्याचे लग्न होते.

**नारायण त्याचे सहा भाऊ. एक बहीण... आपल्या आईने १७ नातवंडे, तीन परतुंडे, वगैरे... असा ३३ जणांचा कुटुंबकबिला बघितला. मुंबईला गिरगावच्या फूटपायरीवर राहिल्या सावित्रीबाईचा हा संसाराचा गाडा... आता मुलं आपापल्या स्वतंत्र घरात होती...**

चर्मकार समाजाच्या संघटनेसाठी गावोगाव दौरे काढल्याने नारायणला डोकेदुखीचा त्रास होऊ लागतो. मेंदूवर सूज चढल्याचे डॉक्टर सांगतात. उपचार सुरू होतात.

एकदा नारायणचा मुलगा पिकनिकसाठी पैसे मागतो. नारायणने नकार दिल्यावर टिक ट्वेंटी घेतो... दवाखान्यात नेल्यावर तो वाचतो... मानसोपचार तज्ज्ञाकडे त्याला नेल्यावर बरा होतो. तो पुढे जीवन बीमा निगममध्ये नोकरीला लागतो.

लता नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो. लग्न होते. पण लग्नानंतर दोघांत भांडणे सुरू होतात. लता माहेरी निघून जाते. आकाशला शॉक बसतो. आकाश झोपेच्या गोळ्या खाऊन आपले जीवन संपवतो.

त्याच्या विम्याचे सव्वालाख रुपये पुढे येतात! त्यातून जेजुरीला आकाशदीपचे स्मारक उभे करतात.

त्याचा धक्का बसून उर्मिलाची तब्येत बिघते. तिला फिट्स येऊ लागतात.

नारायण अहिल्याबाई होळकरांचे चरित्र वाचतो. सासरा, नवरा, मुलगा, नातू, जावई, मुलगी– सर्वांचे डोळ्यादेखत निधन होऊनही अहिल्याबाई ७२ वर्षे जगल्या. धार्मिक कार्यात मन गुंतवत राहिल्या... हे वाचून नारायणचे मनोधैर्य उंचावते.

मुलगी नीलकमल डेंटिस्ट होते. बँकेचे कर्ज काढून दवाखाना काढते. इंजिनिअर मुलाशी लग्न करते.

१९९७ मध्ये एका वाङ्मयीन कार्यशाळेत नारायणला आमंत्रण येते. पत्नीसह बरेलीचा व नैनीतालाचा प्रवास घडतो. वैष्णोदेवीचेही दर्शन होते.

नारायणची तब्येत खालावते. बायोप्सी, कोलोनोस्कोपी होते. मूतखडा, आतड्यांना सूज खंडीभर गोळ्या...


तशातच आई आजारी पडते. विरारला हॉस्पिटलमध्ये तिला ॲडमिट करतात. पुढे पिंपरीच्या रुग्णालयात... तेथेच तिचे निधन होते. पिंपरीलाच तिच्यावर अंत्यसंस्कार केले जातात. तिच्या अस्थींचे आळंदीला इंद्रायणीत विसर्जन होते. आईचे बारावे करून नारायण पुन्हा मुंबईला परत येतो. आपलं बोचकं– नव्हे– सूटकेस घेऊन.

...नारायण, त्याचे सहा भाऊ. एक बहीण... आपल्या आईने १७ नातवंडे, तीन परतुंडे, वगैरे... असा ३३ जणांचा कुटुंबकबिला बघितला. मुंबईला गिरगावच्या फूटपायरीवर राहिलेल्या सावित्राबाईचा हा संसाराचा गाडा... आता मुलं आपापल्या स्वतंत्र घरात होती... याचं समाधान तिला नक्कीच असणार, असं नारायणला वाटतं... या सगळ्यांच्या आयुष्याचा पट उलगडून दाखवण्याचा 'बोचकं'मध्ये प्रयत्न केला गेला आहे.

...रवींद्र बागडे यांनी तटस्थपणे आपल्या 'नारायणा'च्या आयुष्याचा ताळेबंद मांडला आहे. 'आपलं दुःख हे जगाचं दुःख आहे आणि जगाचं दुःख तर त्यापेक्षाही खूप मोठं आहे–' ही भावना हा सगळा प्रवास सुसह्य करणारी ठरू शकेल.

**पृष्ठे: १८४ ● किंमत :१४०रु. ● सभासदांना: १०५रु. ● पोस्टेज: २५रु.**


# फाईव्ह पॉइंट समवन




आयआयटीच्या स्पर्धात्मक, चाकोरीबद्ध कॉलेजजीवनाला छेद देणाऱ्या तीन मुलांची, हलक्या फुलक्या शैलीतील मनोरंजक, खट्याळ कहाणी.

**चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील**

**२००रु. | पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## शंकर पाटील



मराठी ग्रामीण कथाविश्वाचे एक शैलीदार, कसदार शिल्पकार. अस्सल कोल्हापूरी बाज असलेली मराठमोळी भाषा, गतिमान निवेदन आणि चटपटीत संवाद या गुणधर्मामुळे पाटीलांचं सारं साहित्यविश्व शब्दकळेच्या लावण्यानं रसरशीत, चैतन्यमय आणि सालंकृत झालेलं आहे.

मराठी कथाविश्व समर्थ, समृद्ध आणि श्रीमंत करण्यात शंकर पाटीलांच्या कथासंग्रहांचा मोलाचा वाटा आहे.


मेहता पब्लिशिंग हाऊसने पाटीलांच्या सर्व कथासंग्रहांना नव्या स्वरूपात पुन्हा वाचकांसमोर सादर करण्याचे ठरवले आहे.

त्यातील नुकतेच प्रकाशित झालेले हे तीन कथासंग्रह




**खुळ्याची चावडी**

**१२०रु.**




**धिंड**

**१००रु.**




**पाटलांची चंची**

**१३०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**



## साम्राज्य बुरख्यामागचे
### द व्हेल्ड किंगडम

**कारमेन बिन लादेन**

**अनु. अविनाश दर्प**

**१५०रु.**

पोस्टेज २५ रु.




''११ सप्टेंबर... अमेरिकेसह अवघ्या जगावर दहशतवादाचे भीषण सावट पसरवणारा दिवस.....''

महासत्तेच्या जिव्हारीच घाव लागल्यानं त्वरित मुख्य सूत्रधार असलेल्या ओसामा बिन लादेन विरुद्ध सूत्र हलवली गेली. याचा फटका लादेनच्या इतरही निर्दोष कुटुंबियांना बसला. यातच होती ओसामाची थोरली भावजय कारमेन बिन लादेन आणि तिच्या दोन मुली. पती येस्लामशी रीतसर घटस्फोट घेवून कट्टर धार्मिक जोखडातून मुक्त झालेल्या, जिनिव्हात राहणाऱ्या स्वातंत्र्यप्रिय कारमेनला या घटनांनी व्यथित केले. तिने प्रसारमाध्यमांकडे आपला, आपल्या मुलींच्या निर्दोषत्वाचा खुलासा केला.

या काळातच सौदी अरेबियातील कडू-गोड आठवणी तिच्या अंतरंगात उफाळून आल्या. या साऱ्या आठवणी आणि आपल्या मुलींच्या निर्दोषत्वासाठी तिने दिलेल्या झगड्याची कहाणी या पुस्तकात आहे.




**राजीव तांबे यांचा शिशूंना आवडेल असा 'ससोबा'**

# ससोबा-हसोबाच्या गमतीजमती

**राजीव तांबे**

बालवाचकांसाठी राजीव तांबे यांनी 'ससोबा' हा छोटा दोस्त निर्माण केला आहे.

हा ससोबा अर्धी चड्डी घालतो. अर्ध्या बाहीचा टी शर्ट घालतो. त्याचे कान लांब आहेत आणि तो छोटासा असूनही त्याला मस्त मिशा आहेत. त्याची आई त्याला ससुल्या म्हणते. त्याला सकाळी लवकर उठवते. "अरे ससुल्या, ऊठ. माझं शहाणं पिल्लू, ऊठ बरं." असं पुन: पुन्हा म्हणते, तेव्हा ससोबा कुरकुर करत उठतो. आळोखेपिळोखे देतो. मिशा पुसत आईला म्हणतो, "आई, मला चहा दे. पाव दे. बिस्किटे दे. गाजराचा शिरा दे. मुळ्याचा पराठा दे. कोबीची कोशिंबीर दे." आई त्याला सांगते, "आधी तोंड धू. मिशा पूस. मग बिस्किट खा."



तेव्हा हा ससोबा लांब उड्या मारत विहिरीवर जातो. गार पाण्याने तोंड धुतो. खुळखुळ करून चुळा भरतो. चुट्चुट् पाणी पितो. मिशा पुसतो. टुणटुण टणाटण उड्या मारत घरी येतो. खुर्चीत बसतो. टकाटका शेपूट हलवतो. जिभल्या चाटतो. कान हलवतो.





पिकपॉक डोळे फिरवतो... बिस्किट खातो. ढूर्र करून ढेकर देतो. हातपाय ताणतो. शेपटी फुगवतो. सैल करतो.

तेव्हा आई त्याला म्हणते, "ससोबा, आता थोडा वेळ टीव्ही बघ. मग अभ्यास कर. चित्रं काढ, गाणी म्हण. नाच कर. पसारा करू नकोस."

बालमित्रांनो, तुमची आईही तुम्हाला असेच म्हणते ना?

तर हा ससोबा तुमचा दोस्त व्हायलाच हवा.

या ससोबालाही त्याची आई कामं सांगते. "अरे ससुल्या, सतरंजीची घडी घाल. पांघरुणाची घडी कर. उशी जागच्या जागी ठेव."

**मग ससोबा उड्या मारत काय करतो? नेमकं उलटं! तो उशीची घडी करतो. सतरंजी धुतो. तोंडाची घडी करतो. तोंडात फटाफट पांघरुण ठेवतो. खोडकरपणा करण्यात त्याला मजा वाटते. तुमच्यासारखीच!**

त्याची आई मग त्याचा कान पकडते...

डोळे बारीक करत आणि शेपटी उंच करत म्हणते, "अरे लबाडा, मी तुला काय सांगितलं होतं? तू काय केलंस?"




तर ससोबा म्हणतो, "अग, तूच तर तसं कर म्हणून सांगितलं. मी केलं."

या ससोबाचे बाबाही आहेत बरं का! ते बागेत जातात. कोबी, गाजरं आणतात. बागेत काम करतात.

शिवाय ससुली ही बहीणही त्याला आहे. तीही आपल्या मिशा फेंदारून बोलत असते.

या ससोबाचा एक मित्रही आहे. हसोबा त्याचे नाव. दोघांची चांगली



गट्टी.

ससोबा आणि हसोबा नदीवर जातात. आंघोळ करतात. पोहायला शिकायचं म्हणतात. पोहायला येत नाही त्यांना. पण नदीवर जातात मोठ्या ऐटीत.

तिथं एक माकडोबा त्यांना पोहण्याचा मंत्र सांगतो.

***''पोहण्याआधी खा संत्रं. मग म्हणा एक मंत्र.***

***खिर्र ऽऽ कुर, नदीमध्ये मारा सूर.***

***नदीचा रे गाठा तळ, माशांची मग पळापळ.***

***शेपटी करा उंच ताठ, तरच नदीचा दिसेल काठ***

***उडी मारा झाडावर, मस्त लोंबकळा फांदीवर...***

***खिर्र ऽऽ कुर्र ऽऽऽ आऽऽहा!''***

सुसुलीही त्यात भर घालते,

***''नदीच्या तळाशी शेपटी ताठ,***

***सुर्रकन दिसेल नदीचा काठ.''***

तर ससोबा-हसोबा, ससोबाचे आई-बाबा, ससोबाची बहीण ससुली... आणि कोंबडेकाका, माकडोबा, कोल्होबा वगैरे मंडळींची राजीव तांबे यांनी झकास मोट बांधली आहे.



कशासाठी?

हे काय सांगायला हवे?

बालमित्रांनो, मजेदार गोष्टी सांगण्यासाठी तर त्यांची सगळी धडपड. धावपळ.

वॉल्ट डिस्नेचा मिकी माऊस नाही का गमतीजमती करीत? मग राजीव तांबे यांच्या ससोबाने गमतीजमती केल्या तर बिघडले काय? मुळीच काही बिघडले नाही.

**राजीव तांबे या ससोबाला एखाद्या छोट्या मुलासारख्याच गमतीजमती करायला लावतात. हा ससोबा आहे, पण तुम्हां मुलांसारखाच खोडकर, वेंधळा, गडबड्या आहे. तो हट्ट करतो. कधी अडचणीत सापडतो. मग आपले डोकेही चालवतो.**

एकदा तो हसोबाला फोन करतो. ''आई बाहेर गेलीय, तू खेळायला ये'' असे सांगतो. पण तो फोन रॉंग नंबरला लागतो. हसोबाऐवजी कोल्होबाचा तो नंबर निघतो. कोल्होबा मनात म्हणतो, ''ही चांगली संधी आहे. ससोबा घरी एकटा आहे. त्याला आपण गट्ट करू...''



–आणि एक मोठी छत्री घेऊन कोल्होबा ससोबाच्या घरी जातो...

ससोबा मनाशी म्हणतो, ''हा मित्र वेडपटच दिसतोय. पाऊस नाही तरी छत्री घेऊन आलाय.''

–तो त्याला घरात घेतो.

लपलप् करणारी लाल जीभ, अणकुचीदार सुळे, टोकदार दात, फेंदारलेल्या मिशा, रागीट डोळे–

अरे हा तर कोल्हा... ससोबा घाबरतो. टुणकन उडी मारून पळू लागतो... कोल्होबा मागे धावतो... तेवढ्यात ससोबाला बंदूक मिळते... सशाकडची ती बघून कोल्होबा पळून जातो... ससोबा हसतो... कारण ती बंदूक खोटी असते...

तर अशा काही गोष्टी ससोबाच्या आयुष्यात घडतात.

नदीवर गेल्यावर एक शेपटीवालं झाड दिसतं... ससोबा त्याच्याजवळ जातो... तर तो निघतो लांडगोबा. तो ससोबाला गट्ट करायला बघतो. पण पाण्यातला एक मासा बाहेर येतो. ससोबाच्या पायाला गुदगुल्या करतो. ससोबा दचकून पाण्यात पडतो. लांडगा त्याच्यावर झेप घालतो... पण लांडग्याचं तोंड दगडावर आपटतं. त्याचे दात पडतात. तोंड सुजते... शेपटी वाकडी करत लांडगा धूम पळ काढतो.

ससोबा आणि सगळे मासे खो खो करून हसतात.

ससोबा एकदा नदीवर जातो. हसोबाला पोहायला येत नाही; पण तो पोहायला



शिकवतो असे ससोबाला सांगतो. त्यावर ससोबा विश्वास ठेवतो.

माकडोबा हसोबाला पाण्यात ढकलू पाहतो, तर त्याचं शेपूट ससोबाचे बाबा पकडून ठेवतात.

माकडोबाचे केस हसोबाच्या नाकाकानात जातात. हसोबाला जोरात शिंक येते आणि माकडाचे डोळे गरगरतात. माकडोबा म्हणतो, ''सॉरी, पुन्हा अशी चूक करणार नाही.''

ससोबा-हसोबा घरी पुस्तकात वाचून चहा करतात– तेव्हा त्यांची मोठीच फ उडते.



...मुलांना हसवण्यासाठी हा सगळा मालमसाला राजीव तांबे यांनी आपल्या तल्लख डोक्यातून शोधून काढला आहे.

सोप्या नादानुसारी भाषेतल्या निवेदनाने कथाकथनात रंग भरला आहे.

**ससोबा-हसोबा ही दुक्कल पाचसहा वयोगटातल्या मुलांना आवडेल. पालकांनी यातील चित्रे दाखवत गोष्टी वाचून दाखवाव्या– मुलांना त्यात गंमत वाटेल.**

ससोबा-हसोबा यांची चित्रे गिरीश सहस्रबुद्धे यांनी काढली आहेत. प्रत्येक पान चार रंगी– छान छान चित्रांनी भरलेले. त्यामुळे पुस्तक बघतानाही डोळ्यांना आल्हाददायक वाटते.

मराठीत अशी बहुरंगी बालकथांची पुस्तके बालवाचकांना वाचनाची गोडी लावण्यासाठी उपयुक्त ठरतील. ❐

**शेपटीवालं झाड आणि इतर कथा**

**ससुल्या आणि इतर कथा**

**शूर ससोबा आणि इतर कथा**

**चला चहा पिऊया आणि इतर कथा - लेखक:राजीव तांबे**

**पृष्ठे प्रत्येकी: ३२ ● किंमत प्रत्येकी : ३०रु.**

**सभासदांना प्रत्येकी : २३रु. ● पोस्टेज प्रत्येकी : २०रु.**



**www.mehtapublishinghouse.com**

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आत्तापर्यंत १,५०००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा 'ऐका' आता थेट नभोवाणीवर...

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर 'पोस्टकार्ड'द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'पुणे' येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे नभोवाणीवर'.**

# २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **पांढरे ढग** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **कॉलेज** | छाया महाजन | २००/- |
| **फॉर युअर आईज ओन्ली :** इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :** जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | अनु. माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **द दा विंची कोड** : डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर | ३२०/- |
| **द लायन्स गेम** : नेल्सन डेमिल | अनु. अशोक पाध्ये | ६८०/- |
| **व्हाईट मुघल्स** : विल्यम डॅलरिंपल | अनु. सुधा नरवणे | ३५०/- |
| **गांधर्वी** : बाणी बसू | अनु. मृणालिनी गडकरी | १७०/- |
| **डॉलर बहू** : सुधा मूर्ती | अनु. उमा कुलकर्णी | १२०/- |
| **अस्तित्व** : सुधा मूर्ती | अनु. प्रा. ए. आर. यार्दी | ८०/- |
| **प्रे** (सावज) : मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ३००/- |
| **कसिनो रॉयल** : इयान फ्लेमिंग | अनु. सुभाष जोशी | १२०/- |
| **एव्हरिथिंग हॅपन्स फॉर अ रीझन :** कविता दासवानी | अनु. चित्रा वाळिंबे | १५०/- |
| **फाईव्ह पॉइंट समवन** : चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **परवाना** : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १२०/- |
| **शौझिया** : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | ११०/- |
| **बोचकं** | रवींद्र बागडे | १४०/- |



| | | |
|---|---|---|
| **अनुवादित लेख** | | |
| **इंडिया इन स्लो मोशन :** मार्क टुली | अनु. अजित ठाकूर | २२०/- |
| **मृत्यू.... माझ्या उंबरठ्याशी :** खुशवंत सिंग | अनु. सुप्रिया वकील | १४०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **आनंदभेट** (रशियनकथा) | डॉ. सुनीती देशपांडे | १२०/- |
| **निजधाम** | रत्नाकर मतकरी | १००/- |
| **गुलमोहर** | व. पु. काळे | १००/- |
| **सेलिब्रेशन** | स्वाती चांदोरकर | १३०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **परमवीरचक्र -रणांगणावरील आपले महान योद्धे** : मेजर जनरल इयान कारडोझो | अनु. ज्योत्स्ना लेले | १८०/- |
| **डेअर टू पब्लिश** : दीना.एन. मल्होत्रा | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **ललित** | | |
| **फुले आणि पत्री** | माधुरी शानभाग | १५०/- |
| **पुण्यभूमी भारत :** सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १३०/- |
| **अमेरिकेतील पापनगरी एक वारी** | डॉ. अनंत लाभसेटवार | १२०/- |
| **वैचारिक** | | |
| **हा शोध वेगळा : ओशो** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **भक्तीत भिजला कबीर : ओशो** | अन. भारती पांडे | १२०/- |
| **माझे माझ्यापाशी काही नाही : ओशो** | अनु. भारती पांडे | १२०/- |
| **मृत्यू अमृताचे द्वार : ओशो** | अनु. मीना टाकळकर | १८०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |
| **लोकरीचे विणकाम** | आशा पत्रावळी | ३५०/- |
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्ये | ५०/- |

**व्यक्तिमत्वविकसन**

| | | |
|---|---|---|
| **पुढाकार घ्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र** | संजीव परळीकर | २००/- |

**आत्मकथन**

| | | |
|---|---|---|
| **जिहाद** | हुसेन जमादार | २२०/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |

**अनुभव कथन**

| | | |
|---|---|---|
| **स्ट्रगलर्स** | मुक्ता चैतन्य | ९०/- |

**माहिती कोश**

| | | |
|---|---|---|
| **असे घडले सहस्रक** | निरंजन घाटे/ डॉ.प्रमोद जोगळेकर | ३००/- |

**संकीर्ण**

| | | |
|---|---|---|
| **जागतिक अर्थव्यवस्था** | मधुसूदन दत्तात्रय साठे | २२०/- |

**आरोग्य**

| | | |
|---|---|---|
| **वजन कमी करण्यासाठी योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |
| **औषधाविना आरोग्य** | डॉ. रमा /रवि मराठे | २००/- |

**मार्गदर्शनपर**

**चला जाणून घेऊ या!**

| | | |
|---|---|---|
| **चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **मनोविकास :** रवींद्र कुमार | अनु. आर. डी. मुनोत | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |

**राजकीय**

| | | |
|---|---|---|
| **पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय** : बी. जी. देशमुख | अनु. अशोक पाध्ये | ४००/- |
| **लौकिक** | महावीर जोंधळे | १३०/- |
| **गव्हर्नन्सः**अरुण शौरी | अनु.भारती पांडे | २२०/- |



**बाल वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **राजाचं गुपित आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **खरा मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **एकमेका साह्य करू आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **आजीचं घर आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **पैज जिंकली छोट्याने आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **पत्राचा प्रवास ाणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **आजीचा धडा आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **बदकाचा बूट आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |
| **गर्विष्ठ सूर्यफूल आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |
| **ससुल्या आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **शेपटीवालं झाड आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **चला, चहा पिऊया! आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **शूर ससोबा** | राजीव तांबे | ३०/- |
| **बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **बंटू बसला ढगात आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३०/- |
| **घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |
| **अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३०/- |

सार्धसुधं...

# क्रांती

**प्रमोदिनी वडके-कवळे**

महिन्यातल्या पहिल्या शनिवारची संध्याकाळ. माझी आणि ज्योतीची- माझ्या बालपणापासूनच्या मैत्रिणीची भेटण्याची संकेतवेळ. आजही आम्ही भेटलो. पण बागेऐवजी एका निष्णात डॉक्टरांच्या प्रसूतिगृहात. नेहमीसारख्या धो धो गप्पा मारण्याऐवजी लेबररूमच्या बाहेर उत्सुक चेहऱ्याने थांबून वाट बघत.

कारण ज्योतीची लाडकी सुन प्रज्ञा आत पहिल्या प्रसूतिच्या कळा सोसत होती. तिच्याबरोबर एकाच व्यक्तीला आत थांबता येणार असल्याने साहजिकच तिची आई आत होती आणि आम्ही दोघी 'निकाला'ची वाट पहात बाहेर ताटकळत होतो.

मध्येच एक नर्स गडबडीने बाहेर आली. कुणा डॉक्टरना फोनवर काही विचारून परत आत गेली. ज्योतीने माझा हात घट्ट धरला. सगळं व्यवस्थित होईल ना गं? व्यंकटेशस्तोत्र मधेच थांबवून मला विचारलं.

मी नुसताच तिचे हात थोपटून तिला धीर दिला. कारण मीही दुर्गाकवच म्हणत होते.

थोड्या वेळाने दुसरी नर्स बाहेर आली. आमच्या दोघींकडे पहात अधीऱ्या चेहऱ्याने म्हणाली, 'पेशंटच्या सासूबाई कोण?'

'म. .म. . मी.' ज्योतीची भयाने बोबडीच वळली.

'पेशंटची पर्स तुमच्याकडे आहे ना? त्यातला मोबाईल मागितलाय. लवकर द्या. अजिबात वेळ नाही. कोणत्याही क्षणी बेबी बाहेर येईल.'

गांगरलेल्या ज्योतीने चटकन सुनेचा मोबाईल काढून दिला. पण तो का मागितला असावा याचं कारण न कळून आम्ही दोघीही प्रश्नांकित चेहऱ्याने पुन्हा एकमेकीकडे नुसत्या बघत बसलो.

. .आणि थोडयाच वेळात आतून बाळाचं ट्यँह्याऽ ऐकू आलं.

आम्ही आत शिरायला लागलो तेवढयात दार उघडून प्रज्ञाची आईच बाहेर आली. बाहेरच थांबायला सांगितलंय ज्योतीताई आपल्याला. त्यांचे सगळे सोपस्कार व्हायला पंधरावीस मिनिटं तरी लागतील. मगच आपल्याला बाळाला बघायला मिळेल.

'प्रज्ञा व्यवस्थित आहे ना पण?' ज्योतीने काळजीच्या सुरात विचारलं.

'एकदम ओक्के.'



मग तो मोबाईल आत कशाला मागितला होता?

'अहो काय सांगायचं?' प्रज्ञाच्या आईच्या चेहऱ्यावर जावयाबद्दलचं कौतुक दाटून आलं. 'प्रणवना म्हणे बाळाचं पहिलं रडणं ऐकायचं होतं सगळ्यांच्या आधी. . म्हणून!'

तिचं उत्तर ऐकून माझ्या ज्योतीच्या चेह-यावरही कौतुकाचे थर पसरले. एका कंपनीत महत्त्वाच्या पदावर असणारा तिचा लाडका प्रणव. त्याच्या पहिल्या अपत्याचा जन्म. आत्ता या नाजूक वेळी प्रणवला नेमकं एका महत्त्वाच्या मिटींगसाठी कलकत्त्याला जावं लागलं होतं. पण तरीही मोठ्या युक्तीने तो आपल्या बाळाचं पहिलं ट्यँह्याऽ ऐकू शकला होता. आणि अगदी लेबररूमच्या शेजारच्याच खोलीत असून, प्रज्ञाच्या बरोबरीने दोनतीन तास ताटकळूनसुद्धा आम्हाला ते कौतुक ऐकायला आणखी पंधरा मिनिटं वाट पहावी लागणार होती.

डॉक्टरांनी हरकत घेतली म्हणून. नाहीतर प्रणवना म्हणे बाळाच्या जन्मानंतरच्या पहिल्या क्षणाचा फोटोसुद्धा काढून पाठवणार होती प्रज्ञा मोबाईलवर. किती कल्पक आहे नाही आजची पिढी? ज्योतीच्या विहीणीची कौतुकएक्सप्रेस चालूच होती. आणि तेवढीच भाग्यवानसुद्धा! ज्योतीने तिला दुजोरा दिला. तिच्या मनात प्रणवच्या जन्माच्या वेळच्या आठवणी दाटून आल्या असणार. आम्ही दोघीही एकमेकींच्या सगळ्या सुखदुःखाच्या साक्षीदार असल्यामुळे मला ज्योतीच्या मनातल्या त्या आठवणींचं प्रतिबिंब तिच्या डोळ्यातही लख्ख दिसून आलं.

ज्योतीचं सासर आणि माहेर दोन्ही जुन्या वळणाची घरं. सगळ्या जुन्या रीती समजूती आणि परंपरा जशाच्या तशा जपणारी. प्रणव तिचा मोठा मुलगा. साहजिकच या बाळंतपणासाठी ती रोह्याला माहेरी आली होती. आणि शेखर पुण्यालाच होते. त्यांच्या मनात अपत्यजन्माची कितीही हुरहूर असली, तरी घरातल्या लोकांना दुखवून त्यांना त्यावेळी येणं शक्यच नव्हतं. कारण अपत्यजन्माची बातमी पाच दिवसानंतरच बाहेरगावी कळवायची अशी त्याकाळची ठाम समजूत. ज्योतीच्या मनात त्या क्षणाबद्दलच्या सिनेमातल्या आणि कादंबरीतल्या रोमँटिक कल्पना. पण काहीच उपयोग नव्हता. मी सख्खी मैत्रीण असून मलासुद्धा काहीच करता आलं नाही. कारण त्यावेळी मोबाईल तर सोडाच, पण साधे फोनसुद्धा इतके सर्रास उपलब्ध नव्हते.

शेवटी बारा दिवसांनंतर बारशाच्या वेळीच शेखरना पुत्रदर्शन घडलं. ही केवळ माझी किंवा ज्योतीचीच नाही, तर सगळ्याच मध्यमवर्गी पहिलटकरणीची कहाणी होती. पहिल्या अपत्याचा जन्म! नवराबायको दोघांसाठी किती आनंदाची आणि नवलाईची गोष्ट. पण तो आनंद एकमेकांबरोबर वाटून घेण्यासाठी किती वाट पहावी लागायची. संवादाची साधनंच अपुरी होती. अगदी ताबडतोब एखादी बातमी कळवायची असली तर त्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे तार. (टेलिग्राम) पण तीसुद्धा अशी उठसूठ करायची गोष्ट नव्हतीच.

मृत्यूनंतर कुणा जवळच्या नातेवाईकाला बोलावून घ्यायचं असलं, तरच तार करायची पद्धत होती.

आनंदाच्या तारा येण्याचे प्रसंग तर मोजून दोनच. गुणवत्ता यादीत नंबर आला असेल तर एस एस सी बोर्डाकडून तसं कळवणारी तार यायची. (पण ते भाग्य फारच क्वचित लोकांच्या वाट्याला येणारं) आणि काही कारणाने एखाद्या लग्नामुंजीला जाणं शक्य नसेल तर अभिनंदनाची तार करायची. एरवी अभिनंदनाच्या प्रसंगी तार करणे हा उच्चवर्गीय किंवा नवश्रीमंताचा मक्ता होता. कारण तार हा प्रकार तसा खर्चिक. शब्दाशब्दाचा हिशोब मांडून पैसे मोजावे लागायचे. म्हणून तर पोस्टखात्याने मध्यमवर्गाच्या सोयीसाठी ठराविक प्रसंगासाठी ठराविक नंबर देउन तार करण्याची सोय ठेवलेली होती.

तरीही तार आली की आधी वाईट शंकाच मनात यावी असा या मार्गाचा धसका सामान्य माणसाच्या मनात बसलेला होता.

त्यामुळेच की काय, पत्र आणि प्रत्यक्ष हकिगत या संवादप्रकारांना असाधारण महत्त्व होतं. व्यक्तीव्यक्तींमधली प्रत्यक्ष संवादाची ओढ टिकून होती. खरं तर या हिशोबी संवादमामल्यात अगदी दोघांपुरत्या संवादाला फार कमी जागा उरायची. दूरदेशी गेलेल्या पतीला वडिलांच्या नावावर पत्र पाठवून त्यात आपल्या नववधूसाठी दोन ओळी लिहाव्या लागायच्या. कारण एकत्र कुटुंबातल्या बायकोला खास तिच्या नावावर पत्र लिहिणं म्हणजे फारच गंभीर बाब! आणि पत्रातला मजकूर तरी काय? लांबलचक मायना आणि घरातल्या थोरामोठ्यांना नावानिशी नमस्कार-आशीर्वाद. तब्येतीची चौकशी आणि एखादा ताजा कलम. हातभर लांब पत्रात एखादीच खास बातमी सांगितलेली असायची. कधीकधी तर तीही नाही. केवळ खुशालीचंच पत्र .

पण या ठराविक साच्यातही एखाद्याची लेखनकला बहरायची आणि ते पत्र वाचताना प्रत्यक्ष गप्पा मारल्याचा आनंद मिळायचा. दारात पोस्टमन थांबणं, आपल्या नावाचं पत्र येणं ही अपूर्वाईचीच गोष्ट वाटायची तेव्हा. एखाद्या पत्राची आतुरतेने वाट पहाणं, ते हातात आल्यावर वाचेपर्यंतची हूरहूर आणि त्यात मनासारखा मजकूर असला तर नंतरचे कितीतरी दिवस मनभर दरवळत रहाणारा आनंद ही ‘पत्रांदोलनं’ माझ्यासारख्या सामान्य माणसाला शब्दात वर्णन करता येणारच नाहीत. त्याला

**‘पत्र तुझे ते येता अवचित**
**लाली गाली चढते नकळतं’**

अशी गीतं लिहिणारे शब्दप्रभूच हवेत.

हे सगळं कितीही खरं असलं तरी, प्रत्यक्ष संवादातलं ताजेपण वेगळंच! त्या जादूई अत्तराचे चार थेंब कोणाच्याही मरगळलेल्या मनाला टवटवी देऊन जातात. आणि असा संवाद काही दिवसांच्या विरहानंतरचा असेल, तर तो आणखी लज्जतदार होतो. दूर गेल्यामुळे असो, किंवा भांडणामुळे असो, चिमूटभर विरहाने संवादात खमंगपणा येतो. त्याचा खुसखुशीतपणा वाढतो. कारण कोणतंही नातं टिकण्यासाठी जशी जवळीक गरजेची असते, तसंच थोडंफार अंतरही आवश्यक असतं.

मी होस्टेलवर रहात असताना रोहा ते पुणे हे जेमतेम दीडशे किलोमीटर्सचं अंतरही मला आणि आईला दूरदेशासारखं वाटायचं. पण माझा मुलगा अमित अगदी जपानला गेला तरी एवढा दूर असल्यासारखं वाटलंच नाही कधी. इ मेल आणि चॅटिंगमुळे आपण एका गावात रहातोय असंच वाटायचं.

नव्या युगातल्या या संवादसाधनांनी हे अंतरच मिटवून टाकलंय.त्याच्यामुळे संवाद साधला जातो की नाही ठाऊक नाही. कारण बरेचदा ‘मी अर्ध्या तासात पोचतेय.’ किंवा ‘मी संध्याकाळी बाहेर जातोय. जेवायला वाट पाहू नको.’ किंवा ‘कुठे आहेस? येताना फूड पार्सल घेऊन येशील?’ असले ठोकळेबाज संदेशच त्यातून पोचवले जातात. तरीही आपण म्हणतो नव्या तंत्रज्ञानाने संवादमाध्यमात प्रचंड क्रांती घडवून आणलीय.

एका अर्थी खरंच आहे म्हणा ते. फार मोठी क्रांती झालीय. तुम्ही अगदी सातासमुद्रपलिकडे गेलात तरी मोबाईल, इ-मेल, चॅटिंग, वेब कॅमेरा ही मंडळी तुमच्याबद्दलच्या सगळ्या खबरा तुमच्या आप्तस्वकीयांना अगदी दृश्यस्वरूपातसुद्धा देत रहातात.

पण त्याहीपेक्षा मोठी क्रांती म्हणजे या सगळ्या चिमुकल्या गोष्टींनी मिळून शब्दकोशातला एक शब्द चक्क पुसूनच टाकलाय.

‘विरह’ हा शब्द उरलाय आता कुठे?

— — — — — — — — — — — —

***प्रमोदिनी वडके-कवळे***
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

**वर्षभरातच चौथी आवृत्ती.....**

**विश्वास पाटील** **संभाजी**

*आमच्या जिजाऊसाहेब आम्हांला नेहमी आठवण करून द्यायच्या- शिवबा, ह्या शंभूच्या वरवरच्या धसमुसळेपणावर जाऊ नकोस. हे पिवळेधमक खणखणतं नाणं आहे! पुढे मागे तुझ्या हिंदवी स्वराज्यावर तसाच प्रसंग ओढवला तर तुझा हा वेडा पोर प्रसंगी प्राण गमावेल, पण सत्त्व सांभाळेल!’’*

**४८०रु. पोस्टेज ३५रु.**




## * आपटे वाचन मंदिरतर्फे उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार

इचलकरंजीच्या आपटे वाचन मंदिराच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट काव्यसंग्रहास दिल्या जाणाऱ्या इंदिरा संत काव्यसंग्रह पुरस्कारासाठी आवाहन करण्यात आले आहे.

तसेच इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्टच्या वतीने उत्कृष्ट गद्य व लक्षणीय गद्य पुरस्कारासाठी गद्य साहित्यकृती पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रुपये ५०००/- व गौरवपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. गद्य व पद्य साहित्यकृतीमध्ये दोन लक्षणीय साहित्यकृतींना रुपये २०००/- व गौरवपत्र देण्यात येते. ग्रंथालयातर्फे आशाताई सौंदत्तीकर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार दिला जातो. रुपये ५०००/- व गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. वि. मा. शेळके गुरुजी यांच्या पत्नी स्व. सौ. को. वि. शेळके यांच्या नावे उत्कृष्ट कादंबरीस रुपये ५०००/- व गौरवपत्र पुरस्कार देण्यात येतो.

१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीमध्ये प्रसिद्ध केलेल्या मराठी साहित्यकृतींच्या लेखक/कवी अथवा प्रकाशकाने दोन प्रती कार्यवाह, आपटे वाचन मंदिर, राजवाडा चौक, इचलकरंजी जि. कोल्हापूर या पत्त्यावर ३१ मार्च २००७ अखेरपर्यंत पाठवाव्यात.

संपर्क : आपटे वाचन मंदिर ३/५६९, राजवाडा चौक, इचलकरंजी जि. कोल्हापूर फोन नं. ०२३०-२४२११६७

## * धोंडिराम माने वाङ्मय पुरस्कार

धोंडिराम माने विकास प्रबोधिनीतर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्काराची घोषणा प्रबोधिनीचे अध्यक्ष डॉ. सुभाष माने यांनी केली. या वर्षीचा 'साहित्यरत्न जीवनगौरव' पुरस्कार साहित्यिक प्राचार्य गोपाळराव मयेकर यांना देण्यात आला आहे. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या 'मूठभर माती' या आत्मकथनास, उत्तम कांबळे यांच्या 'आई समजून घेताना' या मातृस्तोत्रास, परराष्ट्र मंत्रालयातील सहसचिव ज्ञानेश्वर मुळे यांच्या 'स्वत:तील अवकाश' या आत्मसंवादास धोंडिराम माने वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे.



## * 'एनटीआर' राष्ट्रीय पुरस्कार

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांना अभिजात साहित्याची आवड होती. त्या पार्श्वभूमीवर राज्यात एन. टी. आर. ट्रस्टची स्थापना करण्यात आली आहे. 'एनटीआर' यांच्या नावाने दरवर्षी देशातील उत्तमोत्तम साहित्यकृतींना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येईल, अशी घोषणा रामाराव यांच्या पत्नी लक्ष्मीपार्वती यांनी केली.

देशाच्या सर्व भाषांसाठी हे पुरस्कार देण्याची योजना आहे. रामाराव यांच्या जन्मदिनी म्हणजे २८ मे रोजी दरवर्षी पुरस्कार देण्यात येतील. संबंधित साहित्यिकाच्या मागील पंधरा वर्षांच्या साहित्यसेवेची दखल घेतली जाईल.

## * साहित्यरत्न पुरस्कार

लेखकाने भाषा उसनी न घेता आपण ज्या परिसरातून आलो तेथील भाषेमधून लेखन करावे. असे लेखन इतरांपेक्षा वेगळे आणि वाचकाला साद घालणारे होते, असे विचार ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केले.

प्रतिमा पब्लिकेशन्सतर्फे देण्यात येणाऱ्या साहित्यरत्न पुरस्कारांचे पुणे येथे वितरण करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर उत्तम बंडू तुपे, नीलिमा तपस्वी, दीपक चांदणे, राजेंद्र वाघ आदी उपस्थित होते.

या वर्षीचा प्रतिमा साहित्यरत्न पुरस्कार, शहाजी बलवंत, अर्चना वर्टीकर, माधव रानडे, जयश्री भोसले, संजय जाधव, डॉ. शरयू शहा, कुंडलिक केदारी, चित्रा कुलकर्णी, अरुण देशपांडे, गोविंद उगले आदी साहित्यिकांना देण्यात आला.

वाघ म्हणाले, "वाचक आपल्या विचारांशी एकरूप होऊन जाईल असे लेखक लेखकाकडून होणे आवश्यक असते. लेखक जी व्यक्तिरेखा रंगवीत असतो तिच्या मनाचा तळ त्याला गाठता यायला हवा. यासाठी आपल्या परिसरातील भाषेमध्ये लिखाण करता येणे आवश्यक आहे. हल्लीचे लेखक वाचतात कमी, लिहितात जास्त ही आजच्या मराठी साहित्यामधील शोकांतिका आहे.

दीपक चांदणे यांनी प्रास्ताविक केले, पल्लवी प्रसन्न यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र वाघ यांनी आभार मानले.

## * अमरीश पुरी नाट्य पुरस्कार

मी मराठी नाटक केले नाही, हे खरे आहे; पण त्याची कारणे भौगोलिक आहेत. पृथ्वी थिएटरच्या जवळ होतो म्हणून मी हिंदी नाटके केली. दीनानाथजवळ असतो, तर मराठी नाटक केले असते; पण नाटकांतून नवी भाषा शोधण्याचा नेहमी प्रयत्न असतो, असे मत युवा रंगकर्मी मकरंद देशपांडे यांनी नाट्यरसिकांसमोर

मांडले.

अमोल पालेकर प्रस्तुत 'कोरस महोत्सवा'त तरुण रंगकर्मींसाठी पुरी कुटुंबीयांतर्फे देण्यात येणारा 'अमरीश पुरी नाट्य पुरस्कार' स्वीकारताना मकरंद देशपांडे यांनी प्रेक्षकांशी मोकळा संवाद साधला. ज्येष्ठ रंगकर्मी रतन थिय्याम यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. २५ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी अमरीश पुरी यांचे चिरंजीव राजीव आणि स्नुषा मीना पुरी उपस्थित होते.

''मी फक्त मुंबईतच नाटक करतो, असा आरोप केला जातो; पण मार्च-एप्रिलमध्ये मी माझ्या तीन हिंदी नाटकांसह पुणेकर प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.'' अमरीश पुरी यांच्यासह मी एकाच चित्रपटात काम केले होते. तेव्हा 'मार्गावर ये' असा सल्ला त्यांनी मला दिला होता, अशी आठवणही त्यांनी सांगितली.

### * मधुरिता सारंग स्मृती सन्मान

'मधुरिता सारंग स्कूल ऑफ कथ्थक अँड परफॉर्मिंग आर्ट्स' संस्थेच्या वतीने कलाक्षेत्रातील योगदानासाठी सुरू करण्यात येणारा पहिला 'मधुरिता सारंग स्मृती सन्मान' ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना डॉ. मंजिरी देव (ठाणे) यांना देण्यात आला.

ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना डॉ. रोहिणी भाटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला गेला. या वेळी ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांचा त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त विशेष सत्कार ज्येष्ठ नाट्य अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते झाला. राज्याचे क्रीडा आणि युवक संचालक ज्येष्ठ कादंबरीकार लक्ष्मीकांत देशमुख, मधुरिता सारंग स्कूलच्या प्राचार्या अर्चना संजय आदी या प्रसंगी उपस्थित होत्या.

डॉ. मंजिरी देव या प्रख्यात नर्तक गोपीकृष्ण आणि डॉ. सितारादेवी यांच्या शिष्या असून 'कथ्थक नृत्यातील कविता छंदा'वर त्यांनी पीएच.डी. मिळवली आहे. देश-विदेशात त्यांनी विविध कार्यक्रम सादर केले आहेत. श्री गणेश नृत्यकला मंदिर या संस्थेची स्थापना त्यांनी केली असून गेली तीस वर्षे या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन त्या करीत आल्या आहेत. 'नृत्य सौरभ', 'कथक कौमुदी' अशी काही पुस्तके डॉ. देव यांच्या नावावर आहेत. कथ्थक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम या संदर्भात काही विद्यापीठांच्या समित्यांवर त्या कार्यरत आहेत.

### * प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे प्रसाद बन पुरस्कार

वैद्यकीय सेवाकार्यातील अग्रगण्य अशा नांदेडच्या प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीने मोफत आरोग्य शिबिरे, लोकशिक्षण व समाजप्रबोधन असे विविध उपक्रम राबिवण्यात येतात. प्रतिष्ठानतर्फे मराठी भाषेतील उत्कृष्ट पुस्तकासाठी लेखकाला कै. प्रसाद बन महाराज होटाळेकर यांच्या स्मरणार्थ वाङ्मय पुरस्कार देण्याची योजना चालविण्यात येत आहे. यंदाचा पुरस्कार डॉ. द. ता. भोसले (पंढरपूर) यांना जाहीर करण्यात आला आहे.

साहित्य व संशोधन क्षेत्रातील अनमोल योगदानाबद्दल औरंगाबाद येथील लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. प्रभाकर मांडे यांना मातोश्री पद्मिनीबाई बन जीवनसाधना सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

या दोन मुख्य पुरस्कारांशिवाय अन्य तीन उल्लेखनीय साहित्यकृतींना प्रसाद बन ग्रंथगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. (प्रत्येकी रु. २०००/-) अमरावतीच्या कवयित्री रेषा अकोटकर यांचा काव्यसंग्रह 'ब्रह्मसोपान', औरंगाबादचे लेखक व समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे यांचा समीक्षाग्रंथ 'ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा' आणि परभणी येथील आसाराम लोमटे यांचा 'इडा पिडा टळो' हा कथासंग्रह या साहित्यकृतींची यंदाच्या ग्रंथगौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

❐


एव्हरिथिंग हॅपन्स फॉर अ रीझन




विवाहानंतर अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी गेलेल्या तरुणीचे अमेरिकनायझेशन चितारणारी नर्मविनोदी शैलीतील कादंबरी.

कविता दासवानी
अनु. चित्रा वाळिंबे

१५०रु. पोस्टेज २५रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

## जेम्स बाँड मालिकेतील नुकतेच...

# गोल्डफिंगर
## इयान फ्लेमिंग

**अनु. माधव कर्वे**

**८०रु.**
**पोस्टेज २०रु.**




गोल्डफिंगर.....
सोन्याचं वेड असलेला... स्वत:च सोन्याचं साम्राज्य असलेला एक संशयास्पद, कारस्थानी असामी.
'स्मर्श' या खुनशी रशियन गुप्तहेर संघटनेशी संधान बांधून असलेला गोल्ड फिंगर मोठ्या नरसंहाराचं भयावह कारस्थानं आखतो....
आजच्या अतिरेकी कारवायांशी नातं सांगणार...
त्याचे डाव-प्रतिडावं मोडून काढण्याचं सामर्थ्य केवळ एकाच माणसात असतं...
तो म्हणजे जेम्स बाँड...!

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**






**१६०रु. पोस्टेज २०रु.**

# दोन मने

**वि. स. खांडेकर**

माणसाला दोन मनं असतात.
एक पशूचं आणि दुसरं देवाचं.
पहिलं उपभोगात रमतं. तर दुसरं त्यागात आनंद मानतं!
या दोन मनांचा मन:पटलावर कायम झगडा सुरू असतो.
या झगड्यात याचं दुसरं मनं विजयी होतं, ते कुठल्याही संकटाला सहजपणे सामोरं जातं.....
पण पहिल्या मनांच्या आहारी गेलेला माणूस मोहांना बळी पडतो, दुबळा होतो आणि मग......




**१००रु.**
**पोस्टेज २०रु.**

आजच्या तरुणपिढीला कृत्रिम नीतीमूल्यं पाळण्याची गरज वाटत नाही. जिवातं जीव आहे तोपर्यंत दोन्ही हातांनी जेवढं सुख ओरबाडून घेता येईल तेवढं घ्यायचं, याखेरीज तिच्यापुढं कुठलंही ध्येय नाही.....
पाऊण शतकापूर्वी वि. स. खांडेकरांनी मांडलेला हा विचार सद्यस्थितीलाही लागू पडेल असा.....
जरुर वाचावी अशी कादंबरी.

# सोनेरी स्वप्नं - भंगलेली

**वि. स. खांडेकर**

# श्रद्धांजली

## * सुनंदा देसाई यांचे निधन

'स्वामी'कार रणजित देसाई यांच्या पत्नी व विधनसभेचे अध्यक्ष बाबासाहेब कुपेकर यांच्या भगिनी सुनंदा रणजित देसाई यांचे शनिवारी हृदयविकाराने निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. सुनंदा देसाई या आपली मुलगी मधुमती शिंदे यांच्याकडे ताराबाई पार्क येथे राहात होत्या. देसाई यांच्या पश्चात दोन मुली, तीन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

## * दाजी भाटवडेकर

पहाडी आवाजाने आणि समर्थ अभिनयाने व्यावसायिक रंगभूमीवर अधिराज्य गाजविलेले नटश्रेष्ठ पद्मश्री दाजी भाटवडेकर (वय ८६) यांचे दि. २४ डिसेंबर रोजी निधन झाले.

दाजींचा जन्म १९२० मध्ये झाला. मराठी, इंग्रजी आणि संस्कृत अशा तीनही भाषांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. स्पष्ट शब्दोच्चार, पहाडी आवाज आणि आपल्या समर्थ अभिनयाने गेली चार तपे त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी ४० नाटकांत एकूण ५० भूमिका साकार केल्या. 'तुझे आज तुजपाशी' या नाटकातील 'काकाजी' ही भूमिका त्यांनी अजरामर केली. 'सुंदर मी होणार' या नाटकातील 'महाराज', 'अंमलदार'मधील 'डेरेसाहेब', 'मानापमान'मधील 'लक्ष्मीधर', 'सौभद्र' (बलराम), 'संशयकल्लोळ' (फाल्गुनराव), 'एकच प्याला' (सुधाकर), 'भावबंधन' (घनश्याम) इत्यादी नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजलेल्या आहेत. मराठी नाटकांचे संस्कृत भाषेत रूपांतर करून त्यांनी १७ संस्कृत नाटकांतून भूमिका केल्या. 'संगीत शाकुंतलम्' हे त्यांचे नाटक विशेष गाजले. पंडित नेहरू, राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन, इंदिरा गांधी इत्यादी मान्यवरांनी त्यांच्या संस्कृत नाटकातील भूमिकांची प्रशंसा केली. वयाची पंचाहत्तरी उलटून गेल्यावरही संस्कृत रंगभूमीवर त्यांनी डॉक्टरेट संपादन केली. शाकुंतलम् नाटकातील दुष्यंत त्यांनी 'काकाजी'प्रमाणेच संस्कृत रंगभूमीवर अजरामर केला. 'घरगंगेच्या काठी' आणि 'अक्कलकोट स्वामी' या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका गाजल्या.

## * नारायण अरगडे

'अरगडे कुलकर्णी प्रकाशन' संस्थेचे संचालक नारायण गणेश अरगडे (वय



८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

पुण्याच्या अप्पा बळवंत चौकातील 'अरगडे आणि मंडळी' दुकानाचे ते मालक होते. त्यांनी लहान मुलांसाठीची अनेक पुस्तके प्रकाशित केली होती. त्यापैकी काही पुस्तकांचे प्रकाशन तत्कालीन राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांच्या हस्ते झाले होते. बालसाहित्यातील पुरस्कार त्यांना मिळाले होते.

## * ज्येष्ठ संगीतकार प्रभाकर पंडित

ज्येष्ठ संगीतकार आणि व्हायोलिनवादक प्रभाकर विश्वनाथ पंडित (वय ७३) यांचे २८ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा प्रसिद्ध तबलावादक आणि संगीतकार केदार पंडित, सून आणि नातू असा परिवार आहे.

संगीतक्षेत्रात सुमारे ४५ वर्षे ते कार्यरत होते. ध्वनिफितीचे क्षेत्र त्यांनी प्रामुख्याने गाजवले असले, तरी चित्रपट, नाटक, संगीतिका आणि संगीत नाटक; तसेच जाहिरातींच्या जिंगल्सचीही निर्मिती त्यांनी केली. पंडित यांचा जन्म ३० सप्टेंबर १९३३ रोजी झाला. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण साताऱ्याला झाले. संगीताची आवड बालपणापासून असल्याने त्यांनी गायनाचे मार्गदर्शन मटंगेबुवा; तसेच पेंढारकरबुवा यांच्याकडे घेतले. व्हायोलिनचे शिक्षण त्यांना जे. वाय. पंडित यांच्याकडून मिळाले. संगीतात कारकीर्द घडविण्यासाठी ते मुंबईला आले. दादर येथे त्यांनी तीस वर्षे 'मधुवंती व्हायोलिन विद्यालया'चे संचालन केले. मुंबई आकाशवाणी केंद्रावर पंधरा वर्षे ते कार्यरत होते. मुंबई विद्यापीठाच्या सुगम संगीत विषयाचे ते अभ्यागत व्याख्याते होते.

सुमारे तीनशे ध्वनिफितींना संगीत दिले. दहा चित्रपट, वीस नाटकांचे पार्श्वसंगीत, संगीत नाटकांचे संगीत दिग्दर्शन, लोकनाट्ये, संगीतिका असे चौफेर कार्य केले. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या 'देवाचिये द्वारी' या अजित कडकडे यांच्या आवाजातील ध्वनिफितीला 'डबल प्लॅटिनम डिस्क'चा बहुमान मिळाला होता. मंगेशकरांसह सुरेश वाडकर, सुमन कल्याणपूर, कविता कृष्णमूर्ती, साधना सरगम ते स्वप्निल बांदोडकरपर्यंत सुमारे ७८ विविध गायकांचे आवाज त्यांनी ध्वनिफितींच्या माध्यमातून लोकांसमोर आणले. भावगीते, भक्तिगीते, लोकगीते, अभंग, आरत्या, संतरचना, बालगीते असे अनेक गीतप्रकार त्यांनी संगीतबद्ध केले. 'रंग ओलेत्या फुलांचे', 'मन हा मोगरा', 'अभंग प्रभात', 'वृंदावनी वेणु', 'छंद हा विठ्ठलाचा', 'भक्तिप्रकाश', 'झुकझुक गाडी', 'देव दयानिधी' अशा अनेक ध्वनिफिती गाजल्या. 'सुगम संगीताचे सौंदर्य' या पुस्तकाचे लेखनही त्यांनी केले होते.

❒

# बालनगरी



## अनुक्रमणिका


कोल्ह्याची चतुराई... ९९

माकडे करतात उपवास... १०७




## कोल्ह्याची चतुराई



एक घनदाट जंगल होतं. त्या जंगलचा राजा सिंह शिकारीसाठी फिरत असताना चुकून एका मोठ्या पिंजऱ्यात अडकला. पिंजऱ्याबाहेर पडण्याचे सर्व प्रयत्न त्या सिंहाने करून पाहिले. पण काही उपयोग झाला नाही. पिंजरा खूपच मजबूत होता.

सिंह खूप बेचैन झाला. त्याला पिंजऱ्यात अडकून आता चांगले चार-पाच दिवस झाले होते. त्याला भूकसुद्धा भरपूर लागली होती.

तशातच त्याला एक भटजी दिसला. तो पूजाअर्चा करण्यासाठी जंगलातल्या एका मंदिरात दर सोमवारी जात असे. सिंहाने भटजीला हाक मारून बोलावले व म्हटले, ''हे भटजीमहाराज, मी गेले चार-पाच दिवस या पिंजऱ्यात अडकून पडलो आहे. तुम्ही कृपा करून मला या पिंजऱ्यातून सोडवा. मी तुमचा आयुष्यभर ऋणी राहीन. तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाही.''



इकडे तो भटजी खूपच घाबरला. त्याला काहीच सुचेना. एवढा मोठा सिंह बघून त्याची भीतीने गाळणच उडाली.

तो कसाबसा त्या सिंहाला म्हणाला, ''अरे, पण मी तुझी या पिंजऱ्यातून सुटका केली तर तू मलाच खाऊन टाकशील. त्यापेक्षा तू या पिंजऱ्यातच अडकलेला बरा.''


हे ऐकल्यावर सिंह म्हणाला, ''हे भटजीमहाराज, मी तुमच्या अंगाला नखही लावणार नाही. वचन देतो हवे तर, पण माझ्यावर दया करा. मला या पिंजऱ्यातून सोडवा.''

सिंहासारखा जंगलाचा राजा आपल्यासमोर दया मागतो आहे, हे पाहिल्यावर भटजीलाही मूठभर मांस चढले. शेवटी त्याने घाबरत घाबरत त्या पिंजऱ्याचे दार अखेर उघडले.



दार उघडल्यावर त्या सिंहाने पिंजऱ्याबाहेर मोठी झेप घेतली. त्याला खूप हायसे वाटले. मात्र त्याला खूप भूकही लागली होती. तो तब्बल पाच दिवस भुकेला होता. इकडेतिकडे शिकार करण्यापेक्षा समोर असलेला गोरापान, गलेलठ्ठ ब्राह्मण पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. तो त्या ब्राह्मणाला म्हणाला,

''ए भटा, मी आता तुला खाणार, मला खूप भूक लागली आहे. चल, मरायला तयार हो.''



हे ऐकून तो भटजी खूप घाबरला आणि म्हणाला, ''पण... पण तू तर मला वचन दिले होतेस की तू मला खाणार नाहीस, मग... मग आता असे का बोलत आहेस?''

''ए... चूप बस! मी वचन वगैरे काही पाळत नसतो.

मी या जंगलाचा राजा आहे. माझ्या इच्छेनुसारच सर्वांनी वागले पाहिजे. कळाले का...?'' सिंह म्हणाला.

तो ब्राह्मण घाबरलेला असला तरी खूप चतुर होता. तो सिंहाला म्हणाला, ''हे वनराज, तू मला खाण्यापेक्षा मीच तुला दररोज एक माणूस आणून देईन, यामुळे तुझी रोजची भूकही भागेल आणि



मीदेखील जिवंत राहीन.''

पण सिंहाला ते पटले नाही. त्याला त्या गुबगुबीत भटजीलाच खायचे होते.

सिंह ऐकत नाही हे पाहिल्यावर त्या भटजीने आणखी एक युक्ती शोधून काढली, तो म्हणाला, ''हे पहा, आपण थोडे अंतर चालून जाऊ. जो आपल्याला सर्वप्रथम भेटेल तो आपल्याला न्याय देईल.'' सिंहाने थोडा विचार करून होकार दिला आणि ते दोघे पुढे चालू लागले. थोडे अंतर चालून गेल्यावर त्यांना एक कोल्हा भेटला. कोल्हा म्हटले की धूर्तच तो. त्या भटजीने कोल्ह्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली आणि न्याय देण्याची विनंती केली.



त्या कोल्ह्याने सर्व शांतपणे ऐकून घेतले. त्याला लक्षात आले की, भटजीची काहीच चूक नाही. या सिंहालाच आपण चांगला धडा शिकवला पाहिजे. हे सर्व इतक्या वेगाने घडते की सिंह गोंधळून जातो. त्याला काही सुचत नाही. मात्र आपल्याला पुन्हा पिंजऱ्यात अडकवले हे त्याला लक्षात येते.

इकडे भटजी व कोल्हा दोघेही सुटकेचा निःश्वास



टाकतात. भटजीला खूप हायसे वाटते.


कोल्हा भटजीला म्हणतो, ''हे भल्या माणसा, सहजासहजी कोणावरही विश्वास टाकू नको. आधी पारख करून मगच एखाद्याशी मैत्री करावी.''

भटजीलाही कोल्ह्याचा सल्ला पटतो आणि तो आपल्या मार्गाला लागतो. कोल्हाही आपल्या वाटेने निघून जातो.

इकडे सिंह पिंजऱ्यात अडकतो तो कायमचाच. ❐

# रस्ता शोधा

खालील भुलभुलैय्यात 'काळ्या रंगाच्या चेंडूला आतील + वर्तुळात पोहचवा'.





# एका चिमुरडीची 'बालवाचक चळवळ'



**कु. निहारिका देशमुख**

*वय वर्ष अवघं आठ....इयत्ता ३री...कु.निहारिका देशमुख. वयाप्रमाणेच अवखळ, बडबडी पण अभ्यासात कुशाग्र आणि तिची आवड...अवांतर वाचनाची.*

*पण निहारिकाने अवांतर वाचनाची आवड केवळ स्वत:पुरती जोपासली नाही; आपल्या बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींमध्येही आवड निर्माण होण्यासाठी तिने पुढाकारही घेतला.*

*आपल्या भरगच्च दप्तरात मेहता पब्लिशिंग हाऊसची पुस्तकसूची आणि बालवाङ्मयाची काही पुस्तकं घेऊन निहारिका शाळेच्या फावल्या वेळात, आपल्या मित्रमैत्रिणींना, इतर विद्यार्थ्यांना ही पुस्तके दाखवते. पुस्तकांबद्दल माहिती सांगून विकत घेण्यास प्रोत्साहित करते.*

*अर्थात सुरुवातीला बालचमूंकडून तिला फारसा प्रतिसाद मिळाला नाही, मात्र आता तिच्या या 'चिकाटीनं' चांगलंच 'बाळसं' धरलयं. या तिच्या प्रयत्नांमुळे शाळेकडून (वा. दि. वैद्य प्राथमिक शाळा) नुकताच तिचा विशेष पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. अर्थात आई सौ. राजश्री आणि बाबा श्री. शशांक देशमुख यांचं प्रोत्साहन तिला होतचं.*

*निहारिकाकडे असलेली मेहता पब्लिशिंग हाऊसची*

*पुस्तकसूची पाहून शाळेतील काही शिक्षिकांनी प्रख्यात लेखिका सुधा मूर्ती यांची काही पुस्तके विकत घेतली. बालवाङ्मयाचा उत्कृष्ट दर्जा पाहून पालकांनाही पुस्तके घेण्यास भाग पाडले.*

*शाळेच्या या वातावरणाने हळूहळू'बालवाचक' चळवळीचे रूप धारण केले आहे. अर्थातच निहारिका या चळवळीची बिनीची शिलेदार आहे.*

***तिच्या या प्रयत्नांना आणि भविष्यातील वाटचालींना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे हार्दिक शुभेच्छा !***

❐


**मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासास मार्गदर्शक अशी उपयुक्त पुस्तके**

**मुलांच्या समृद्ध जीवनासाठी**
डॉ. सुचित तांबोळी | १५० रु.

**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व**
डॉ. रमा मराठे | १२० रु.

**आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र**
अनंत पै, अनु. प्रशांत तळणीकर | ८० रु.

**पाल्य व्यक्तिमत्वाचा कानमंत्र**
संजीव परळीकर | ७० रु.

**मुलांवरचे संस्कार**
शं. व्यं. काश्यपे | ९० रु.

पोस्टेज प्रत्येकी२०रुपये




## माकडे करतात उपवास...

'पेंद्या' माकडाचं कुटुंब खाऊन-पिऊन खूप सुखी होतं. पेंद्याची बायको, भाऊ, लहान मुलं सर्वजण मिळून मिसळून राहत.

एक दिवस सर्वजण उपवास करायचा ठरवतात. तेव्हा पेंद्याचे वडील म्हणतात, ''अरे, आपण मोठे सगळे उपवास करू पण या पोरांचे काय...? हे काय थोडेच उपाशी बसणार आहेत इतका वेळ...? यांना काहीतरी खायला आणून ठेवा...!''

''ठीक आहे, मी दोन डझन केळी आणून ठेवतो म्हणजे उपवास मोडल्यानंतर आपल्यालाही खाता येईल.'' पेंद्या म्हणतो.

सगळे जणं माना डोलावून होकार देतात आणि पेंद्या केळी आणायला बाहेर पडतो. चांगली रसरशीत केळी पाहून ती घरी आणतो. ती केळी पाहताच लहानथोरांसहित सर्वांच्याच तोंडाला पाणी सुटते. पण घरातले मोठे करणार काय...? कारण उपवास करायचा असतो ना...!

पेंद्याची बायको सर्वांना केळी वाटून देते. मुलं लगेच केळी खाऊन टाकतात.

ते पाहून पेंद्यासहित सर्वांना लहानांचा हेवा वाटतो. आजोबा म्हणतात, ''हे पहा, मी माझ्या वाटणीच्या केळी सोलून ठेवतो म्हणजे उपवास संपला की लगेच तोंडात टाकता येतील.'' असे म्हणून दोन-तीन केळी



सोलून ठेवतात.

आजोबांचे पाहून पेंद्या आणि बाकीचे सर्व आपापली केळी सोलू लागतात.

''मी एक केळ तोंडात ठेवू का...? उपवास संपल्याशिवाय खाणार नाही.'' पेंद्या म्हणतो.


''हो, हो... का नाही...? आपण सर्वजण तोंडातच केळी ठेवू म्हणजे उपवास संपला की लगेच खाता येतील.'' आजोबांसहित सगळे माना डोलावतात.

मग काय... एकदा तोंडात केळी ठेवल्यानंतर सर्वजण गुपचूप खाणं चालू करतात... आणि पेंद्याच्या कुटुंबाचा उपवास तासाभरातच संपतो.

❐



## ओळखा पाहू



शेजारील चौकटीत छायाचित्र आहे एका प्रतिभावंत भारतीय चित्रपट दिग्दर्शकाचे.

ऑस्कर पुरस्काराने यांना सन्मानित करण्यात आले.

हे कोण आणि यांना प्रामुख्याने कोणत्या चित्रपटासाठी ऑस्कर देऊन गौरवण्यात आले हे आम्हाला पत्राद्वारे कळवा.

**जानेवारी अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर**
**'सॅम पित्रोदा'**

---

अचूक उत्तर पाठवणारे वाचक

शेखर पाटील-धुळे, रा.द.ढुमणे-पुणे,एन.एच.कुलकर्णी-सांगली,प्रदिपकुमार लुणावत-धामनगाव रेल्वे, आकाश कोटलवार-नांदेड.

**मेहता पब्लिशिंग हाऊसचा खास बालवाचकांसाठी अभिनव उपक्रम.....**

लक्षवेधी, अस्सल छायाचित्रांची, थोडक्यात पण नेमकी माहितीपर अशी उपयुक्त पुस्तके.....

| | | | |
|---|---|---|---|
| **१. सौरमलिका** | **२. कोळी** | **३. मधमाशी** | **४. चंद्र** |
| **५. मुंग्या** | **६. खार** | **७. सूर्य** | **८. पृथ्वी** |

**किंमत प्रत्येकी ३०रु. पोस्टेज एकत्रित २५रु.**

## व्यक्तिमत्त्व विकसनविषयक पुस्तके

| | | |
|---|---|---|
| आपण : आपले ताणतणाव<br>- एक चिंतन | अंजनी नरवणे | १०० |
| निरामय यशासाठी ध्यान | शुभदा गोगटे | ७० |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६० |
| यशाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आत्मविश्वासाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ४० |
| उत्तम स्मृतीचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आपल्या मुलांच्या यशस्वितेचा<br>कानमंत्र : अनंत पै | अनु.प्रशांत तळणीकर | ८० |
| पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र | संजीव परळीकर | ७० |
| पुढाकार घ्या<br>प्रभावी व्यक्तिमत्वाचे सूत्र २००६ | संजीव परळीकर | २०० |
| झटपट व्यक्तिमत्वविकास २००७ | संजीव परळीकर | ५० |
| मुलांच्या समृद्ध जीवनासाठी | डॉ.सुचित तांबोळी | १५० |
| मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार) | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| संस्कार कथा | शं. व्यं. काश्यपे | आ.सं. |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १०० |
| तुम्ही आणि तुमची मुलं | रुपां. अविनाश भोमे | ८० |
| सुजाण पालकत्व | मीना टाकळकर | ६० |
| प्रियाराधन आणि विवाह<br>: डॉ. विजय नागस्वामी | अनु.भारती पांडे | १५० |
| चला उठा कामाला लागा!<br>: स्वाती शैलेश लोढा | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| द मॅजिक ऑफ<br>थिंकिंग बिग : डेव्हिड श्वार्झ | अनु. प्रशांत तळणीकर | २०० |
| शांततेनं काम करा!<br>: पॉल विल्सन २००६ | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४० |



## आरोग्यविषयक पुस्तके

| | | |
|---|---|---|
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | २०० |
| चाळिशीनंतरची वाटचाल | डॉ.सुभाष दांडेकर | १२० |
| सुखद मातृत्व | डॉ.रत्नावली दातार | ७० |
| २० मिनिटे तंदुरुस्तीसाठी : शेली बात्रा | अनु.गंगाधर महाम्बरे | १३० |
| डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी | डॉ. विकास / विनिता गोगटे | २५० |
| बाल परिचर्या | सुधा पाटील | २०० |
| मधुमेह : एक आव्हान | डॉ.अरुणा/अशोक जैन | १२० |
| पाणी :एक अद्भुत उपचारपद्धती | अनु.सुभाष जोशी | ७० |
| भारतवैद्यक | डॉ. शाम अष्टेकर | ६०० |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९० |
| कर्करोग असाध्य नाही : ए.एन.भिसे | अनु. राम दातार | ५० |
| आपले सौंदर्य आणि त्याची निगा | अनु.मीना टाकळकर | १०० |
| रेकी | शुभदा दामले | ६० |
| आरोग्यासाठी योग | अनु.मंगेश कश्यप | ८० |
| तणावमुक्तीसाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| वजन कमी करण्यासाठी योगसाधना | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५० |
| कार्यमग्न, व्यस्त<br>लोकांसाठी योगसाधना | अनु. अरुंधती महाम्बरे | ५० |




'आरोग्य निकोप, निरोगी राहण्यासाठी, आहारनियमन आणि नियमित व्यायाम याचा साक्षेपी अवलंब हेच श्रेयस्कर आहे.' हा विचार प्रभावीपणे मनावर बिंबवणारे पुस्तक.

**औषधाविना आरोग्य**


**डॉ. रमा मराठे । डॉ. रवि मराठे**

**२००रुपये पोस्टेज २५ रु.**

## मार्गदर्शनपर पुस्तके

| | | |
|---|---|---|
| व्यवसाय मार्गदर्शक : जयंती घोष | अनु. महाम्बरे/कपटकर | १९० |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ६० |
| मंत्र श्रीमंतीचा | श्याम भुरके | १३० |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ९० |
| शर्यती स्पर्धा खेळ | आ. पां. खरात | १२० |
| प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू | यशोधरा भोसले | १५० |
| कॉम्प्युटरच्या करामती | डॉ. बाळ फोंडके | ५० |
| ही सुट्टी कशी घालवाल? | मनोहर चंपानेरकर | ४२ |
| बुद्धिबळाचा ओनामा | ना. रा. वडनप | ८० |
| सुसंघटीत मारा (बुद्धिबळ) | ना. रा. वडनप | १०० |
| चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे | ना. रा. वडनप | १०० |
| बुद्धिबळाचा श्रीगणेशा | ना. रा. वडनप | १२० |
| बुद्धिबळ शिका | ना. रा. वडनप | १०० |
| शिवणकला एक छंद : स्मॉकिंग | हेमा कळके | १०० |
| शिवणकला एक छंद : सलवार कमिज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स मिडी | हेमा कळके | ८० |
| गाऊन्स २००७ | हेमा कळके | १६० |
| क्रोशा विणकाम | प्रभावती पुरम | २०० |
| लोकरीचे विणकाम २००६ | आशा पत्रावळी | ३५० |

**डॉ. रमा मराठे**




**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्व**

**मुलांच्या विकासासाठी**

**१२०रु.**

**हसत जगावं**

**ताणापासून मुक्तीसाठी..**

**१००रु.**



**पोस्टेज प्रत्येकी २०रु.**




**तो आणि ती**

**दोघांमधल्या सखोल सामंजस्यासाठी..**

**२५०रु.**



## वि. स. खांडेकर यांची पुस्तके

**कादंबरी**

| | |
|---|---|
| ययाति | २०० |
| अमृतवेल | १०० |
| सुखाचा शोध | ९० |
| पहिले प्रेम | १०० |
| जळलेला मोहोर | १२० |
| नवी स्त्री | १०० |
| हिरवा चाफा २००६ | १५० |
| दोन ध्रुव २००६ | १८० |
| रिकामा देव्हारा २००६ | १०० |
| क्रौंचवध २००६ | १८० |
| पांढरे ढग २००६ | १५० |
| अश्रू २००६ | २०० |
| दोन मने २००६ | १६० |
| उल्का २००६ | १५० |
| सोनेरी स्वप्ने भंगलेली २००७ | १०० |

**कथासंग्रह**

| | |
|---|---|
| सरत्या सरी | ५० |
| दवबिंदू | ६० |
| सांजवात | ६० |
| हस्ताचा पाऊस | ६० |
| ढगाआडचे चांदणे | ६० |
| जीवनकला | ६० |
| फुले आणि काटे | ६० |
| समाधीवरली फुले | ६० |
| कालची स्वप्ने | ७० |
| चंदेरी स्वप्ने | ७० |
| उ:शाप | ७० |
| स्वप्न आणि सत्य | ७० |
| पाकळ्या | ८० |
| सूर्यकमळे (अनु.) | ८० |
| स्त्री आणि पुरुष | ८० |
| आजची स्वप्ने | ९० |
| अश्रु आणि हास्य | ९० |
| फुले आणि दगड | ९० |
| घरट्याबाहेर | ९० |
| पहिली लाट | ९० |
| विकसन | १०० |
| भाऊबीज | १२० |
| प्रीतीचा शोध | १५० |
| प्रसाद | १५० |
| मुरली | १८० |

**कुमारवाङ्मय *(कथासंग्रह)***

| | |
|---|---|
| सूर्यास्त | ३० |
| यज्ञकुंड | ३० |
| अस्थी | ३० |
| घरटे | ४० |
| मध्यरात्र | ४० |

**रूपककथा संग्रह**

| | |
|---|---|
| सोनेरी सावल्या (अनु.) | ३० |
| वेचलेली फुले (अनु.) | ५० |
| क्षितिजस्पर्श | ८० |
| सुवर्णकण (खलिल जिब्रान) (अनु.) | ८० |

**लघुनिबंध संग्रह**


| | |
|---|---|
| वायुलहरी | ५० |
| अविनाश | ५० |
| तिसरा प्रहर | ६० |
| हिरवळ | ६० |
| वासंतिका | ६० |
| अजून येतो वास फुलांना | ६० |
| चांदण्यात | ७० |

| | |
|---|---|
| रानफुले | ७० |
| मुखवटे | ७० |
| सांजसावल्या | ८० |
| सायंकाल | ८० |
| **लेख / समीक्षा संग्रह** | |
| अज्ञाताच्या महाद्वारात | ५० |
| दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी | ७० |
| वन्हि तो चेतवावा ! | ७० |
| गोकर्णीची फुले | ८० |
| रंग आणि गंध | १०० |
| **पत्रे** | |
| **व्यक्ति आणि वाङ्मय** | |
| वामन मल्हार जोशी : व्यक्ती-विचार | ८० |
| केशवसुत : काव्य आणि कला | १०० |
| गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय | २०० |
| **आत्मचरित्र / आत्मकथन** | |
| एका पानाची कहाणी | २५० |
| पहिली पावलं २००७ | ९० |
| **भाषणे** | |
| तीन संमेलने | ५० |
| **व्यक्तिचित्रे** | |
| ते दिवस, ती माणसे | ८० |
| **संपादित साहित्य** | |
| ***संक्षिप्त कादंबरी :-*** | |
| आस्तिक | ६५ |
| सुशीलेचा देव | १०० |
| ***निवडक कथा :-*** | |
| गुदगुल्या | ५० |
| ***निवडक काव्य :-*** | |
| काव्यज्योती | ५० |
| ***निवडक नाट्यांक :-*** | |
| रंगदेवता | ८० |

## कुमार वाङ्मय

## संस्कारक्षम कथा









| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | वि. स. खांडेकर | ३० |
| यज्ञकुंड | वि. स. खांडेकर | ३० |
| मध्यरात्र | वि. स. खांडेकर | ४० |
| घरटे | वि. स. खांडेकर | ४० |
| अस्थी | वि. स. खांडेकर | ३० |